डिजीटल ई-मासिक

महापशुधन वार्ता

वर्ष १ ले, अंक ९ वा

जानेवारी २०२६

नववर्षाभिनंदन

डिजीटल ई-मासिक

महापशुधन वार्ता

वर्ष १ ले, अंक ९ वा

मुख्य संपादक

डॉ. देवेंद्र सुरेश जाधव
सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
(पशुधन व नियोजन) पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-६७

सहसंपादक

डॉ. प्रशांत दयाराम भड
उपआयुक्त पशुसंवर्धन, तथा सदस्य सचिव
महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन
प्राधिकरण, पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र
राज्य, औंध, पुणे-६७

संकलन, संपादन, मांडणी व सजावट:

श्री. संतोष शिवराम पवार, पशुधन पर्यवेक्षक
'महापशुधन वार्ता' कक्ष,
पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११०६७

पशुसंवर्धन विभाग

मागील अंक वाचण्यासाठी भेट द्या
dahd.maharashtra.gov.in
अथवा स्कॅन करा

पत्रव्यवहारासाठी पत्ता :

महापशुधन वार्ता कक्ष
पसं-१३, पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य,
औंध, पुणे - ४११०६७

020-25690484

Email: mahapshudhanvarta@gmail.com

या अंकातील लेखांमध्ये व्यक्त करण्यात आलेल्या मतांशी संपादक व पशुसंवर्धन विभाग सहमत असेलच, असे नाही. (पुणे न्यायकक्षेत).

या अंकात



- 'माफसू' द्वारा 'महाराष्ट्राचे पशुवैभव' व 'माफसू यशोगाथा'चे प्रकाशन
- मा. सचिव (पदुम) महोदयांचा विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र दौरा
- प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेअंतर्गत बायोफ्लॉक प्रकल्प
- मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी यांचेद्वारा रामरक्षा गोशाळेला भेट
- एएचआयडीएफ प्रकल्पांची सचिव डॉ. रामास्वामी यांच्याकडून पाहणी
- गो-आधारित शेती काळाची गरज: मा. सचिव डॉ. रामास्वामी एन.
- शेळीपालन व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड द्या: मा.सचिव (पदुम) यांचे आवाहन
- मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांची उदगीर 'COVAS' ला भेट
- सोलापूर येथील सधन कुक्कुट विकास गटाला मा. सचिवांची भेट
- महामहिम राज्यपालांच्या उपस्थितीत पशुधनाच्या लसीकरणास प्रारंभ
- मा. विभागीय आयुक्तांची रोग अन्वेषण संस्थेस सदिच्छा भेट
- 'क्लासिकल स्वाईन फीव्हर'साठी लसीकरणाद्वारे प्रतिबंध हाच उपाय: 'माफसू' कुलगुरू प्रा. डॉ . नितीन पाटील यांचे प्रतिपादन
- 'ॲनिमल बर्थ कंट्रोल प्रोटोकॉल'ची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक
- नागापुरात पशुप्रदर्शनी व रोगनिदान शिबिर उत्साहात संपन्न
- पडेगाव येथे तीन दिवसीय शेळीपालन प्रशिक्षण संपन्न
- मुक्या प्राण्यांची सेवा व आधुनिक उपचार तंत्र
- रशियन प्रतिनिधी मंडळाचा राज्य दौरा; पशुसंवर्धन विभागाच्या कार्याची घेतली दखल
- निमशिरगावमधील गाईच्या पायावर 'हँगिंग पिन कास्ट'द्वारे शस्त्रक्रिया
- जन्माचे व्यंग हरले, वासरू धावले!
- यशस्वी रक्तसंक्रमण: बेबेसिओसिसग्रस्त गाईला जीवदान
- माध्यमांनी घेतलेली दखल
- 'उमेद' अभियानातील महिलांना आता 'ग्रामसखी' म्हणून नवीन ओळख!
- लिंग विनिश्चित वीर्यमात्रा (SSS) व भ्रूण प्रत्यारोपण (ETT) तंत्रज्ञान
- भटक्या कुत्र्यांची समस्या: वास्तव, आव्हाने व नागरिकांची जबाबदारी
- ब्रॉयलर पक्षीपालनातील यांत्रिकीकरण
- ओळख पशुधनाची: सांगलीची शान: नफा देणारी 'मडग्याळ' मेंढी
- माळेगाव यात्रा : ग्रामीण संस्कृतीची प्रयोगशाळा!
- प्रतिजैविकांना प्रतिकार : एक जागतिक आव्हान
- निपाह विषाणूचा वाढता धोका
- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५
- पशुसंवर्धन शब्दसंग्रह - ब्रुडिंग व पोल्ट्री व्यवस्थापन

'माफसू' द्वारा 'महाराष्ट्राचे पशुवैभव' व 'माफसू यशोगाथा'चे प्रकाशन

नागपूर: महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर (माफसू) यांच्या विस्तार संचालनालयाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या 'महाराष्ट्राचे पशुवैभव' व 'माफसू यशोगाथा' या दोन महत्त्वपूर्ण पुस्तकांचे प्रकाशन नुकतेच पशुवैद्यक महाविद्यालय, उदगीर येथे आयोजित ३४ व्या राष्ट्रीय परोपजीवी शास्त्र परिषदेच्या समारोप प्रसंगी संपन्न झाले.

याप्रसंगी मा. डॉ. एन. रामास्वामी (सचिव, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य विभाग, महाराष्ट्र राज्य), मा. डॉ. नितिन पाटील (कुलगुरू, माफसू, नागपूर), मा. डॉ. प्रविणकुमार देवरे (आयुक्त, पशुसंवर्धन), डॉ. सचिन बोंडे (संचालक, विस्तार शिक्षण, माफसू, नागपूर), डॉ. अनिल भिकाने (माजी संचालक, विस्तार शिक्षण, माफसू), डॉ. ए. संगरन (चेन्नई), डॉ. अशोक देवंगरे (सहयोगी अधिष्ठाता) व डॉ. गोपाळ भारकड यांची प्रमुख उपस्थिती होती.

'महाराष्ट्राचे पशुवैभव' या पुस्तकांचे महाराष्ट्रातील एकूण १८ नोंदणीकृत पशुधन प्रजातींची सविस्तर शास्त्रीय माहिती समाविष्ट करण्यात आली आहे. यामध्ये ७ गोवंश, ४ म्हशी, ४ शेळ्या तसेच प्रत्येकी एक मेंढी, अश्व व वराह प्रजातींचा समावेश आहे. या प्रजातींची पैदास क्षेत्रे, शारीरिक गुणवैशिष्ट्ये, उत्पादन व प्रजनन गुणधर्म तसेच उपयुक्तता यांचा अभ्यासपूर्ण आढावा घेण्यात आला आहे. तसेच सध्या नोंदणी प्रक्रियेत असलेल्या किंवा नोंदणी पूर्णत्वास गेलेल्या १४ अवर्णित पशुधन प्रजातींची थोडक्यात माहिती देण्यात आली असून, यामध्ये ७ गोवंश, २ म्हशी, १ शेळी, १ मेंढी, २ श्वान व २ गर्दभ प्रजातींचा समावेश आहे. विविध पशुप्रजातींचे उत्कृष्ट रंगीत छायाचित्रे व विद्यापीठातील पशुअनुवंशशास्त्र विभागातील तज्ज्ञांनी लिहिलेला अभ्यासपूर्ण मजकूर, हे या पुस्तिकेचे वैशिष्ट्य आहेत.

'माफसू यशोगाथा' या पुस्तकात माफसूच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शन, प्रशिक्षण व प्रोत्साहनातून दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन, वराहपालन, मत्स्य व्यवसाय व प्रक्रिया उद्योगात यशस्वी ठरलेल्या ५२ उद्योजकांच्या प्रेरणादायी यशोगाथा समाविष्ट करण्यात आल्या आहेत. या यशोगाथा ग्रामीण उद्योजकतेसाठी मार्गदर्शक ठरणाऱ्या आहेत. या दोन्ही पुस्तकांचे मुख्य संपादक डॉ. अनिल भिकाने

(माजी संचालक, विस्तार शिक्षण, माफसू) असून, 'महाराष्ट्राचे पशुवैभव' या पुस्तकाच्या संपादनात डॉ. शैलेंद्र कुरळकर, डॉ. प्रविण बनकर, डॉ. गितांजली ढुमे व डॉ. सारीपुत लांडगे यांनी योगदान दिले आहे.

'माफसू यशोगाथा २०२५' या पुस्तकाच्या संपादनात डॉ. बापूराव कदम, डॉ. अतुल ढोक, डॉ. गितांजली ढुमे, डॉ. विजयसिंह लोणकर, डॉ. तेजस शेंडे, डॉ. स्वप्नील घाटगे, डॉ. हेमंत गावंडे व डॉ. सारीपुत लांडगे यांनी मोलाचे योगदान दिले आहे. या दोन्ही पुस्तकांच्या डिजिटल प्रती माफसूच्या www.mafsu.ac.in या संकेतस्थळावर सर्वांसाठी मोफत उपलब्ध आहेत.

संदर्भमूलक माहितीचा समावेश

राज्यातील पाळीव प्राण्यांच्या प्रजाती, मूळ स्थाने, शरीररचना, गुणवैशिष्ट्ये, क्षमता याबाबत वैयक्तिक माहिती संकलनातून अनेक पुस्तके यापूर्वी प्रकाशित करण्यात आली आहेत, मात्र विज्ञान आधारित शास्त्रीय अभ्यासातून, पृथक्करणातून संदर्भ देण्यासाठी आवश्यक असणारी माहिती अधिक महत्त्वपूर्ण ठरते. पशुधनातील विविध प्रवर्ग व प्रजातींबाबत मुद्देसूद वर्णन, आकडेवारी, समर्पक छायाचित्रे व क्षमता देण्यात आली आहे. राज्यात सर्वच अधिकृत नोंदणी असणाऱ्या व भविष्यात अपेक्षित असणाऱ्या पाळीव प्राण्यांच्या जाती पशुपालकांना सहज समजू शकतील, अशा पद्धतीने माहितीचा अंतर्भाव या पुस्तिकेमध्ये करण्यात आला आहे. त्यामुळे पशुपालकांसह पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी या पुस्तिका मार्गदर्शक ठरतील.

पाळीव पशुधनाच्या संख्येत केवळ वर्गीकृत असणाऱ्या प्रजातींची टक्केवारी राज्याला मोठ्या प्रमाणात वाढवणे, हे मोठे आव्हान असताना योग्य प्रकारे विस्तार शिक्षणाच्या माध्यमातून पशुपालकांपर्यंत पोहोचवण्याचे लक्ष्य विद्यापीठाने सदरील पुस्तकातून साध्य केले आहे. विशेष महत्त्वाची बाब अशी, की सदरील शास्त्रीय माहिती प्रकाशन डिजिटल स्वरूपात सर्वांसाठी असून, विद्यापीठाच्या संकेतस्थळावर सहज उपलब्ध करून देण्यात आले आहे, हे विशेष.

प्रादेशिक अंडी उबवणी केंद्र, सेमिनरी हिल्स, नागपूर या संस्थेस महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे मा. सचिव डॉ. रामास्वामी एन. यांनी सदिच्छा भेट देत प्रकल्पाची पाहणी केली. यावेळी अंडी उबवणी केंद्रातील प्रागतिक कामकाजाचा आढावा मा. सचिव महोदयांनी घेतला. तसेच संस्थेच्या क्षमतावृद्धीसाठी आवश्यक सूचना पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना केल्या.

भारत सरकार मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय मंत्रालय, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागामार्फत राष्ट्रीय पशुधन अभियानातंर्गत मौजे मोहापा, ता. कळमेश्वर येथे स्थापित अविनाश बोडखे यांच्या निर्मिका ॲग्रो शेळी फार्म प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे मा. सचिव डॉ. रामास्वामी एन. यांनी सदिच्छा भेट देत प्रकल्पाची पाहणी केली. या प्रकल्पात ३०० शेळ्या +१५ बोकडांचे संगोपन करण्यात येत असून, हा प्रकल्प रु. ६०,००,०००/- इतक्या खर्चाचा आहे. या प्रकल्पांतर्गत लाभधारकाला एकूण रु. ३०,००,०००/- सबसिडी मिळाली आहे. मा. सचिव (पदुम) यांनी सदर प्रकल्पातील व्यवस्थापन कार्याचे कौतुक करत अविनाश बोडखे यांना शुभेच्छा दिल्या तसेच भविष्यात नवतरुणांना शेळीपालन व राष्ट्रीय पशुधन अभियानाविषयी मार्गदर्शन करण्याबाबत आवाहन केले.

प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेअंतर्गत बायोफ्लॉक प्रकल्प

पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे मा. सचिव डॉ. रामास्वामी एन. यांनी नागपूर जिल्ह्यातील मत्स्यबीज केंद्राला व प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेंतर्गत स्थापित बायोफ्लॉक प्रकल्पास सदिच्छा भेट दिली. हा प्रकल्प केंद्र शासनाच्या 'प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजना' अंतर्गत राबविण्यात येत असून तो मत्स्यव्यवसाय विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. प्रकल्पाचे मुख्य स्वरूप 'भूजलाशयीन क्षेत्रामध्ये बायोफ्लॉक तंत्रज्ञानाची उभारणी' असे आहे. नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्यातील खैरी (हरजी) येथे हा प्रकल्प उभारण्यात आला असून, सौ. चंदा प्रमोद कोसारे या त्याच्या मुख्य लाभार्थी आहेत. तलावाचे क्षेत्रफळ २९ बाय ४० मीटर इतके निश्चित करण्यात आले असून, केंद्र शासनाने १२ डिसेंबर २०२२ रोजी प्रशासकीय मंजुरी दिली होती.

या प्रकल्पाची एकूण आर्थिक व्याप्ती १४ लाख रुपये आहे. यामध्ये केंद्र व राज्य शासनाचा मोठा वाटा असून लाभार्थ्यालाही आर्थिक सहभाग नोंदवावा लागला आहे. प्रकल्पाच्या एकूण खर्चापैकी केंद्र सरकारचा हिस्सा ५.०४ लाख रुपये व राज्य सरकारचा हिस्सा ३.३६ लाख रुपये आहे, म्हणजेच एकूण ८.४० लाख रुपये (६० टक्के) इतके अनुदान या प्रकल्पासाठी मंजूर झाले आहे. उर्वरित ५.६० लाख रुपये हे लाभार्थ्याचा स्वतःचा हिस्सा आहे. आधुनिक बायोफ्लॉक तंत्रज्ञानाचा वापर करून मत्स्य उत्पादन वाढवणे व स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे मा. सचिव डॉ. रामास्वामी एन. यांनी नागपूर जिल्ह्यातील जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयाला भेट दिली. यावेळी मा. सचिव महोदयांनी जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयातील बाह्यरुग्ण उपचार विभाग, शल्यचिकित्सा विभाग व इतर कार्यान्वित सुविधांची पाहणी करत कामकाजाची माहिती घेतली. संबंधित अधिकाऱ्यांना यावेळी मा. सचिव महोदयांनी आवश्यक निर्देश दिले.

परळी, जि. बीड येथील नियोजित पशुवैद्यकीय व पशुविज्ञान महाविद्यालय करिता हस्तांतरीत जमीनीची पाहणी करताना मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. समवेत मा. श्री. एन. बी. पाटील (कुलगुरू, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर), मा. डॉ. प्रवीणकुमार देवरे (आयुक्त पशुसंवर्धन), डॉ. शितलकुमार मुकणे (अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन), श्री. स्वामी (कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई), श्री. आरीफ शेख (विद्यापीठ अभियंता मपमविवि नागपुर) आदी.

बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे दि. ३० जानेवारी ते ०१ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील भव्य पशुपक्षी प्रदर्शनाच्या पूर्वतयारीला वेग आला आहे. राज्याचे पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन. यांनी परळी येथे प्रत्यक्ष भेट देऊन नियोजित प्रदर्शनाच्या जागेची पाहणी केली व तयारीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांना प्रदर्शनाचे नियोजन उत्कृष्ट दर्जाचे असावे, अशा सूचना देत आवश्यक मार्गदर्शन केले.

पाहणी दरम्यान डॉ. रामास्वामी एन. यांनी प्रदर्शनासाठी निश्चित करण्यात आलेल्या जागेची उपयुक्तता, पशुपक्ष्यांच्या राहण्याची सोय, येणाऱ्या शेतकऱ्यांसाठीच्या सुविधा व प्रदर्शनाचे तांत्रिक नियोजन यावर सविस्तर चर्चा केली. हे प्रदर्शन राष्ट्रीय स्तरावरचे असल्याने यामध्ये विविध राज्यांतील उत्कृष्ट पशू व पक्ष्यांच्या प्रजाती पाहायला मिळतील. बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्याच्या अर्थव्यवस्थेला व पशुसंवर्धनाला चालना मिळण्याच्या दृष्टीने हे प्रदर्शन मैलाचा दगड ठरणार आहे.

मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांच्याकडून रामरक्षा गोशाळेचे कौतुक

परळी वैजनाथ: पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन. यांनी येथील रामरक्षा गोशाळेला सदिच्छा भेट दिली. त्यांनी गोशाळेतील व्यवस्थापन, पशुधनाची जात व आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराची बारकाईने पाहणी केली. गोशाळेतील रेकॉर्ड व शिस्तबद्ध व्यवस्थापन पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

मा. सचिव महोदयांनी आपल्या दौऱ्यात गोशाळेतील विविध विभागांची प्रत्यक्ष पाहणी करून समाधान व्यक्त केले. 'सेक्स सॉर्टेड सिमेन' वापरून जन्मलेल्या वासरांची त्यांनी पाहणी केली. गोशाळेतील कांक्रेज ब्रीड व वळूंची पाहणी केली, तसेच जन्मतः दोन्ही डोळ्यांनी आजारी असलेल्या कपीला गाईचीही त्यांनी गोशाळा संचालकांकडे विचारणा करत पाहणी केली. पशुधनाच्या संगोपनासाठी दर तीन महिन्याला जंतनाशक, मिनरल मिक्स्चर व नियमित लसीकरण करण्याच्या प्रोटोकॉलची त्यांनी माहिती घेतली. चारा शेडमधील मुरघासाची गुणवत्ता व गाईंच्या त्वचेवरील चकाकी पाहून त्यांनी येथील उत्तम संगोपनाबद्दल समाधान व्यक्त केले.

गोशाळेच्या भविष्यातील वाटचालीसाठी डॉ. रामास्वामी एन. यांनी उत्पादकतेनुसार निरोगी गाईंचे गट तयार करून, चांगल्या गाईंचा वापर 'एम्ब्रियो ट्रान्सफर' (ET) साठी 'सरोगेट मदर' म्हणून करावा. तसेच, लवकरच आयव्हीएफ (IVF) लॅबबाबत चर्चा करून हे काम सुरू करण्याचे निर्देश दिले. रामरक्षा गोशाळेचे रूपांतर 'प्रशिक्षण केंद्रात' करून पशुपालकांना 'गो-आधारित शेती'चे प्रशिक्षण देण्यात यावे, शेणावर प्रक्रिया करून सेंद्रिय शेतीसाठी 'कल्चर' वापरून दाणेदार खत तयार करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. 'व्हीएमडीडीपी' अंतर्गत येथील कालवडी शेतकऱ्यांना द्याव्यात किंवा विक्री कराव्यात, जेणेकरून जातिवंत पशुधनाचा प्रसार होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली. या उपक्रमासाठी कुलगुरूंनी सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले असून, शिरवळ व परभणी येथील तज्ज्ञांची टीम लवकरच मार्गदर्शनासाठी पाठवण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रकल्पासाठी चारा उपलब्ध करण्यासाठी लँड डेव्हलप न करता सदरील जमिनीत महाजनकोचे सोलार प्लेट्स बसवून त्यापासून उपलब्ध होणाऱ्या निधीतून शेतकऱ्यांबरोबर करार करून चारा खरेदी करणेबाबत कार्यवाही करावी. प्रकल्प जमिनीवर जास्तीत जास्त प्रमाणात वृक्ष लागवड करावी. पाणी उपलब्धतेसाठी हरण तलावातून प्रकल्पापर्यंत पाणी आणण्यासाठी जिल्हा वार्षिक योजने च्या निधीतून प्रयत्न करावेत.सदरील प्रकल्प विहित वेळेत पूर्ण करून कार्यान्वित करावा, अशा सूचना मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांनी दिल्या.

मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी व मेंढी विकास प्रक्षेत्र अंबाजोगाई भेट दिली. यावेळी त्यांनी प्रक्षेत्रावरील नमूद मंजूर कामे गुणवत्तापूर्ण पद्धतीने लवकरात लवकर पूर्ण करणेबाबत उचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले व प्रक्षेत्राच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले.

महामहिम राज्यपालांच्या उपस्थितीत पशुधनाच्या लसीकरणास प्रारंभ

नाशिक: राज्याचे महामहिम राज्यपाल सर्वश्री आचार्य देवव्रत हे नाशिक दौऱ्यावर असताना त्यांचे हस्ते खोरीपाडा (ता. दिंडोरी, जि. नाशिक) येथील शेतकऱ्यांना चारा बियाणे व जंतनाशक औषधांचे वाटप करण्यात आले. यावेळी मा. राज्यपाल महोदयांच्या उपस्थितीत पशुधनास लाळखुरकूत प्रतिबंधक रोगाची प्रातिनिधीक स्वरुपात लस टोचून लसीकरण कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमास अन्न व औषध प्रशासनमंत्री मा. नरहरी झिरवाळ, खासदार भास्कर भगरे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार आदी उपस्थित होते. यावेळी पिंपरखेड येथे 'शासन आपल्या दारी' उपक्रमांतर्गत पशुसंवर्धन विभागामार्फत उभारलेल्या स्टॉलला राज्यपालांनी भेट दिली. चाऱ्यासाठी मका व ज्वारी बियाण्यांचे वाटप राज्यपालांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. बी. आर. नरवाडे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. प्रशांत धर्माधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. संजय शिंदे, गटविकास अधिकारी भास्कर रेंगडे, सहायक गटविकास अधिकारी भरत वेंधे व पशुधन विकास अधिकारी (विस्तार) डॉ. भगवान पाटील उपस्थित होते.

लातूरमधील एएचआयडीएफ प्रकल्पांची मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांच्याकडून पाहणी

लातूर: राज्याचे पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन. यांनी १८ नोव्हेंबर २०२५ रोजी लातूर जिल्ह्याचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी पशुसंवर्धन पायाभूत सुविधा विकास निधी (A.H.I.D.F.) अंतर्गत मौजे शिंदाळवाडी (ता. औसा) येथील 'विजय फीड्स' या प्रकल्पाला भेट देऊन प्रकल्पाच्या कामकाजाची सविस्तर पाहणी केली.

सन २०२२-२३ मध्ये सुरू झालेला हा प्रकल्प अत्यंत यशस्वीरीत्या कार्यरत असल्याबद्दल मा. सचिव महोदयांनी समाधान व्यक्त केले. प्रकल्पाची प्रगती पाहून त्यांनी संचालक डॉ. विजय जाधव यांचे विशेष अभिनंदन केले व या यशस्वी प्रकल्पाची 'व्हिडिओ यशोगाथा' तयार करण्याच्या सूचनाही अधिकाऱ्यांना दिल्या. याप्रसंगी मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे, अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ. शीतलकुमार मुकणे, प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, लातूर विभाग डॉ. नानासाहेब सोनवणे, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (लातूर) डॉ. राजकुमार पडिले, सहाय्यक आयुक्त डॉ. श्रीधर शिंदे, औसा येथील सहाय्यक आयुक्त डॉ. विजय देशमुख यांच्यासह विभागाचे विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पाहणी दरम्यान प्रकल्पाच्या गुंतवणुकीबाबत संचालक डॉ. विजय जाधव यांनी सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, या प्रकल्पासाठी एकूण ₹७.५० कोटी इतकी गुंतवणूक करण्यात आली आहे. एकूण गुंतवणुकीपैकी ₹२.९३ कोटी रुपये आधुनिक मशिनरीसाठी खर्च करण्यात आले आहेत. ए.एच.आय.डी.एफ. योजनेअंतर्गत कर्जावरील व्याजामध्ये ३% अनुदान मिळत असून, केंद्र सरकारमार्फत आतापर्यंत ₹१३.६१ लाख इतके अनुदान मंजूर झाल्याची माहिती डॉ. विजय जाधव यांनी दिली.

गो-आधारित नैसर्गिक शेती काळाची गरज;
सचिव डॉ. रामास्वामी एन. यांची 'सुभद्रा गोपालन केंद्रा' स भेट

उदगीर: पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन. यांनी लातूर जिल्ह्यातील लोहारा (ता. उदगीर) येथे भेट देऊन 'सुभद्रा नैसर्गिक शेतकरी स्वयंसाहाय्यता बचत गट व सुभद्रा गोपालन केंद्राच्या कार्याची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी कृषिभूषण श्यामभाऊ सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या गो-आधारित नैसर्गिक शेती प्रयोगाचे विशेष कौतुक केले.

डॉ. रामास्वामी यांनी सोनटक्के परिवाराच्या शेतीला भेट देऊन तिथे राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती घेतली. विशेषतः पशुपालन व शेती यांची सांगड घालून कशाप्रकारे नैसर्गिक पद्धतीने उत्पादन घेतले जाते, यावर त्यांनी सोनटक्के यांच्याशी सविस्तर चर्चा केली. जमिनीचा पोत सुधारण्यासाठी व विषमुक्त अन्नाच्या उत्पादनासाठी गो-आधारित शेती हा सर्वोत्तम पर्याय असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

या भेटीदरम्यान सचिव महोदयांसोबत राज्यातील पशुवैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील डॉ. नितीन पाटील (अधिष्ठाता व कुलगुरू, माफसू (MAFSU), नागपूर), डॉ. बोंडे (संचालक, विस्तार शिक्षण विभाग, माफसू, नागपूर), डॉ. अनिल भिकाने (संचालक, शिक्षण विस्तार, माफसू, नागपूर), डॉ. नानासाहेब सोनवणे (सहआयुक्त, पशुसंवर्धन विभाग, लातूर), डॉ. अशोक देवंग्रे (सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर) तसेच मा. वखार खान (नागपूर), ज्येष्ठ मार्गदर्शक चंदरराव सोनटक्के, रामभाऊ सोनटक्के व सोनटक्के परिवारातील सदस्य उपस्थित होते.

'सुभद्रा गोपालन केंद्र' हे केवळ एक केंद्र नसून ते ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी एक आदर्श मॉडेल ठरत आहे. बचत गटाच्या माध्यमातून चालणारे हे कार्य नक्कीच पथदर्शी आहे. पशुसंवर्धन विभागाने अशा उपक्रमांना नेहमीच प्रोत्साहन दिले आहे व यापुढेही अशा उपक्रमांना चालना देण्यात येईल, असे आश्वासनही मा. सचिव महोदयांनी यावेळी देण्यात आले.

शेळीपालन व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड द्या;

मा.सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांचे आवाहन

लातूर: राज्याच्या पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.) यांनी नुकतीच लातूर जिल्ह्यातील भोकरंबा येथील 'बालाजी गोट फार्म' ला भेट दिली. राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत (NLM) विकसित करण्यात आलेल्या या शेळीपालन प्रकल्पाची त्यांनी बारकाईने पाहणी केली व ग्रामीण अर्थव्यवस्थेत शेळीपालनाचे महत्त्व अधोरेखित केले.

या दौऱ्यात बालाजी गोट फार्मचे प्रकल्प संचालक श्री. बालाजी मुस्कावाड यांनी फार्मच्या व्यवस्थापनाबद्दल सविस्तर माहिती दिली. शेळ्यांच्या जाती, त्यांचे आरोग्य व्यवस्थापन, खाद्याचे नियोजन व मार्केटिंग याबद्दल त्यांनी मान्यवरांना अवगत केले. सचिव महोदयांनी या प्रकल्पातील आधुनिक सोयीसुविधांचे कौतुक केले.

या महत्त्वपूर्ण भेटीदरम्यान मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.), अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ. शीतलकुमार मुकणे, प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त लातूर विभाग डॉ. नानासाहेब सोनवणे, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. राजकुमार पडिले, पशुधन विकास अधिकारी डॉ. श्रीधर शिंदे, डॉ. साळवे, डॉ. पडगलवार, डॉ. गायके, डॉ. बायस, डॉ. निटूरे यांच्यासह विभागातील इतर अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रीय पशुधन अभियानाला गती

केंद्र व राज्य सरकारच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या राष्ट्रीय पशुधन अभियानामुळे सुशिक्षित तरुणांना शेळीपालनासारख्या व्यवसायात मोठी संधी उपलब्ध झाली आहे. 'बालाजी गोट फार्म' सारख्या यशस्वी प्रकल्पांमुळे इतर शेतकऱ्यांनाही प्रेरणा मिळेल, असा विश्वास यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. सचिव डॉ. रामास्वामी एन. यांनी प्रकल्पाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांची उदगीर 'COVAS' ला भेट

उदगीर: राज्याच्या पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन. यांनी उदगीर येथील पशुवैद्यकीय व प्राणी विज्ञान महाविद्यालयाला (COVAS) सदिच्छा भेट दिली. या दौऱ्यात त्यांनी महाविद्यालयांतर्गत येणाऱ्या डेअरी फार्म, विविध प्रयोगशाळा व महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (MAFSU) उपकेंद्राच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.

सचिव महोदयांनी महाविद्यालयातील शैक्षणिक व संशोधन कार्याची माहिती घेण्यासाठी विविध विभागांना भेटी दिल्या. फार्ममधील दुभत्या जनावरांचे व्यवस्थापन, दुग्ध उत्पादन व वैरण विकास प्रकल्पाची त्यांनी पाहणी केली. प्रयोगशाळांमध्ये सुरू असलेले संशोधन, पशुधनावरील उपचार व तपासणीसाठी उपलब्ध असलेल्या आधुनिक यंत्रणेबाबत त्यांनी शास्त्रज्ञांशी चर्चा केली. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या उपकेंद्राद्वारे राबवले जाणारे विस्तार शिक्षण व शेतकरी प्रशिक्षण उपक्रमांची त्यांनी माहिती घेतली.

याप्रसंगी सचिव डॉ. रामास्वामी एन. यांच्यासोबत पशुवैद्यकीय क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारी व तज्ज्ञ उपस्थित होते. त्यांनी महाविद्यालयातील प्राध्यापक व संशोधकांशी संवाद साधताना सांगितले की, पशुवैद्यकीय शिक्षणासोबतच प्रत्यक्ष क्षेत्रात (Field) काम करणाऱ्या पशुपालकांना त्याचा लाभ मिळणे आवश्यक आहे. महाविद्यालयाने नवनवीन तंत्रज्ञान विकसित करून ते सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

या दौऱ्यावेळी माफसू नागपूरचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, संचालक डॉ. बोंडे, डॉ. अनिल भिकाणे, प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, लातूर विभाग डॉ. नानासाहेब सोनवणे, COVAS चे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अशोक देवंग्रे व महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उदगीर येथील हे महाविद्यालय पशुसंवर्धन क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करत असल्याबद्दल डॉ. रामास्वामी यांनी समाधान व्यक्त केले.

सोलापूर येथील सधन कुक्कुट विकास गटाला मा. सचिवांची भेट

आधुनिक उपकरणांच्या वापरासह सेवा तत्परतेचे निर्देश

सोलापूर: पशुसंवर्धन विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन. यांनी सोलापूर येथील सधन कुक्कुट विकास गटाला भेट देऊन प्रकल्पाची पाहणी केली. हा प्रकल्प जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी 'पथदर्शी' ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. याप्रसंगी मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.) अतिरिक्त आयुक्त डॉ. शितलकुमार मुकणे, पुणे विभागाचे प्रादेशिक सहआयुक्त डॉ. समीर बोरकर, लातूर विभागाचे प्रादेशिक सहआयुक्त डॉ. नाना सोनवणे आदी उपस्थित होते.

प्रकल्पाच्या सक्षमीकरणासाठी मार्गदर्शन करताना डॉ. रामास्वामी यांनी विविध तांत्रिक व प्रशासकीय सूचना दिल्या. प्रकल्पातील बंद असलेल्या मशिनरी तत्काळ कार्यान्वित करण्यासाठी अभियत्यांकडून खर्चाचे अंदाजपत्रक घेण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच, जास्तीत जास्त पशुपालकांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रशिक्षण बॅचेसची संख्या वाढवण्यावर त्यांनी भर दिला. निधीची उपलब्धता होताच निवासी प्रशिक्षणाचे नियोजन करण्याचे आदेशही त्यांनी प्रशासनाला दिले.

पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या कामकाजाबाबत बोलताना सचिव महोदयांनी स्पष्ट केले की, दवाखान्यांमध्ये आधुनिक उपकरणे जसे की एक्स-रे, सोनोग्राफी व ब्लड ॲनालायझर यांचा प्रभावी वापर व्हायला हवा. केवळ दवाखान्यात येणाऱ्या जनावरांवरच उपचार करण्यावर न थांबता, गरज पडल्यास पशुपालकांच्या गोठ्यावर जाऊन 'घरपोच सेवा' देण्याचे आवाहन त्यांनी केले. दैनंदिन कामकाज, लसीकरण व कृत्रिम रेतनाची माहिती 'NDLM' पोर्टल व खात्याच्या वेबसाईटवर तत्काळ ऑनलाईन भरण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. औषध साठ्याबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, औषधे कपाटात व्यवस्थित लावून ठेवावीत, ती मुदतबाह्य होणार नाहीत याची दक्षता घ्यावी व जास्तीत जास्त औषधांचा पुरवठा पशुपालकांना करावा.

दवाखाना व कार्यालयीन परिसरात स्वच्छता राखणे अनिवार्य आहे. दवाखान्याची पडझड किंवा किरकोळ दुरुस्ती असल्यास ती विनाविलंब करून घ्यावी. तसेच सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दवाखान्याच्या वेळांचे काटेकोरपणे पालन करावे, असे निर्देशही त्यांनी दिले. तज्ज्ञ डॉक्टरांनी नवनवीन संशोधन करून त्याचे लाभ पशुपालकांपर्यंत पोहोचवावेत व नवीन डॉक्टरांना योग्य प्रशिक्षण द्यावे, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

मा. विभागीय आयुक्तांची रोग अन्वेषण संस्थेस सदिच्छा भेट

मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार व मा. आयुक्त, पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी रोग अन्वेषण विभाग, औंध (पुणे) येथे भेट दिली. सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. अंकुश परिहार यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

मान्यवरांनी बीएसएल-३ व बीएसएल-२ प्रयोगशाळांमधील विविध विभागांची पाहणी केली. प्रयोगशाळेत उपलब्ध असलेल्या अत्याधुनिक यंत्रसामुग्रीची, जसे की 'नेक्स्ट जनरेशन सिक्वेन्सर', 'रिअल टाइम पीसीआर' व 'ऑटोमॅटिक बायोकेमिस्ट्री ॲनालायझर'ची माहिती घेऊन त्यांनी तांत्रिक बाबी समजून घेतल्या. एनएबीएल (NABL) नामांकन व लिम्स (LIMS) प्रशिक्षणाबाबत समाधान व्यक्त करत, त्यांनी नवीन प्रयोगशाळा तातडीने कार्यान्वित करण्याचे निर्देश दिले.

'क्लासिकल स्वाईन फीव्हर'साठी लसीकरणाद्वारे प्रतिबंध हाच उपाय:
'माफसू' कुलगुरू प्रा. डॉ . नितीन पाटील यांचे प्रतिपादन

शिरवळ (जि. सातारा): वराहपालन हा पशुपालकांसाठी आर्थिकदृष्ट्या अत्यंत फायदेशीर व्यवसाय आहे. मात्र, 'क्लासिकल स्वाईन फीव्हर' (CSF) या रोगामुळे वराहपालकांचे मोठे आर्थिक नुकसान होते. या रोगाचा प्रसार रोखण्यासाठी व त्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी लसीकरण हाच एकमेव व प्रभावी उपाय आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे (माफसू) कुलगुरू प्रा. डॉ. नितीन पाटील यांनी केले.

माफसू व पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने, राष्ट्रीय पशुधन आरोग्य व रोग नियंत्रण योजनेअंतर्गत 'क्लासिकल स्वाइन फिव्हर नियंत्रण कार्यक्रम' या विषयावर एक दिवसीय लसीकरण जनजागृती कार्यशाळेचे आयोजन शिरवळ येथील क्रांतीसिंह नाना पाटील पशुवैद्यक महाविद्यालयात १२ नोव्हेंबर २०२५ रोजी करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन आभासी (Online) पद्धतीने करण्यात आले. यावेळी मा. कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांच्यासह पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतलकुमार मुकणे व विद्याशाखेचे संचालक प्रा. डॉ. शिरीष उपाध्ये उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. शीतलकुमार मुकणे म्हणाले की, "आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत वराह मांसाला मोठी मागणी आहे. परंतु, या रोगामुळे उत्पादनावर परिणाम होतो. वराहपालकांनी या रोगाचे महत्त्व ओळखून जनजागृती कार्यशाळांचा लाभ घ्यावा." कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विस्तार शिक्षण संचालक डॉ. सचिन बोंडे होते. त्यांनी आवाहन केले की, या रोगाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पशुपालक व प्रशासन यांनी एकजुटीने काम करणे गरजेचे आहे.

वराहपालनाशी संबंधित विविध तांत्रिक विषयांवर तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले. राज्यातून २११ वराहपालक व प्रशिक्षणार्थींनी या कार्यशाळेत सहभाग नोंदवला. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी या रोगाविषयी जनजागृती करणारी एक प्रभावी नाटिका सादर केली. व्यासपीठावर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विकास वासकर, माजी सहयोगी अधिष्ठाता डॉ. हेमंत बिराडे, सहआयुक्त पशुसंवर्धन, रोग अन्वेषण विभाग डॉ. अंकुश परिहार, सहाय्यक आयुक्त डॉ. बी. डी. कदम व प्रशिक्षण समन्वयक डॉ. गोकुळ सोनवणे उपस्थित होते.

'ॲनिमल बर्थ कंट्रोल प्रोटोकॉल'ची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक

पशुवैद्यकीय शल्यचिकित्सकांसाठी राज्यस्तरीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन

पुणे: मा. सर्वोच्च न्यायालयाने SOU MOTO WRIT PETITION No ५/२०२५ मध्ये दि. ०७.११.२०२५ रोजी अंतरीम निर्णयान्वये राज्यात Animal Birth Control Rule ची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार राज्यातील भटक्या श्वानांच्या संख्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी व प्राणी कल्याणासाठी केंद्र सरकारने आखून दिलेल्या 'ॲनिमल बर्थ कंट्रोल' (ABC) प्रोटोकॉलच्या मार्गदर्शक सूचनांचा सूक्ष्म अभ्यास करणे ही काळाची गरज आहे, असे मत पशुसंवर्धन विभागातील तज्ज्ञांनी व्यक्त केले.

Animal Birth Control Rule ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन विभागाकडील सर्व पशुधन विकास अधिकारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिपत्याखालील पशुवैद्यकांना १ दिवसीय उजळणी प्रशिक्षणाचे आयोजन करण्याबाबत शासनस्तरावरुन निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुषंगाने महाराष्ट्र शासन, पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ व राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र (गोखलेनगर) यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. २३ डिसें.२५) पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे - ६७ येथील कामधेनू सभागृहात आयोजित एक दिवसीय राज्यस्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत राज्यातील सर्व जिल्ह्यांतील निष्णात पशुशल्यचिकित्सकांनी सहभाग नोंदवला.

व्यासपीठावर डॉ. शितलकुमार मुकणे (अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन), डॉ. देवेंद्र जाधव (सहआयुक्त, पशुधन व नियोजन), डॉ. अंकुश परिहार (सहआयुक्त, रोग अन्वेषण विभाग), डॉ. शिवाजी पवार (उपआयुक्त, महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ), डॉ. प्रशांत भड (प्राचार्य, राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र, गोखलेनगर) यांचेसह राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र (गोखलेनगर) संस्थेचे सहाय्यक आयुक्त डॉ. प्रदीप खंडाळे, व्याख्याते डॉ. इरफान सय्यद, इंडिया वर्ल्डवाईड व्हेटरनरी सर्व्हिसेसचे संचालक (विशेष मोहिम) व्याख्याते डॉ. इरफान सय्यद, इंडिया वर्ल्डवाईड व्हेटरनरी सर्व्हिसेसचे संचालक डॉ.

(विशेष मोहिम) डॉ. शशिकांत जाधव, निर्मिती पिपल्स एन्ड ॲनिमल वेल्फेअर सोसायटीचे डॉ. राहुल बोंबटकर, सुपर स्पेशालिटी व्हेटरनरी हॉस्पिटलचे सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. बाळासाहेब गायकवाड, पवैद मुंढवाचे डॉ. अभिजीत क्षिरसागर यांनीही या विषयावर आपले विचार मांडले.

या कार्यक्रमाचे स्वरूप दोन सत्रांत विभागले होते. सकाळच्या सत्रात 'ॲनिमल बर्थ कंट्रोल प्रोटोकॉल' या विषयावर तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये श्वानांच्या शस्त्रक्रिया करताना पाळावयाचे नियम, स्वच्छता व शस्त्रक्रियेनंतरची काळजी यावर सविस्तर चर्चा झाली.

दुपारच्या सत्रात औंध येथील सुपरस्पेशालिटी व्हेटरनरी हॉस्पिटल येथे प्रत्यक्ष श्वानांवर शस्त्रक्रिया करून सहभागी प्रशिक्षणार्थींना प्रात्यक्षिकांद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून निर्बीजीकरण कसे करावे, याचे प्रशिक्षण यावेळी देण्यात आले. शहरांमधील वाढती श्वानांची संख्या व त्यातून उद्भवणारे मानवी संघर्ष टाळण्यासाठी शास्त्रोक्त पद्धतीने निर्बीजीकरण करणे आवश्यक आहे. या प्रशिक्षणामुळे राज्यातील शल्यचिकित्सकांना अद्ययावत प्रोटोकॉलची माहिती मिळाली असून, त्याचा फायदा स्थानिक पातळीवर प्रभावी अंमलबजावणीसाठी होणार आहे.

वस्तुतः भारतीय राज्यघटनेतील कलम २४३ व २४६ मधील तरतूदी व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६६ मधील तरतूदी तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील कलम १६१ ते १६८ मधील तरतूदीनुसार Animal Birth Control Rule ची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी अनुक्रमे नगरविकास विभाग व ग्रामविकास विभागाच्या अधिपत्याखालील स्थानिक स्वराज्य संस्थांची आहे. तथापि प्रस्तुत स्थानिक स्वराज्य संस्थांकडे पुरेसे पशुवैद्यक नसल्याने पशुसंवर्धन विभागाकडील पशुवैद्यकांच्या सेवा उपलब्ध करुन देण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडून होत आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या पशुसंवर्धन विभागाकडील पशुधन विकास अधिकारी यांना Animal Birth Control Rule ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आवश्यकतेनुसार सेवा उपलब्ध करुन देण्यात याव्यात, असे १८ डिसेंबर २०२५ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या निर्णयाद्वारे शासनाने निर्देशित केले आहे.

सर्व छायाचित्रे: अथर्व गान, एनएलएम

शाश्वत प्रगतीची नवी दिशा!

चांदवली (ता. वाई, जि. सातारा) येथील सौ. अश्विनी विनायक शिंदे यांनी 'नॅशनल लाइव्हस्टॉक मिशन'च्या (NLM) माध्यमातून शेळीपालनाचा एक भव्य प्रकल्प (१००+०५) उभारला आहे. नुकतीच या प्रकल्पाची डॉ. देवेंद्र जाधव, सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (पशुधन व नियोजन) यांनी पाहणी केली. सदर प्रकल्प अत्यंत शास्त्रोक्त पद्धतीने राबवला जात आहे. शेळ्यांसाठी उत्तम चारा व्यवस्थापन, स्वच्छ गोठा व वेळोवेळी होणारे लसीकरण यामुळे हा गट माईलस्टोन-२ साठी पात्र ठरला आहे. ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी हा प्रकल्प दिशादर्शक ठरत आहे. यावेळी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्रकल्पाच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करत प्रकल्पाच्या विस्तार व विकासासाठी संचालकांना आवश्यक मार्गदर्शन केले.

पशुसंवर्धन आयुक्तालयात सायबर सुरक्षा विषयावर प्रशिक्षण संपन्न

पुणे: राज्यस्तरीय प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या वतीने आज पशुसंवर्धन आयुक्तालयामध्ये 'सायबर सुरक्षा' (Cyber Security) या विषयावर विशेष प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी 'यशदा' येथील सायबर तज्ज्ञ **श्री. मुकुंद नाडगौडा** यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. इंटरनेट सर्फिंग करताना घ्यायची काळजी, मोबाईल सुरक्षा, ई-मेल हाताळणी व वाढत्या सायबर फसवणुकीपासून बचाव करण्यासाठी कोणत्या दक्षता घ्याव्यात, याचे सविस्तर मार्गदर्शन नाडगौडा यांनी यावेळी केले.

नागापुरात पशुप्रदर्शनी व रोगनिदान शिबिर उत्साहात संपन्न

उमरखेड (यवतमाळ): तालुक्यातील नागापूर येथे 'संकल्प ग्रामविकास अभियान सप्ताहा'चे औचित्य साधून भव्य पशुप्रदर्शनी व रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात उत्कृष्ट दुधाळ गायी व म्हशींच्या प्रदर्शनासह पशुधनाच्या आरोग्यासाठी राबविण्यात आलेल्या शिबिराला परिसरातील पशुपालकांनी मोठा प्रतिसाद दिला.

अध्यक्षस्थानी यवतमाळ जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. मंगेश काळे, तर प्रमुख अतिथी म्हणून सहाय्यक आयुक्त डॉ. क्रांती काटोले यांची उपस्थिती होती. शिबिरामध्ये सुमारे ७० पशुपालकांनी आपल्या पशुधनाची आरोग्य तपासणी करून घेतली. यावेळी उच्च उत्पन्न देणाऱ्या दुभत्या गायी व म्हशींच्या प्रदर्शनाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. प्रदर्शनात सहभागी जनावरांची तज्ज्ञांमार्फत निवड करून त्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. तसेच यावेळी विविध प्रात्यक्षिके व तज्ज्ञांचे मार्गदर्शन सत्रही पार पडले.

अध्यक्षीय भाषणात बोलताना डॉ. मंगेश काळे यांनी पशुपालन व दुग्ध व्यवसायातील आधुनिक संधींवर प्रकाश टाकला. पशुपालकांनी केवळ पारंपरिक पद्धतीने न थांबता व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून दुग्ध व्यवसायाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. क्रांती काटोले यांनीही उपस्थित पशुपालकांना शासनाच्या विविध योजना व पशुधनाच्या संगोपनाबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन पशुसंवर्धन विभाग, उमरखेड यांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन पळशी येथील पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रतीक इंगळे यांनी मानले. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी उमरखेड तालुक्यातील पशुधन विकास अधिकारी डॉ. सेवनकर, डॉ. गव्हाड, डॉ. पवार, डॉ. शिंदे यांच्यासह विभागातील सर्व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. नागापूर व परिसरातील पशुपालकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हे अभियान यशस्वी ठरले.

पडेगाव येथे तीन दिवसीय शेळीपालन प्रशिक्षण संपन्न

१२० प्रशिक्षणार्थींचा उत्स्फूर्त सहभाग

छत्रपती संभाजीनगर: पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र, पडेगाव येथे आयोजित करण्यात आलेले तीन दिवसीय शेळीपालन प्रशिक्षण शिबिर नुकतेच उत्साहात पार पडले. दि. २२ ते २४ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजित या प्रशिक्षणात जिल्ह्यातील तब्बल १२० प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदवला.

शेळीपालन हा व्यवसाय केवळ जोडधंदा न राहता तो एक फायदेशीर उद्योग बनावा, या उद्देशाने हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. तीन दिवसांच्या या सत्रात तज्ज्ञांनी उस्मानाबादी, संगमनेरी यांसारख्या विविध जातींच्या शेळ्यांची निवड व पैदास तंत्र, बंदिस्त व अर्ध-बंदिस्त शेळीपालनातील चाऱ्याचे नियोजन व अझोला व मुरघासाचे महत्त्व, शेळ्यांना होणारे विविध आजार, त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय व वेळेवर लसीकरणाचे महत्त्व, शेळीपालनासाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय अनुदानित योजना व कर्ज प्रक्रियेची माहिती याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षणाचे खास वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये तरुण सुशिक्षित बेरोजगार व महिला बचत गटांच्या सदस्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. पडेगाव प्रक्षेत्रावरील प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांमुळे प्रशिक्षणार्थींना शेळीपालनातील तांत्रिक बाबी जवळून समजून घेता आल्या.

प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींना संस्थेच्या वतीने प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या प्रशिक्षणामुळे नवीन व्यावसायिक आत्मविश्वासाने या क्षेत्रात उतरू शकतील, असा विश्वास प्रक्षेत्राच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळा'मार्फत राबवल्या जाणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

ॲनिमल बर्थ कंट्रोल प्रोटोकॉलच्या अनुषंगाने ठाणे जिल्ह्यातील सर्व पशुधन विकास अधिकारी यांना एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, मुंबई विभाग डॉ. प्रशांत कांबळे व जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ.वल्लभ जोशी उपस्थित होते. सदरील प्रशिक्षणामध्ये ॲनिमल बर्थ कंट्रोल बाबतचे शास्त्रोक्त मार्गदर्शन व शस्त्रक्रिया होणेपुर्वी व झालेनंतर घ्यावयाची काळजी, याबाबत डॉ. करुणा डोंगरदिवे व डॉ.लक्ष्मण पवार यांनी विस्तृत मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे सदस्य डॉ. नितीन मार्कंडेय व सदस्य सचिव तथा सहआयुक्त पशुसंवर्धन, पुणे डॉ. शामकांत पाटील यांनी ABS Genus Semen Center भिलवडीला भेट दिली व चितळे ग्रुपचे चेअरमन विश्वास चितळे यांच्यासोबत चर्चा केली. यावेळी जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. अजयनाथ थोरे व ABS Genus Semen Center चे अधिकारी उपस्थित होते.

मुक्या प्राण्यांची सेवा व आधुनिक उपचार तंत्र

पशुसंवर्धन प्रशिक्षणार्थींनी अनुभवला 'RESQ' च्या आधुनिक कार्यप्रणालीचा मंत्र

पुणे: येथील राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्रामध्ये पशुधन विकास अधिकारी व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन यांच्यासाठी आयोजित १३ दिवसीय पायाभूत तांत्रिक प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून, प्रशिक्षणार्थींसाठी संस्थेचे प्राचार्य डॉ. प्रशांत भड यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे येथील प्रसिद्ध RESQ चॅरिटेबल ट्रस्ट येथे भेटीचे नियोजन करण्यात आले होते.

RESQ ट्रस्ट ही जखमी, आजारी व गरजू वन्य प्राण्यांच्या बचाव व पुनर्वसनासाठी कार्यरत असलेली एक संस्था आहे. या संस्थेच्या भेटीदरम्यान, प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना RESQ चॅरिटेबल ट्रस्टचे प्रमुख पशुवैद्यक डॉ. सुश्रुत शिरभाते व वरिष्ठ पशुवैद्यक डॉ. कल्याणी ठाकूर यांच्याकडून वन्य प्राण्यांवर कठीण परिस्थितीत कसे उपचार केले जातात, मोठ्या प्राण्यांचे व्यवस्थापन, त्यांच्या निवाऱ्याची रचना व उपचारांची प्रभावी कार्यपद्धती, प्राण्यांचे बचाव कार्य (Rescue Operations), प्रथमोपचार, शस्त्रक्रिया तसेच पुनर्वसन (Rehabilitation) यांसारख्या विषयांवर महत्त्वपूर्ण मार्गदर्शन लाभले.

प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांसाठी ही भेट अत्यंत प्रेरणादायी व ज्ञानवर्धक ठरली. यातून त्यांना पशुसंवर्धनाच्या कामाची व्याप्ती व समाजासाठी प्राण्यांच्या कल्याणाचे महत्त्व अधिक स्पष्ट झाले.

ज्ञानात भर घालणारी भेट

शासकीय सेवेत रुजू होणाऱ्या नवीन अधिकाऱ्यांना केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे, तर अशा सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून चालणाऱ्या प्राण्यांवरील प्रत्यक्ष उपचार व व्यवस्थापनाची कल्पना येणे आवश्यक आहे. अशा प्रशिक्षण भेटीमुळे प्रशिक्षणार्थींना त्यांच्या पुढील सेवाकाळात प्राण्यांवर अधिक प्रभावीपणे काम करण्यासाठी नक्कीच मदत मिळेल.

डॉ. प्रशांत भड
प्राचार्य : राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र,
गोखलेनगर, पुणे

रशियन प्रतिनिधी मंडळाचा राज्य दौरा; पशुसंवर्धन विभागाच्या कार्याची घेतली दखल

रशियातील प्रतिनिधी मंडळाने नाशिकला भेट दिली. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. बाबुराव नरवडे यांनी प्रतिनिधी मंडळाचे स्वागत करुन पशुसंवर्धनविषयक उपक्रमांची माहिती दिली. प्रतिनिधी मंडळाने पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, प्रादेशिक रोग अन्वेषण प्रयोगशाळेला (RDIL) भेट दिली. जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन डॉ. धर्माधिकारी, डॉ. आहेर, डॉ. मिलिंद भणगे व डॉ. पाटील उपस्थित होते.

रशियातील व्लादिमीर शहराचे डॉ. अलेक्झांडर शिशकोव्ह यांनी मिरज येथील जनावरांचा बाजार व जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयाला (DVPC) भेट दिली. भारत रशियाला मांसाची निर्यात करत आहे, त्या अनुषंगाने बाजारपेठेतून जनावरांची, विशेषतः म्हशींची खरेदी कशी केली जाते व ती कत्तलखान्यापर्यंत कशी स्थलांतरित केली जातात, याची कार्यप्रणाली त्यांना जाणून घ्यायची होती.

जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, मिरज येथे सदिच्छा भेट देऊन त्यांनी आपल्याकडील लसीकरण वेळापत्रक, उपचार पद्धती इत्यादी यंत्रणेविषयी सविस्तर चर्चा केली. येथील बाह्यरुग्ण विभागातील (OPD) गर्दी, क्ष-किरण (X-ray), सोनोग्राफी (USG) व पॅथॉलॉजी लॅबची पाहणी केल्यानंतर ओपीडीमधील रुग्णांची मोठी संख्या व उपचारपद्धती याबाबत शिष्टमंडळाने समाधान व्यक्त केले.

२०२६ **महापशुधनवार्ता** नववर्षाभिनंदन

उगवत्याचे स्वागत करुन मावळत्याचे आभार मानणारी कृष्णाकाठची प्रत्येक सायंकाळ अन् प्रत्येक सकाळ अशी रम्य असते. तिरावरल्या सुखदुःखाची जाणीव कृष्णामाईला नसली तरी संसारातील दुःख तळाशी ठेवत थकलेल्या जीवांवर सुखाचा असा जलाभिषेक ती नेहमी करते. त्यामुळेच कृष्णाकाठ संस्कृती व सभ्यतेचा प्रितीसंगम मानला जातो. त्यात माणुसकीचे सत्व आणि समर्पणाचे तत्व आहे; जे सामाजिक व ग्रामीण विकासाची पाळेमुळे अधिक घट्ट करतात.

शब्दांकन: संतोष पवार, महापशुधनवार्ता

छायाचित्र: @DREAMART

प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

वर्ष १ ले, अंक ९ वा, जानेवारी-२०२६

निमशिरगावमधील खिलार गाईच्या मोडलेल्या पायावर 'हँगिंग पिन कास्ट'द्वारे यशस्वी शस्त्रक्रिया

सांगली: पशुवैद्यकीय क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान व तज्ज्ञ डॉक्टरांच्या कौशल्याचा एक अनोखा प्रत्यय सांगली जिल्ह्यानजीक असलेल्या निमशिरगाव (जि. कोल्हापुर) येथे पाहायला मिळाला. येथील 'वेद गोशाळा' तील एका खिलार गाईच्या पूर्णपणे मोडलेल्या पायावर (Tibia Compound Fracture) अत्यंत गुंतागुंतीची व दुर्मिळ मानली जाणारी शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करुन, या गोमातेस पुन्हा उभे राहण्याची उमेद मिळाली आहे.

दि. १० डिसेंबर २०२५ रोजी निमशिरगाव येथील वेद गोशाळेतील एका खिलार गाईचा पाय पूर्णपणे मोडला होता. मांडीखालील हाड केवळ मोडले नव्हते, तर तिथे मोठी जखम झाली होती. अशा प्रकारच्या जखमेमध्ये हाड उघड्यावर असल्याने संसर्गाचा धोका मोठा असतो, तसेच नियमित प्लॅस्टर करणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य असते.

या आव्हानात्मक परिस्थितीत तज्ज्ञ डॉक्टरांच्या चमूने शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला. शस्त्रक्रिया मोठी असल्याने प्रथम गाईला पूर्ण भूल देण्यात आली. मोडलेले हाड अत्यंत कौशल्याने मूळ जागी बसवण्यात आले. मोडलेल्या हाडामध्ये 'आडवा रॉड' बसवून त्यावर 'हँगिंग पिन कास्ट' या विशेष पद्धतीने सिंथेटिक प्लॅस्टर करण्यात आले. जखम असल्याने व तिची दररोज मलमपट्टी करणे आवश्यक असल्याने, प्लॅस्टरमध्ये एक खिडकी (विंडो प्लॅस्टर) ठेवण्यात आली, जेणेकरून नियमित उपचार सुरू राहतील.

ही यशस्वी व अवघड शस्त्रक्रिया पशुसंवर्धन विभागाचे डॉ. सचिन वंजारी (सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, इस्लामपूर), डॉ. अंबादास माडकर (पशुधन विकास अधिकारी विस्तार, वाळवा) डॉ. प्रसाद पाटील (इस्लामपूर) यांनी यशस्वीपणे पार पाडली. या टीमने दाखवलेली तत्परता व वैद्यकीय कौशल्यामुळे एका मौल्यवान खिलार गाईचे प्राण वाचले आहेत. ग्रामीण भागातील पशुपालकांमध्ये या यशस्वी शस्त्रक्रियेची मोठी चर्चा असून, पशुवैद्यकीय विभागाच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

"पशुधन हीच ग्रामीण महाराष्ट्राची खरी संपत्ती आहे. अशा प्रकारच्या आधुनिक उपचार पद्धतीमुळे दुर्गम भागातील शेतकऱ्यांना व गोशाळांना मोठा दिलासा मिळत आहे." अशी प्रतिक्रिया जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. अजयनाथ थोरे यांनी यानिमित्ताने व्यक्त केली.

जन्माचे व्यंग हरले, वासरू धावले!

पथ्रोट येथील पशुधन विकास अधिकाऱ्यांनी केले अशक्य ते शक्य

अमरावती (पथ्रोट): विज्ञानाची जोड व डॉक्टरांचे कौशल्य असेल तर अशक्य गोष्टीही शक्य होतात, याचा प्रत्यय पथ्रोट येथे आला आहे. येथील पशुपालक श्री. भुजंगराव कोकाटे यांच्या गिर गाईच्या वासराला जन्मतःच पायाचे व्यंग होते, ज्यावर यशस्वी शस्त्रक्रिया करून डॉक्टरांनी त्याला नवे जीवन दिले आहे.

कोकाटे यांच्या घरी जन्मलेले गिर जातीचे नर वासरू सुदृढ होते, मात्र त्याच्या पुढच्या पायाचा 'फेटलॉक जॉइंट' आतल्या बाजूने पूर्णपणे वाकलेला होता. वासरू चालू शकत नसल्याने पशुपालकांनी सुरुवातीला घरगुती उपचार केले, पण यश आले नाही. अखेर हे अपंगत्व कायमस्वरूपी असल्याचे मानून त्यांनी आशा सोडली होती. वासरू १० दिवसांचे झाल्यावर खासगी पशुवैद्यकामार्फत ही केस डॉ. रोशन वेरूळकर (पशुधन विकास अधिकारी, पथ्रोट) यांच्याकडे आली. डॉ. वेरूळकर व डॉ. आदेश चोपडे यांनी तपासणीअंती निदान केले की, वासराचे 'डिजिटल फ्लेकसार टेंडोण' (स्नायू बंध) आकुंचन पावले आहेत. डॉक्टरांनी 'झेड टेनोटोमी' या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला. शस्त्रक्रियेदरम्यान आकुंचन पावलेले टेंडोण 'Z' आकारात कापून पुन्हा जोडण्यात आले, ज्यामुळे त्यांची लांबी वाढली व पाय सरळ झाला. शस्त्रक्रियेनंतर पायाला २० दिवसांसाठी पीव्हीसी पाइपचा (PVC Pipe) आधार देण्यात आला. २० दिवसांनंतर जेव्हा हे आवरण काढले, तेव्हा ते वासरू कोणत्याही आधाराशिवाय नैसर्गिकपणे चालू व बागडू लागले. या यशस्वी कामगिरीमुळे श्री. कोकाटे यांनी डॉक्टरांचे आभार मानले असून, परिसरात या यशस्वी शस्त्रक्रियेचे कौतुक होत आहे.

> आम्ही या वासराच्या स्नायूबंधांची लांबी वाढवण्यासाठी 'झेड टेनोटोमी' शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. ही एक सूक्ष्म व तांत्रिक प्रक्रिया आहे. शस्त्रक्रियेनंतर साधारण २० दिवस विशेष काळजी व पीव्हीसी पाइपचा योग्य सपोर्ट दिल्याने वासराचे पाय नैसर्गिक स्थितीत आले. आज जेव्हा ते वासरू इतर वासरांप्रमाणे धावते व बागडते, तेव्हा एक डॉक्टर म्हणून मिळणारे समाधान हे शब्दांत व्यक्त न करता येण्यासारखे आहे. पशुपालकांनी अशा परिस्थितीत खचून न जाता त्वरित तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, कारण वेळेवर झालेली शस्त्रक्रिया जनावराचे आयुष्य बदलू शकते.
>
> **- डॉ. रोशन वेरूळकर**

यशस्वी रक्तसंक्रमण: बेबेसिओसिसग्रस्त गाईला जीवदान

अमरावती: पशुपालन व्यवसायात जनावरांचे आरोग्य हीच खरी संपत्ती असते. मात्र, वातावरणातील बदल व गोचीड यांसारख्या समस्यांमुळे जनावरांना गंभीर आजारांचा सामना करावा लागतो. असाच एक जीवघेणा प्रसंग शिंदी बु. येथील पशुपालक श्री. अतुल शेलोकार यांच्या जर्सी क्रॉस गाईवर ओढवला होता. मात्र, पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या समयसूचकतेमुळे व 'रक्तसंक्रमण' या आधुनिक उपचार पद्धतीमुळे या गाईला जीवदान लाभले आहे.

श्री. शेलोकार यांच्या गाईला अचानक कॉफी रंगाची लघवी सुरू झाली, तिने चारा खाणे बंद केले व शरीराचे तापमान प्रचंड वाढले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांनी तात्काळ राज्यस्तरीय पशुवैद्यकीय दवाखाना (श्रेणी १), पथ्रोट अमरावती येथील पशुधन विकास अधिकारी डॉ. रोशन वेरूळकर यांच्याशी संपर्क साधला. डॉ. वेरूळकर व डॉ. आदेश चोपडे यांनी तपासणी केली असता, गाईचे वाढलेले हृदयाचे ठोके व अंगावरील गोचीड बघून तिला 'बेबेसिओसिस' या रक्तपरजीवी आजाराची लागण झाल्याचे निदान केले.

हिमोग्लोबिनची तीव्र कमतरता

प्राथमिक उपचारानंतर गाईच्या लघवीचा रंग सुधारला, मात्र तिची प्रकृती खालावतच गेली. रक्तातील लाल पेशी मोठ्या प्रमाणात नष्ट झाल्यामुळे गाईच्या डोळ्यातील व योनीमार्गातील त्वचा पूर्णपणे पांढरी पडली होती. रक्त तपासणी केली असता, हिमोग्लोबिनचे प्रमाण अत्यंत खालावून २.८ g/dL पर्यंत खाली आले होते (जे सामान्यतः १०-१२ g/dL असावे लागते). गाय पूर्णपणे निपचित पडली होती. अशा स्थितीत केवळ औषधोपचार पुरेसे नव्हते, तर रक्ताची कमतरता भरून काढण्यासाठी रक्तसंक्रमण हाच एकमेव पर्याय उरला होता.

डॉक्टरांनी पशुपालकांना रक्ताच्या गरजेबद्दल कल्पना दिली व तातडीने प्रक्रियेला सुरुवात केली. त्याच गोठ्यातील दुसरी एक निरोगी गाय 'ब्लड डोनर' म्हणून निवडण्यात आली. दोन्ही गाईंच्या रक्ताचे नमुने घेऊन 'मेजर मॅचिंग' करण्यात आले, जेणेकरून रक्ताची देवाणघेवाण यशस्वी होईल. २ लिटरच्या बॅगमध्ये रक्त गोठू नये यासाठी 'अँटी-कोआगुलंट' टाकून रक्तदाता गाईचे १ लिटर रक्त जमा करण्यात आले. हे रक्त अत्यंत काळजीपूर्वक आजारी गाईच्या शरीरात सोडण्यात आले.

रक्तसंक्रमण व त्यानंतर २-३ दिवस दिलेल्या सहाय्यक औषधांमुळे गाईच्या प्रकृतीत कमालीची सुधारणा झाली. दुसऱ्या दिवसापासून गाईने चारा खाण्यास सुरुवात केली. काही दिवसांतच गाय पूर्णपणे बरी होऊन पूर्वीप्रमाणे दूध देऊ लागली. श्री. अतुल शेलोकार यांनी पशुसंवर्धन विभागाच्या डॉक्टरांचे व प्रशासनाचे मनापासून आभार मानले आहेत.

गोदातीर समाचार
epaper.godateer.com
11 Dec 2025 - Page 3
पान ३

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार भटक्या श्वानांवर जिल्हा परिषदेची अंमलबजावणी मोहीम

नांदेड (प्रतिनिधी)– आज यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद नांदेड येथे भटक्या श्वानांसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

ही कार्यशाळा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

कार्यक्रमाला अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, जिल्हा उपआयुक्त डॉ. राजकुमार पडिले, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, तसेच आयुक्त पशुसंवर्धन प्रमुख उपस्थित होते.

या कार्यशाळेत सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समितीचे अधिकारी, सर्व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तसेच पशुधन वि... अधिकारी यांनी सहभाग घेत...

बैठकीत नांदेड जिल्ह... ग्रामीण स्थानिक स्वरा... भटक्या श्वानांबाबत ता... समन्वयाने कारवाई ... याबाबत सविस्तर मार्गद... आले.

भटक्या श्वानांच्या व्य... जनजागृती, लसीकरण, निर्बीजी... तसेच सार्वजनिक आरोग्य व सुरक्षेच्या दृष्टीने अंमलात आणावयाच्या

माध्यमांनी घेतलेली दखल

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत आदर्श ग्राम पाथरड गोळे येथे जनावरांचे आरोग्य शिबिर संपन्न

▶दै. निर्मल विदर्भ

■ ग्रामीण भागामध्ये शेतीला पूरक असलेला व्यवसाय म्हणजे दूध व्यवसाय. हा व्यवसाय ज्या गोधनावर अवलंबून आहे ते पशुधन निरोगी राहावं. याकरिता ग्रामपंचायत नेहमीच जनावरांसाठी असे शिबिर आयोजित करत असते. आणि यामधून बऱ्याच गावातील जनावरांचे तपासणी व लसीकरण नेहमीच होते... सौ. निलीमा रोशन चोपडे सरपंच ग्रा.पं.पाथरड

उद्या दिनांक 4-12-2025 रोजी सकाळी ठीक 8 वाजता आपल्या गावात वंध्यत्व निवारण गर्भधारणा तपासणी जंतनिर्मूलन आणि जनावरे तपासणी या करिता शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये गावातील जवळपास 80 ते 90 जनावरांची आरोग्य तपासणी करण्यात आली. सोबत लसीकरण जंतनाशक औषधी हे सुद्धा वाटप करण्यात आली. या शिबिराला तज्ञ डॉ संकेत खेडवे सर पशुधन विकास अधिकारी विस्तार डॉ श्रीकांत नगरे सर पशुधन विकास अधिकारी श्री मोरेश्वर जगताप सर सहायक पशुधन विकास अधिकारी कु हर्षदा टाकरे पशुधन पर्यवेक्षक श्री संदीप काळे परिचर, हे उपस्तित होते सोबतच पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी गजानन धर्माळे साहेब, सरपंच सौ नीलिमा रोशन चोपडे, उपसरपंच रजनी नरेंद्र खडसे, ग्रामविकास अधिकारी अमोल घावडे, नितीन चदि प्रीतम गावंडे आकाश तोंडरे संदीप गावंडे, गजानन गायनर, अनंत सोनवणे, पोलीस पाटील प्रफुल नेरकर गावातील अनेक शेतकरी शेतमजूर उपस्थित होते.

पशुपालकों की होगी आर्थिक उन्नति

अब जिले में दुग्ध विकास परियोजना का दूसरा चरण

■ वर्धा, ब्यूरो. ग्रामीण क्षेत्रों के ... आर्थिक उन्नति को केंद्र में ... विकास परियोजना ... किया जा रहा ... ध उत्पादन ... . महाराष्ट्र ... के 19 ... रियोजना ... किया है. ... ला शामिल ... 028-29 की ... ना को जिले में प्रभावी रूप से लागू किया जाएगा. परियोजना के कार्यान्वयन से ग्रामीण पशुपालकों की आर्थिक स्थिति में सुधार होने की उम्मीद है. इस परियोजना के तहत मुख्य रूप से लाभार्थियों को 50 प्रतिशत अनुदान पर उच्च दुग्ध उत्पादन क्षमता वाली एक गाय/भैंस उपलब्ध कराई जाएगी. वहीं 75 प्रतिशत अनुदान पर उच्च उत्पादन क्षमता वाले भ्रूण का प्रत्यारोपण की गई गर्भवती बछड़ा भी दिया जाएगा. इसके अलावा 25 प्रश अनुदान पर प्रजनन पूरक खाद्य, फैट व एसएनएफ बढ़ाने वाले खाद्य,50 प्रश अनुदान पर कड़बा कुट्टी मशीन, 100 प्रश अनुदान पर बहुवर्षीय चारा फसल, 25 प्रश अनुदान पर साइलेज का वितरण लाभार्थियों को किया जाएगा.

लाभार्थी योजना का लाभ ले पशुपालक

दुग्ध विकास परियोजना फेज-2 के कार्यान्वयन के लिए वर्धा जिले का चयन किया गया है. वर्ष 2025-26 से 2028-29 के दौरान विभिन्न योजनाओं के माध्यम से ग्रामीण पशुपालकों को लाभ पहुंचाया जाएगा. परियोजना के तहत मिलने वाले लाभों के लिए इच्छुक लाभार्थी www.vmddp.com पर जाकर आवेदन करें. किसी भी प्रकार की समस्या होने पर नजदीकी सरकारी पशु चिकित्सा दवाखाने में संबंधित अधिकारियों से संपर्क कर अधिक जानकारी प्राप्त कर सकते हैं.

– डॉ.जगदीश बुकतरे, जिला उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, वर्धा

कोंबड्या, पाळीव, दुधाळ जनावरांना वाढत्या थंडीचा धोका

पशुसंवर्धन विभाग : औषधोपचारांसह काळजी घेण्याचे शेतकरी, व्यावसायिकांना आवाहन

सांगली, ता. ८ : सध्या थंडीचे प्रमाण वाढत आहे. काही ठिकाणी शीत लहर येण्याची शक्यता वर्तवली गेली आहे. अशावेळी जनावरे आजारी पडू शकतात. जनावरांची पूर्ण काळजी घ्यावी, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले आहे.

शीत लहरीत नवजात वासरे, कालवडी, रेडकं, मेंढ्या व शेळ्यांचं करडं, आजारी जनावरे, श्वसन संस्थेचे विकार असलेली जनावरे, दुभते जनावर, अशक्त जनावर यांना जोखीम आहे. शीत लहरीमुळे होणाऱ्या हायपोथर्मिया, फ्रॉस्ट बाईट, भूक मंदावणे, मोठ्या पशुधनात सांधेदुखी, कुत्र्यांच्या पिल्लात खोकला, श्वसन विकार आदींवर उपाययोजना गरजेच्या आहेत.

काय करावे..?

जनावरांना थंड वाऱ्यापासून बचावासाठी निवारा चहूबाजूने आच्छादित करा. पत्र्याच्या छतावर वाळलेले गवत, कडब्याचा थर पसरा. निवाऱ्यातील जमिनीतील थंडीपासून बचावासाठी वाळलेल्या चाऱ्याचा थर, बिछाना अंथरा. कडाक्याची थंडी असल्यास कृत्रिम प्रकाश व उष्णता पुरवायची सोय करा. अशक्त, आजारी जनावरांना झाकण्यासाठी पोती, बारदाणा वापरा. रात्री जनावरे ऊबदार निवाऱ्यात ठेवा. ओलाव्यापासून दूर ठेवा, उष्णतेसाठी शेकोटी पेटवल्यास धुरापासून बचाव करा. ओलसरपणा ओलावा व धूर यामुळे पशुधनास न्यूमोनिया होण्याची शक्यता असते. पशुधनाच्या शरीराचे तापमान नियंत्रित राहावे, यासाठी विशेषतः लहान वयाच्या व अशक्त पशुधनास पेंड व गूळ देण्यात यावे. त्यांना ऊबदार जागी ठेवावे. पशुधनासाठी उच्च दर्जाच्या चारा व पशुखाद्याचा मुबलक साठा असावा. सुधारित पशुपोषण पद्धती व पूरक खाद्य वापरावेत. जंतनाशके द्यावीत.

निवाऱ्यात स्वच्छता ठेवावी. निरगुडी, तुळस, लेमन ग्रास यांच्या जुड्या गोठ्यात लटकवाव्यात. त्या वासाने कीटक पशुधनाच्या निवाऱ्यात येण्याची शक्यता कमी होते. कडुनिंबाचे तेल असलेले निर्जंतुकीकरण द्रावण वापरावे. पशुधनाच्या संवर्गानुसार लाळ खुरकुत, घटसर्प, फऱ्या, पीपीआर, आंत्रविषार, आदी रोग प्रतिबंधक लस द्यावी. पशुखाद्यातून व पाण्यातून पुरेसे क्षार द्यावेत. दुभत्या जनावरांना संतुलित आहार व पूरक स्निग्ध खाद्य पुरविण्यात यावेत. पाणी पिण्याची भांडी स्वच्छ ठेवा. पशुधनास दिवसातून चारवेळा कोमट पाणी पिण्यास द्यावे. सहा महिन्यांपुढील गर्भधारणा असलेल्या पशुधनास वाढीव खाद्य द्यावे. पक्ष्यांच्या पिंजऱ्यांचे तापमान नियंत्रित राहण्यासाठी आवश्यक उपाययोजना करावी. मृत पशूच्या विल्हेवाटीची जागा ही सार्वजनिक जागा व पाणवठ्यापासून दूर असावी. तसेच ती जागा काटेरी कुंपणाने संरक्षित असावी आणि तेथे फलक लावावा.

काय करू नये...?

जनावरे उघड्यावर बांधू नका. मोकाट सोडू नका. पशुमेळावे टाळा. पिण्यास थंड पाणी देऊ नका. निवाऱ्यात ओलसरपणा व धूर टाळा. मृत जनावरांचे शव कुरणावर अथवा चरावयाच्या मार्गात टाकू नका. स्थलांतर करणाऱ्या व रानात शेळी-मेंढी बसवणाऱ्या पशुपालकांनी विशेष खबरदारी घ्यावी. ऊबदार आच्छादने लपेटावीत. कर्बोदकयुक्त खाद्य प्राधान्याने द्यावे. मेंढ्यांची लोकर कापणी थांबवावी. लसीकरण करावे. आवश्यक औषधी व जीवनसत्त्वांचा साठा ठेवावा. कोंबडी शेडमध्ये दोन्ही बाजूच्या जाळ्यांना पडदे लावून रात्री व पहाटे थंड हवेच्या वेळी बंद करावे. उन्हाच्या वेळी पडदे उघडावेत. आहारात इलेक्ट्रोलाइटस, जीवनसत्वे, आदींचा वापर करावा. पक्ष्यांची गादी, खाद्य यामध्ये बुरशीची वाढ होऊन पक्ष्यांना श्वसनाचे रोग होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे पक्षीघरातील गादी स्वच्छ व कोरडी ठेवावी. पिण्यासाठी कोमट पाणी पुरवावे. ऊर्जेची गरज वाढल्यामुळे आवश्यकतेनुसार पोषणतज्ज्ञाच्या सल्ल्याने खाद्य तयार करून घ्यावे. लसीकरण करावे.

माध्यमांनी घेतलेली दखल

दैनिक पोलीस न्यूज

भ्रूणप्रत्यारोपण तंत्रज्ञानाच्या वापरासाठी गायींची तपासणी

पशुसंवर्धन विभागाचा उपक्रम ; देशी गोवंश अनुवंशिक सुधारणा कार्यक्रम

अहिल्यानगर । पोलीस न्यूज नेटवर्क

नगर तालुका पशुसंवर्धन विभागाच्या वतीने गुरुवार (दि. ४) रोजी अहील्यानगर पांजरपोळ येथे भ्रूणप्रत्यारोपण तंत्रज्ञानाच्या वापरासाठी गायींची तपासणी करण्याचा कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन, पशुसंवर्धन विभागाच्या वतीने देशी गोवंश अनुवंशिक सुधारणा कार्यक्रम अंतर्गत महत्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या भृणप्रत्यारोपण तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी गायींची तपासणी कार्यक्रम सुरू करण्यात आला. सदर प्रकल्पा अंतर्गत महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या वतीने गोशाळेमध्ये असलेल्या गावठी गायी पासून उच्च वंशावळीच्या देशी वासरांची पैदास करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर अंतर्गत गोशाळेमध्ये असलेल्या गावठी तथा कमी उत्पादकता असलेल्या गाईची निवड करण्यात येऊन सदर गाई मध्ये उच्च वंशावळीच्या देशी गायींची भृण सोडण्यात येणार आहेत. सदर प्रकल्पामुळे गोशाळांना देशी गोवंश संवर्धना बरोबरच उच्च वंशावळीच्या वासरांच्या विक्री तुन नवीन उत्पन्नाचे साधन मिळणार असल्याचे मत जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय डॉ. उमेश पाटील यांनी व्यक्त केले. या वेळी सहाय्यक आयुक्त डॉ. दशरथ दिघे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन पशुचिकित्सालय डॉ. मुकुंद राजळे, डॉ. अरुण हरीश्चंदरे यांच्या मार्गदर्शनाखाली गाईची तपासणी करण्यात आली.

यावेळी ... तपासणी करण्या...

सकाळ TODAY

अहिल्यानगर, मंगळवार, ६ जानेवारी २०२६

लिंबोटीचा लालकंधारी वळू ठरला चॅम्पियन

माळेगाव यात्रा; कालवडीत लातूरमधील कृषीची ...

बनावट सिमेनला आळा

८०० पशुवैद्यकांची नोंदणी : भरारी पथकाचा वॉच

अहिल्यानगर, ता. ५ : जनावरांचे कृत्रिम रेतन करणाऱ्या पशुवैद्यकांची नोंदणी केली जात आहे. ते वापरत असलेल्या सिमेनचा तसेच इतर उपचारांचा डेटा ठेवला जात आहे. परिणामी या व्यवसायातील गैरप्रकारांना आळा बसला आहे. काही कंपन्या बनावट सिमेन (वीर्य कांडी) तयार करून दूधउत्पादकांची फसवणूक करीत होत्या. गोजातीय प्रजनन नियमन अधिनियमनामुळे त्यांना चाप बसला आहे.

जिल्ह्यात सोळाशे पशुवैद्यक असल्याचे सांगितले जाते. त्यातील तब्बल ८०२ जणांनी या कायद्यांतर्गत नोंदणी केली आहे. या कायद्याची अंमलबजावणी डिसेंबर २०२४ पासून केली जात आहे. राज्यातील पशुपालकांना उच्च दर्जाचे वीर्य आणि भ्रूण उपलब्ध होतील. त्यामुळे दुग्ध उत्पादन आणि जनावरांची एकूण उत्पादन क्षमता वाढण्यास मदत करणे, हा या कायद्याचा उद्देश आहे. राष्ट्रीय डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड सिमेन स्टेशन, बँकांवर नियंत्रण ठेवत आहे. त्यांच्याकडे असलेल्या बैलांची संख्या, त्यांची वीर्य उत्पादन करण्याची क्षमता कशी आहे. त्यांची वंशावळही तपासली जाते. एका बैलाचे सिमेन बहुतांश वेळा वापरल्याने दुष्परिणाम दिसून येतात. जनावरांची दूध उत्पादन क्षमता घटते. काही जण दोन संकरित जातीत क्रॉस ब्रिडिंग करीत असल्याचाही परिणाम होतो. त्यासाठी पशुवैद्यकांच्या कामाची नोंदणी केली जात आहे. काही प्रशिक्षित नसलेले पशुवैद्यकही शेतकऱ्यांच्या जनावरांवर उपचार करीत होते. आता नोंदणीमुळे ते परागंदा झाल्याचे समजते. त्यांना प्रमाणपत्र घेतल्याशिवाय कृतिम रेतन करता येणार नाही.

कायदा काय सांगतो ?

- वीर्य केंद्रे, प्रयोगशाळा, तंत्रज्ञांची नोंदणी बंधनकारक.
- गोजातीय प्रजनन क्रियाकलापांचे नियमन करणे.
- वीर्य उत्पादन, प्रक्रिया, साठवणूक, वितरणावर नियंत्रण ठेवणे.
- कृत्रिम रेतन आणि सहायक प्रजनन तंत्रज्ञानाचा वापर नियंत्रित करणे.

नोंदणी नसल्यास कारवाई

- सिमेन बँक, सर्व्हिस प्रोव्हायडर आणि कृत्रिम रेतन तंत्रज्ञांना जिल्हा पातळीवर नोंदणी करणे आवश्यक आहे. बँकांसाठी नियमावली तयार केली आहे. त्यासाठी २० हजार रुपये शुल्क भरावे लागेल. ज्या सिमेन बँका तसेच पशुवैद्यक नोंदणी करणार नाही, त्यांच्यावर कारवाई प्रस्तावित केली जाणार आहे. जिल्ह्यात पशुसंवर्धनचे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे पथक कार्यरत आहे. त्यात दोन सहायक आयुक्तांचा समावेश आहे. तालुकास्तरावरही भरारी पथके तयार केली आहेत. त्यातही तीन जणांचा समावेश आहे.

दूध उत्पादनवाढ हा नवीन कायद्याचा उद्देश आहे. त्यासाठी पशुवैद्यकांची नोंदणी ही पहिली पायरी आहे. राज्यभर काम केले जात आहे. मात्र, अहिल्यानगर जिल्हा आघाडीवर आहे. भरारी पथक स्थापन केल्याने स्वतः सिमेन तयार करून कृत्रिम रेतन करणारे परागंदा झाले आहेत. पशुसंवर्धनतर्फे बारकाईने सर्व पशुवैद्यकांवर लक्ष ठेवले जात आहे.
- डॉ. अरुण हरिश्चंद्रे, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, अहिल्यानगर.

लोकमत

मस्ट READ

अनुदानावर भरपूर दूध देणाऱ्या गायी-म्हशी पाहिजेत; तर करा तात्काळ ऑनलाईन अर्ज !

लोकमत न्यूज नेटवर्क

लातूर : जिल्ह्यातील पशुपालक शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी विदर्भ-मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प टप्पा - २ सुरू करण्यात आला आहे. या अंतर्गत अनुदानावर भरपूर दूध देणाऱ्या गायी-म्हशी, पशुधनाला पोषक खाद्य, चारा पिकांसाठी मोफत बियाणे देण्यात येणार आहे. या योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज करणे गरजेचे आहे.

पशुपालकांच्या आर्थिक उन्नतीसाठी दुग्ध विकास प्रकल्प टप्पा २

जिल्ह्यातील पशुपालक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, दूध उत्पादन सुधारणे आणि आधुनिक दुग्धव्यवसाय मजबूत करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाचा विदर्भ-मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प - २ टप्पा सुरू झाला आहे. त्याचा लाभ लातूर, धाराशिव, नांदेड, हिंगोली जिल्ह्यांतील पशुपालकांना मिळणार आहे.

या योजनेसंदर्भात लातुरातील जिल्हा पशु सर्वचिकित्सालयात विभागातील चार जिल्ह्यांचे जिल्हा उपायुक्त, सहआयुक्त आणि पशुधन विकास अधिकाऱ्यांची बैठक विदर्भ-मराठवाडा दूध विकास प्रकल्पाचे संचालक डॉ. संजय गोरानी यांच्या अध्यक्षेखाली झाली.

यावेळी पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसायचे सहआयुक्त डॉ. नाना सोनवणे, जिल्हा उपायुक्त डॉ. नरेंद्र पाटील आर्दीची उपस्थिती होती. यावेळी प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनांसाठीच्या विशेष क्यूआर कोडचे उद्घाटन झाले.

हा क्यूआर कोड स्कॅन केल्यास योजनेचे सर्व घटक, पात्रता, अनुदान प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, लाभार्थी निवड निकष, ऑनलाइन अर्ज लिंक याची माहिती थेट मोबाइलवर उपलब्ध होणार आहे.

शेतकऱ्यांना मिळणारे ९ मोठे लाभ...

दिवसाला ८ ते १० लिटर दूध देणाऱ्या गायी/म्हशी ह्या ५० टक्के अनुदानावर मिळणार आहेत. उच्च उत्पादन क्षमता असलेली ७ महिन्यांची गाभण कालवड ही ७५ टक्के अनुदानावर, पोषक पशुखाद्य २५ टक्के अनुदानावर, एफएटी-एसएनएफ वाढवणारे खाद्य २५ टक्के अनुदान, बहुउपयोगी चारा पिकांसाठी १०० टक्के अनुदानावर मोफत बियाणे, ५० टक्के अनुदानावर इलेक्ट्रिक कडबाकुट्टी यंत्र, मुरघास अनुदानावर मिळणार आहे. तसेच ३६ हजार शेतकऱ्यांना आधुनिक प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

प्रकल्पाचा काय फायदा?...

दूध उत्पादनात मोठी वाढ, शेतकऱ्यांच्या वार्षिक उत्पन्नात वाढ, दुष्काळी भागात चारा टंचाईवर उपाय, जनावरांतील वांध्या तत्त्वाचा त्रास कमी, उच्च वंशावळीतून गुणवत्ता सुधारणा, दुधाच्या दर्जामुळे बाजारभाव जास्त मिळणार आहे. त्यामुळे पशुपालक शेतकऱ्यांची आर्थिक लाभ होऊन प्रगतीस चालना मिळणार आहे.

अर्ज कसा करावा?...

योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. www.vmddp.com या संकेतस्थळावर अर्ज करता येतो. अधिक माहितीसाठी जिल्हा प्रकल्प अधिकारी डॉ. विनोद दुधाळे यांच्याशी अथवा नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पशुपालकांनी शासनाच्या या महत्त्वपूर्ण योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. त्यासाठी ऑनलाईन अर्ज करावा.

डॉ. राजकुमार पडिले, जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय

पुण्य नगरी

दुग्धविकास प्रकल्पात जिल्ह्याचाही समावेश

जालना/प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात विदर्भ मराठवाडा दुग्धविकास प्रकल्प टप्पा २ अंतर्गत पशुपालकांसाठी विविध योजना महाराष्ट्र शासनाने विदर्भ व मराठवाड्यातील १९ जिल्ह्यांमध्ये सन २०२४-२५ ते २०२७-२८ या कालावधीमध्ये दुग्धविकास प्रकल्प टप्पा २ राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पामध्ये जालना जिल्ह्याचा समावेश असून ग्रामीण भागातील पशुपालकांच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. ५० टक्के अनुदानावर उच्च दुधउत्पादन क्षमता असलेल्या १ दुधाळ गाय/म्हशीचे वाटप, ७५ टक्के अनुदानावर उच्च दुधउत्पादन क्षमता असलेल्या १ भा... प्रत्यारोपण केलेली सात महिन्याची... कालवड वाटप, २५ टक्के अनुदाना... पूरक खाद्य पुरवठा, २५ टक्के अनु... फट व एसएनएफ वर्धक खाद्य पुरव... टक्के अनुदानावर कडबाकुट्टी यंत्र वा... २५ टक्के अनुदानावर मुरघास पुरवठा, १०० टक्के अनुदानावर सावर बहुवार्षिक चारा पिके घेण्यासाठी बियाणे/ठोंबे वाटप करण्याची योजना आहे. तरी या योजनांचा लाभ घेण्याकरीता जास्तीत जास्त पशुपालकांनी संकेतस्थळावर भेट देऊन ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावेत, असे आवाहन पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाच्या जिल्हा उपआयुक्तांनी केले आहे. तसेच योजनांसंबंधी अधिक माहितीकरीता विदर्भ मराठवाडा दुग्धविकास प्रकल्प टप्पा २ चे जिल्हा प्रकल्प अधिकारी डॉ. विशाल जाधव यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले.

माध्यमांनी घेतलेली दखल

भटक्या श्वानांच्या उपद्रवावर नियंत्रण

बोईसर, मनोर, वेढीमध्ये निवारा केंद्रे; निर्बीजीकरण, लसीकरण मोहीम राबवणार

लोकसत्ता वार्ताहर

बोईसर : जिल्ह्यातील नागरी आणि ग्रामीण भागातील मोकाट आणि भटक्या श्वानांचा वाढता उपद्रव आणि त्यामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रास रोखण्यासाठी जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभाग आणि प्राणी संघटना व स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाने प्रयत्न सुरू केले आहेत. यासाठी बोईसर, मनोर, वेढीमध्ये निवारा केंद्रे तयार करण्यात येणार आहेत.

पालघर तालुक्यातील बोईसर, मनोर आणि वेढी या तीन ग्रामपंचायत हद्दीत तयार करण्यात येणाऱ्या निवारा केंद्रात पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन आणि देखरेखीखाली प्राणी संघटना यांच्यामार्फत भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण आणि लसीकरण पार पाडले जाणार आहे. बुधवारी बोईसर आणि मनोर येथे श्वान निर्बीजीकरण (पान ५ वर)

वर्षभरात १० हजार जणांना श्वानदंश

पालघर जिल्ह्यात शहरी भागासह किनारपट्टीवरील गावे आणि ग्रामीण भागात देखील मोकाट श्वानांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढीस लागला आहे. रस्त्यावरील भटके श्वान लहान मुले, वृद्ध नागरिक किंवा रस्त्याने जाणाऱ्या एकट्या व्यक्तीवर झुंडीने हल्ला करून जखमी करण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. जिल्ह्यात वर्षभरात तब्बल १० हजार ८०५ नागरिकांना श्वानदंश झाला आहे.

जिल्ह्यात पालघर जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाकडून बोईसर, मनोर आणि वेढी या ग्रामपंचायत हद्दीत भटके श्वान निर्बीजीकरण आणि लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. पुढील काळात निवारा केंद्रासाठी जागेची उपलब्धता झाल्यावर इतर ठिकाणी देखील ही मोहीम राबविण्यात येणार असून नागरिकांनी देखील मोहिमेसाठी सहकार्य करावे. -प्रकाश हसनाळकर, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर.

सहा हजार श्वान निर्बीजीकरणाचे लक्ष्य

- पालघर जिल्ह्यात सन २०२५-२६ या वर्षात सहा हजार भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण आणि लसीकरणाचे लक्ष्य जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागाकडून ठेवण्यात आले आहे.
- यासाठी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. सन २०२३-२४ मध्ये पालघर तालुक्यातील दांडी, उच्छेळी, पास्थळ, कुरगाव या किनारपट्टीवरील भागात ५५०० तर सन २०२४-२५ या वर्षात वसई तालुक्यातील अर्नाळा आणि वाकिवली या गावातील ५८०० भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण आणि लसीकरण करण्यात आले.
- जिल्ह्याच्या इतर भागात देखील पुढील काळात टप्प्याटप्प्याने ही मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती पशुसंवर्धन विभागाकडून देण्यात आली.

मोहीम विलास मालाधरी यांचे प्रतिपादन; अंबोडा येथे पंचायतराज अभियान

निरोगी पशुधन म्हणजेच समृद्ध शेतकरी

यवतमाळ, ब्युरो. ग्रामीण ...र्थव्यवस्थेचा कणा असलेल्या ...शुधनाचे आरोग्य सुदृढ राहणे अत्यंत ...वश्यक आहे. वेळेवर तपासणी झाली ...ही, तर आजारांचा प्रादुर्भाव वाढतो व ...शुपालकांचे आर्थिक नुकसान होते. अशा ...बिरांमुळे आजारांचे वेळीच निदान होते, ...शुधनाची उत्पादनक्षमता वाढते, ...शुपालकांचा खर्च कमी होतो. त्यामुळे ...शा पशु तपासणी शिबिराचा लाभ ...शुपालकांनी घेतला, असे प्रतिपादन ...लायन्स फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक ...लास मालादरी यांनी केले.

...णी पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या ...मपंचायत अंबोडा येथे ग्रामीण ग्राम ...णीपुरवठा व स्वच्छता समिती, ... पंचायत समिती ... दवाखाना ...माने ...न

पशुधनाचे आरोग्य सुदृढ राहिले, तरच शेतकरी व पशुपालकांची आर्थिक उन्नती शक्य आहे. वेळेवर तपासणी आणि लसीकरणामुळे पशुधन आजारमुक्त राहते व दूध उत्पादनात वाढ होते. पशु आरोग्य तपासणी शिबिर हे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारे प्रभावी साधन आहे. निरोगी पशुधन म्हणजेच समृद्ध शेतकरी आणि सक्षम गाव. अशा आरोग्य शिबिरांमुळे पशुपालकांमध्ये शास्त्रीय दृष्टिकोन निर्माण होत असल्यानेच या पशु आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात ग्रामस्थांनी चांगला प्रतिसाद दिला.

विजयकुमार ठेंगेकर, ग्रामपंचायत अधिकारी, अंबोडा

अभियानांतर्गत पशु आरोग्य तपासणी शिबिर मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत अंबोडाच्या सरपंच वर्षा आडे उपस्थित होत्या.

तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून रिलायन्स फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक विलास मालाधरी, पशुधन विकास अधिकारी विलास आँधकर, पशु सेवा दाता हितेश दवणे, ग्रामपंचायत अधिकारी विजयकुमार ठेंगेकर, मुख्याध्यापक अंकुश मोरे, विकासगंगा समाजसेवी संस्था व रिलायन्स फाऊंडेशनचे क्षेत्रीय अधिकारी वैभव गायकी, पशुसखी शारदा चव्हाण प्रामुख्याने उपस्थित होते. या शिबिरामध्ये गावातील गाई, म्हशी, शेळ्या-मेंढ्या व इतर पशुधनाची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. आजारांचे निदान, लसीकरण, जंतनाशक औषधोपचार, जनावरे खच्चिकरण, गर्भ तपासणी, शेळीचे जंतनाशक लसीकरण तसेच पशुखाद्य व स्वच्छतेबाबत शास्त्रीय मार्गदर्शन देण्यात आले. या उपक्रमामुळे पशुपालकांमध्ये आरोग्याबाबत जनजागृती निर्माण झाली आहे. प्रास्ताविक व संचालन वैभव गायकी यांनी केले, तर आभार प्रदीप पवार यांनी केले.

दैनिक पब्लिक पोस्ट शनिवार, १३ डिसेंबर २०२५

आजचा सुविचार
शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा.
-डॉ. बाबासाहेब आंबेडकर

...ादी श्वानाच्या जिवावर आलेले संकट टळले!

...ल पशुवैद्यकिय अधिकारी डॉ. अमितकुमार झा यांचा धाडसी बचाव; मोकाट मादी श्वानाची अखेर सुटका

रेबीज प्रतिबंध मोहिमेला प्रतिसाद; १८३ श्वानांचे लसीकरण

रेबीजमुक्तीकडे तलासरीची वाटचाल

तलासरी (वा.) महाराष्ट्र : वर्ल्डवाइड व्हेटरिनरी सर्व्हिस इंडिया यांच्या मिशन रेबीज उपक्रमांतर्गत तलासरी येथे सुरू असलेल्या रेबीज प्रतिबंध मोहिमेला उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत १८३ कुत्र्यांचे यशस्वी लसीकरण पूर्ण करण्यात आले आहे. शासन यंत्रणा, स्वयंसेवी संस्था, आंतरराष्ट्रीय संस्थांचे तज्ज्ञ मार्गदर्शन आणि स्थानिक समुदाय यांच्या एकत्रित सहकार्यामुळे रेबीजसारख्या पूर्णपणे प्रतिबंध करता येणाऱ्या तरीही गंभीर आजारावर प्रभावीपणे नियंत्रण मिळविण्याची क्षमता वाढत आहे.

या मोहिमेत सर्व कुत्र्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरक्षित व परिणामकारक मानली जाणारी नोबिवॅक रेबीज लस देण्यात आली असून, तिच्या उष्णता सहनशील आणि मैदानी परिस्थितीतही प्रभावी

राहणाऱ्या गुणधर्मांमुळे ती रेबीज प्रतिबंधासाठी अत्यंत विश्वसनीय लस म्हणून ओळखली जाते.

ही मोहीम "२०३० पर्यंत शून्य मानवी रेबीज" या राष्ट्रीय उद्दिष्टाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. कुत्र्यांच्या किमान ७०% लोकसंख्येचे लसीकरण केल्यास रेबीजचा प्रसार प्रभावीपणे रोखता येतो, आणि हा उद्देश साध्य करण्यासाठी मिशन रेबीज मागील १५ वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर लसीकरण, जनजागृती उपक्रम आणि रेबीज सर्व्हेलन्स या तीन प्रमुख स्तंभांवर काम करत आहे. तलासरी मोहिमेला वेदांता आणि अनिल अग्रवाल फाउंडेशन यांच्या सहकार्याने बळ मिळाले असून, त्यांच्या मदतीमुळे दुर्गम आणि गरजू भागांमध्ये सातत्यपूर्ण व दर्जेदार काम गतीमान होत आहे.

आनंदाची बातमी: 'उमेद' अभियानातील महिलांना आता 'ग्रामसखी' म्हणून नवीन ओळख!

मुंबई: ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी अहोरात्र झटणाऱ्या महिला कार्यकर्त्यांसाठी शासनाने एक अत्यंत महत्त्वाचा व सन्माननीय निर्णय घेतला आहे. 'महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान' (उमेद) अंतर्गत गावपातळीवर कार्यरत 'समुदाय संसाधन व्यक्ती' (CRP) यांना आता **"ग्रामसखी"** या नवीन व गौरवास्पद नावाने ओळखले जाणार आहे.

राज्यातील ग्रामीण भागातील गरिबी निर्मूलनासाठी २०११ पासून केंद्र सरकारच्या मदतीने 'दिनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान' राबवले जात आहे. या अंतर्गत गरीब महिलांचे स्वयं सहाय्यता गट, ग्रामसंघ व प्रभागसंघ तयार करून त्यांना शाश्वत उपजीविका मिळवून दिली जाते. या कामात गावपातळीवर विविध विषयांत मदत करणाऱ्या महिला कार्यकर्त्यांना त्यांच्या कामाप्रमाणे वेगवेगळी नावे होती. उमेद कर्मचारी संघटनेने या सर्व महिलांना 'ग्रामसखी' असे पदनाम देण्याची मागणी केली होती, जी आता शासनाने मान्य केली आहे.

ओळखपत्र व अंमलबजावणी

केवळ नाव बदलून शासन थांबलेले नाही, तर या सर्व महिलांना त्यांच्या नवीन पदनामासह 'उमेद' अभियानामार्फत नवीन ओळखपत्रे (ID Cards) देखील दिली जाणार आहेत. या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे आदेश ग्राम विकास विभागाने दिले आहेत. या निर्णयामुळे गावपातळीवर काम करणाऱ्या महिलांना एक नवी व एकसमान ओळख मिळेल.

शासनाच्या या निर्णयानुसार, आता विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या सखींच्या नावापुढे 'ग्रामसखी' हा शब्द जोडला जाणार आहे. सुधारित पदनामे पुढीलप्रमाणे असतील:

सध्याचे पदनाम	नवीन सुधारित पदनाम
ICRP (प्रेरिका)	**ग्रामसखी – प्रेरिका**
बँक सखी	**ग्रामसखी – बँक लिंकेज**
पशु सखी	**ग्रामसखी – पशुसंवर्धन**
कृषी सखी	**ग्रामसखी – कृषी विकास**
मत्स्य सखी	**ग्रामसखी – मत्स्य पालन**
वन सखी	**ग्रामसखी – वनउपज**
आर्थिक साक्षरता सखी	**ग्रामसखी – आर्थिक साक्षरता**

'ग्रामसखी' या शब्दामुळे त्यांच्या कामातील आपलेपणा व सन्मान वाढण्यास मदत होईल. ग्रामीण विकासाच्या मुख्य प्रवाहात या महिलांचे योगदान किती महत्त्वाचे आहे, हेच या निर्णयावरून अधोरेखित होते.



माळरानावरी सांज अवतरली, सोनकेसरी रंगात न्हाली.
पक्षी थव्याने परतती घरा, सूर शांतीचा व्यापे आसमंत सारा.
क्षितिजसमांतर हा सहस्त्ररश्मी, रंग उधळतो गडदकेशरी,
वृषभ असा उभा एकटाच माळरानी, नयनांत शांतता अन् ओठांवर गाणी.

शब्दांकन: संतोष पवार, महापशुधनवार्ता

लिंग विनिश्चित वीर्यमात्रा (SSS) व भ्रूण प्रत्यारोपण (ETT) तंत्रज्ञान

दुग्धव्यवसायातील क्रांती व प्रगतीची नवी दिशा

डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.)
सचिव (पदुम),
महाराष्ट्र राज्य, पुणे-६७

जगभरात सर्वाधिक दूध उत्पादन करणारा देश म्हणून भारताचा प्रथम क्रमांक लागतो. पशुसंवर्धन विभागाचे प्रभावी पैदास धोरण, पशुवैद्यकांचे योगदान व पशुपालकांनी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा केलेला वापर यामुळेच आपण हे स्थान टिकवून ठेवले आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेला पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय आज निसर्गाचा लहरीपणा व जनावरांची कमी दूध उत्पादन क्षमता यांसारख्या आव्हानांचा सामना करत आहे. यावर उपाय म्हणून केवळ पशुधनाची संख्या न वाढवता, त्यांची **अनुवांशिक गुणवत्ता** (Genetic Improvement) सुधारणे ही काळाची गरज आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाचा पशुसंवर्धन विभाग 'लिंग विनिश्चित वीर्यमात्रा' व 'भ्रूण प्रत्यारोपण' ही तंत्रज्ञाने पशुपालकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कटिबद्ध आहे.

१. लिंग विनिश्चित वीर्यमात्रा (Sex Sorted Semen - SSS)

पारंपारिक कृत्रिम रेतन पद्धतीत नर किंवा मादी वासरू जन्माला येण्याची शक्यता ५०-५०% असते. मात्र, 'सेक्स सॉर्टेड सिमेन' तंत्रज्ञानामुळे मादी वासरू (कालवड) जन्माला येण्याची शक्यता **९०% पेक्षा जास्त** असते.

तंत्रज्ञानाचे मुख्य फायदे:

•**जास्तीत जास्त कालवडींचा जन्म:** केवळ कालवडी जन्माला आल्यामुळे दूध देणाऱ्या जनावरांची संख्या वेगाने वाढते.

•**अनुवांशिक सुधारणा:** उच्च वंशावळीच्या वळूंच्या वीर्यमात्रा वापरल्यामुळे जन्माला येणाऱ्या कालवडींची उत्पादन क्षमता त्यांच्या मातेपेक्षा अधिक असते.

•**खर्चात बचत:** दुग्धव्यवसायात नर वासरांचा उपयोग मर्यादित असल्याने त्यांच्या संगोपनावर होणारा खर्च वाचतो.

•**सुलभ प्रसूती:** नर वासरांच्या तुलनेत कालवडींचा आकार लहान असल्याने कष्टप्रसूतीचे (Dystocia) प्रमाण कमी होते.

२.भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञान (Embryo Transfer Technology - ETT / IVF)

हे तंत्रज्ञान म्हणजे पशुपालनातील 'टेस्ट ट्यूब बेबी' होय. याद्वारे उच्च दूध उत्पादन क्षमता असलेल्या गायी / म्हशींपासून अनेक उच्च उत्पादनक्षम गुणवत्तेची पैदासक्षम वासरे मिळवता येतात.

कार्यपद्धती: उच्च वंशावळीच्या 'दाता' (Donor) गायीच्या स्त्रीबीज कोषातून स्त्रीबीज काढून प्रयोगशाळेत निवडक वळूच्या वीर्याने फलित केले जाते. तयार झालेले भ्रूण (Embryo) त्यानंतर कमी दूध उत्पादन क्षमता असलेल्या 'दायी' (Recipient/Surrogate) गायीच्या गर्भाशयात प्रत्यारोपित केले जातात.

तंत्रज्ञानाचे फायदे व महत्त्व:

- **एका वर्षात अनेक वासरे:** नैसर्गिकरित्या गाय वर्षाला एका वासराला जन्म देते, परंतु ETT तंत्रज्ञानामुळे एकाच उच्च वंशावळीच्या गायीपासून वर्षाकाठी ४० ते ५० वासरे मिळवणे शक्य आहे.
- **वंध्यत्वावर मात:** वयात आलेल्या कालवडी, वयस्कर गायी किंवा तात्पुरते वंध्यत्व असलेल्या जनावरांकडूनही स्त्रीबीज संकलित करून त्यांपासून भ्रूण तयार करता येतात.
- **कमी उत्पादनक्षम जनावरांचा उपयोग:** गोठ्यातील कमी दूध देणाऱ्या किंवा गावरान जनावरांचा वापर 'सरोगेट मदर' म्हणून करून त्यांच्यापासून उच्च दर्जाची पैदास घेता येते.
- **देशी गोवंशाचे संवर्धन:** गाई-म्हशींच्या शुद्ध वंशावळी जोपासण्यासाठी हे तंत्रज्ञान वरदान आहे.

या तंत्रज्ञानाचा वापर करून आपण वयात आलेल्या कालवडी, वयोवृद्ध गायी, अपंग गायी तसेच कायमस्वरूपी किंवा तात्पुरत्या स्वरूपात वंध्यत्व असलेल्या गायींकडूनही स्त्रीबीज संकलित करू शकतो व त्यांच्यापासून उच्च दर्जाचे भ्रूण तयार करता येतात. लिंग विनिश्चित वीर्यमात्रांचा (SSS) वापर करून ९० टक्क्यांपर्यंत केवळ कालवडींचीच पैदास करणे व या तंत्रज्ञानाचा पूर्ण कार्यक्षमतेने वापर करणे शक्य झाले आहे. यामुळे पशुपालकांचा नर वासरांच्या संगोपनावर होणारा अनावश्यक खर्च कमी होईल. तसेच, उच्च गुणधर्मांच्या विविध वळूंची निवड करण्यासाठी राबवल्या जाणाऱ्या पैदास चाचणी कार्यक्रमाचा (Progeny Testing Program) कालावधी कमी करणेही आता शक्य होणार आहे.

दाता (Donor) गायी किंवा म्हशींची निवड करताना त्यांची शुद्ध वंशावळ, रोगप्रतिकारशक्ती, दुधातील स्निग्धांश (Fat), दूध देण्याचा कालावधी, एकूण दूध उत्पादन क्षमता व स्थानिक वातावरणाशी जुळवून घेण्याची क्षमता इत्यादी गुणधर्मांचा प्रामुख्याने विचार केला जातो. याउलट, दायी (Recipient) माता म्हणून कोणत्याही जातीच्या किंवा गावठी (Non-Descript) जनावरांचा वापर करता येतो. यामुळे गोठ्यातील कमी दूध देणाऱ्या जनावरांपासूनही उच्च अनुवांशिक गुणधर्म असलेली वासरे मिळवणे व भविष्यात प्रती जनावर दूध उत्पादन वाढवणे शक्य होणार आहे. या तंत्रज्ञानाचा वापर आता विविध गोशाळांमधील प्रजननक्षम पशुधनावर करून, तिथे उच्च उत्पादनक्षम वासरांची निर्मिती करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा पशुसंवर्धन विभाग कार्यरत आहे.

पशुसंवर्धन क्षेत्रात आधुनिकीकरणाचा स्वीकार करत धाराशिव जिल्ह्याने एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत (२०२३-२४) प्राप्त झालेल्या ₹१२७ लक्ष निधीतून राबविण्यात येत असलेल्या 'लिंग-निर्धारित वीर्यमात्रा' प्रकल्पाचा आढावा घेण्यासाठी नुकताच एका विशेष 'वासरे मेळाव्याचे' आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उद्घाटन मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांच्या हस्ते करण्यात आले. या तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांच्या अर्थव्यवस्थेत होणाऱ्या बदलांचे कौतुक केले. जिल्ह्यात दुग्धोत्पादन वाढवण्यासाठी आणि नरांच्या तुलनेत मादी वासरांची संख्या वाढवण्यासाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरत आहे. या योजनेअंतर्गत एकूण ९०,३५७ लिंग-निर्धारित वीर्यमात्रांची खरेदी करण्यात आली होती. नोव्हेंबर २०२५ पर्यंत त्यांपैकी २६,२६२ मात्रांचा वापर पूर्ण झाला असून, त्याद्वारे जिल्ह्यात आतापर्यंत १,२६२ मादी वासरे व १११ नर वासरे जन्माला आली आहेत.

भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळा, ताथवडे (पुणे) व पांजरपोळ गोरक्षण संस्था, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने गाईंमध्ये भ्रूण प्रत्यारोपणाचा उपक्रम मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांचे सूचनेनुसार व पशुसंवर्धन आयुक्त मा. डॉ. प्रवीणकुमार देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. गोशाळेतील कमी दूध देणाऱ्या व गावठी गाईंमध्ये उच्च उत्पादक व जातिवंत देशी गोवंशाचे भ्रूण प्रत्यारोपण करण्याचे नियोजन करण्यात आले. या प्रकल्पांतर्गत एकूण १०० गाईंचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून, अहिल्यानगर येथील पांजरपोळ गोरक्षण संस्थेतील ३५ गाईंची निवड करून महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या निधीतून त्यांचे माज नियमन करण्यात आले. त्यापैकी भ्रूण प्रत्यारोपणासाठी पात्र ठरलेल्या १९ गाईंमध्ये साहिवाल व गीर जातीच्या गाईंचे भ्रूण यशस्वीरित्या प्रत्यारोपित करण्यात आले. ताथवडे येथील प्रयोगशाळेमार्फत हे काम मोठ्या प्रमाणावर सुरू असून, आतापर्यंत या तंत्रज्ञानाद्वारे ८४ यशस्वी गर्भधारणा झाल्या आहेत व विविध जातींच्या ४२ वासरांचा जन्म झाला आहे.

लिंग वर्गीकृत रेतमात्रांसाठी सवलत

सद्यस्थितीत लिंग निश्चित वीर्यमात्रा तयार करण्याचे तंत्रज्ञान हे फक्त २ विदेशी कंपन्याकडे असल्याने प्रती विर्य मात्रा खर्च हा रू १२००-१५०० एवढा येत आहे. परंतु, महाराष्ट्र शासनाने सदर कंपन्या बरोबर करार करून सदर विर्यमात्रा रू ५७५/- मध्ये खरेदी करण्यात आल्या असून त्यामध्ये केंद्र शासन ४५ % व राज्य् शासन ३० % व रू १०० सहकारी/ खाजगी दुधसंघ किंवा महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाच्या मार्फत खर्च करून सवलतीच्या माध्यमातुन रू ८१/- प्रती विर्य मात्रा याप्रमाणे पशुपालकांना उपलब्ध करून दिल्या जात आहे.

माहे डिसेबर २०२५ अखेर पर्यत आपण सवलतीच्या दरात ३.६६ लक्ष एवढया लिंग निश्चित वीर्यमात्रा शासनाच्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या आहेत.

सदर लिंग निश्चित वीर्यमात्रा साठी स्वदेशी तंत्रज्ञान राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ,(NDDB) च्या माध्यमातुन विकसित केले असुन यामुळे पशुपालकांना कमी दरात सदर विर्यमात्रा उपलब्ध होणार आहे. महाराष्ट्रातील पशुपालकांना कमी दरात सदर विर्यमात्रा उपलब्ध होण्यासाठी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ व राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ,(NDDB) यांचेमध्ये सामज्यसं करार प्रगती पथावर आहे.

लिंग विनिश्चित रेतमात्रांचा पुरवठा, वापर व परिणाम याबाबतची सांख्यिकी माहिती

पुरवठा केलेल्या एकूण लिंग विनिश्चित रेतमात्रा : ७७७६१
एकूण कृत्रिम रेतने: ३३०७८
जन्मलेली एकूण वासरे: ५५०६
जन्मलेली एकूण मादी वासरे: ४७८७
जन्मलेली एकूण नर वासरे: ७१९

- कोल्हापूरचा 'गोकुळ दूध संघ' हा २१,५०० मात्रांच्या पुरवठ्यासह आघाडीवर आहे. मात्र, कृत्रिम रेतन (AI) करण्याच्या बाबतीत 'फलटण दूध संघ' (६,८१२ AI) हा सर्वात सक्रिय दिसून येतो.
- या अहवालानुसार एकूण ५५०६ वासरे जन्माला आली आहेत, त्यापैकी ४७८७ मादी वासरे आहेत. म्हणजेच मादी वासरे जन्माला येण्याचे प्रमाण सुमारे ८६.९४ % आहे, जे या तंत्रज्ञानाचे यश दर्शवते.
- सातारा जिल्ह्यातील फलटण दूध संघाने सर्वाधिक १,२९७ मादी वासरांच्या जन्माची नोंद केली आहे, जी इतर सर्व दूध संघांच्या तुलनेत लक्षणीय आहे.
- जुलै २०२१ पासून सुरू झालेल्या या कृत्रिम रेतन मोहिमेत एकूण ३३०७८ कृत्रिम रेतन प्रक्रिया पार पडल्या आहेत. यामध्ये जुन्या केसेस पेक्षा नवीन केसेसची संख्या जास्त आहे.

भ्रुण प्रत्यारोपण संबंधी सामंजस्य करार

देशी गोवंश संवर्धन जतन व विकसित करण्याच्या दृष्टीने देशी गोवंश संशोधन व प्रशिक्षण केंद्र, पुणे यांचेसोबत महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर यांनी सामंजस्य करार केला असून, या अंतर्गत पुणे परिसरातील पशुपालकांच्या दारात त्यांच्या मालकीच्या गाईमध्ये उच्च उत्पादनक्षम शुद्ध देशी जातीच्या गाईचे भ्रुण प्रत्यारोपित केले जाणार आहे. यासाठी येणारा खर्च हा देशी गोवंश संशोधन व प्रशिक्षण केंद्र, पुणे हे करणार असून, यासाठी तांत्रिक कामकाज महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर अंतर्गत भ्रुण प्रत्यारोपण प्रयोगशाळा, ताथवडे पुणे हे करणार आहेत.

पशुपालकांना माफक दरात भ्रुण प्रत्यारोपणाची सेवा मिळण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद सातारा यांचेसमवेत महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर यांनी सामंजस्य करार केला असून, या अंतर्गत सातारा जिल्ह्यातील पशुपालकांना ९० टक्के सवलतीच्या दरात भ्रुण प्रत्यारोपणाद्वारे निश्चित गर्भधारणा करुन दिली जाणार आहे. या विशेष उपक्रमामुळे पशुपालकांना आता खात्रीशीररीत्या उच्च गुणवत्तेच्या मादी पैदास मिळवणे शक्य झाले आहे.

आपल्या देशातील भौगोलिक विविधतेमुळे वेगवेगळ्या हवामानांत रुळलेल्या व उच्च दूध उत्पादन क्षमता असलेल्या विविध देशी जातींचा या तंत्रज्ञानात समावेश केल्यास, प्रती जनावर दूध उत्पादनात निश्चितच वाढ होईल. यामुळे दूध उत्पादनाचा खर्च कमी होऊन पशुपालकांचा दुग्धव्यवसाय अधिक फायदेशीर होण्यास मोठी मदत होईल.

पशुपालकांसाठी महत्त्वाची पावले

भ्रूणप्रत्यारोपण तंत्रज्ञान वापरामध्ये महाराष्ट्र राज्य देशात प्रथम क्रमांकावर आहे. पशुपालकांच्या दारापर्यंत हे तंत्रज्ञान पोहोचवण्यासाठी खालील खाजगी, निमशासकीय व शासकीय संस्था प्रयत्नशील आहेत:

खाजगी संस्था: गोदरेज मॅक्सीमिल्क, नाशिक (९,४७१); श्याम आय.व्ही.एफ.,पुणे (१,३९४) व भद्रा ब्रीडिंग केंद्र, खुलताबाद, छत्रपती संभाजीनगर (१,०३५).

निमशासकीय संस्था: बायफ, उरळीकांचन, पुणे (१,७४२).

शासकीय संस्था: भ्रूणप्रत्यारोपण प्रयोगशाळा, नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालय, नागपूर (५५८) व भ्रूणप्रत्यारोपण प्रयोगशाळा, शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र, ताथवडे, पुणे (४९८).

माहे डिसेंबरअखेरपर्यंत या संस्थांद्वारे एकूण १४,६९८ भ्रूणप्रत्यारोपण करण्यात आले असून, या तंत्रज्ञानाद्वारे २,४७३ वासरांचा जन्म झाला आहे. ही बाब महाराष्ट्र राज्य आणि पशुसंवर्धन विभागासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे.

पशुसंवर्धन विभाग विविध उपाययोजनांद्वारे जनावरांचे 'दोन वेतातील वाढलेले अंतर' कमी करण्यासाठी प्रयत्न करत आहे. त्याचबरोबर, प्रती पशु दूध उत्पादन वाढवण्यासाठी भ्रूणप्रत्यारोपण तंत्रज्ञान जास्तीत जास्त पशुपालकांपर्यंत माफक दरात पोहोचवण्याचा विभागाचा मानस आहे. याचाच एक भाग म्हणून, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर अंतर्गत राज्यातील प्रत्येक महसुली विभागात एक भ्रूणप्रत्यारोपण प्रयोगशाळा स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. ज्याची माहिती खालीलप्रमाणे आहे:

अ. क्र.	महसुली विभाग	ठिकाण
१	मुंबई	जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र,पेण जि.रायगड
२	नागपुर	शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र, हेटिकुंडी, ता.कारंजा,जि.वर्धा
३	पुणे	शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र,ताथवडे,पुणे
४	संभाजीनगर	वळु संगोपन केंद्र, (हर्सुल) संभाजीनगर
५	नाशिक	लोणी बुद्रक,ता.राहता, जि.अहमदनगर
६	अमरावती	जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, अकोंला

त्यापैकी भ्रूणप्रत्यारोपण प्रयोगशाळा, शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र, ताथवडे (पुणे) येथे एक प्रयोगशाळा कार्यान्वित करण्यात आली असून, इतर विभागांतील प्रयोगशाळा लवकरात लवकर सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

या प्रयोगशाळांमार्फत पशुपालकांना विविध पर्यायांद्वारे उच्च वंशावळीच्या वासरांची निर्मिती करून दिली जात आहे. या तंत्रज्ञानामुळे कमी दूध उत्पादन क्षमता असलेल्या किंवा गावठी जनावरांपासूनही उच्च वंशावळीची व शुद्ध जातीची वासरे निर्माण करणे शक्य झाले आहे. गोशाळांमधील गावठी व निकृष्ट जातीच्या गाईंचा वापर करून उच्च वंशावळीची वासरे जन्माला घालण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोग व महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर यांच्या वतीने विशेष प्रयत्न केले जात आहेत. या उपक्रमासाठी आवश्यक निधीचा काही भाग महाराष्ट्र गोसेवा आयोगामार्फत उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे.

दि. ५ ऑक्टोबर २०२३ च्या शासन निर्णयान्वये, हे तंत्रज्ञान पशुपालकांच्या दारात व गोशाळांमध्ये उपलब्ध करून देण्यासाठी विविध पर्याय देण्यात आले आहेत.

यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो:

- **दाता गाय/म्हैस (Donor):** जातीवंत व उच्च उत्पादन क्षमता असलेली जनावरे.
- **'दायी' गाय (Surrogate Mother):** ज्या पशुपालकांकडे कमी उत्पादन क्षमतेच्या गाई किंवा म्हशी आहेत, त्यांच्या गर्भाशयाचा वापर 'सरोगेट मदर' म्हणून केला जाईल.
- **प्रोत्साहन भत्ता:** भ्रूणप्रत्यारोपणाद्वारे वासरू जन्माला आल्यानंतर, ते ताब्यात घेताना संबंधित पशुपालकास, गोशाळेस प्रती वासरू १०,०००/- रु. अदा करण्यात येतील.

अशाप्रकारे, साधारण दूध उत्पादन क्षमता असलेल्या परंतु प्रजननक्षम गाईंचा 'दायी' म्हणून वापर केल्यामुळे पशुपालकांना व गोशाळांना एक नवीन व्यवसाय उपलब्ध होणार आहे. यामुळे उच्च अनुवांशिक गुणधर्म असलेली व उच्च उत्पादनक्षम जनावरे उपलब्ध होऊन पशुपालक व गोशाळा आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होईल. या मोहिमेसाठी विविध पशुपालक व गोशाळांसोबत सामंजस्य करार (MoU) करून पशुसंवर्धन विभागामार्फत प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

पशुपालकांनी काय करावे?

१. जवळच्या पशुवैद्यकीय केंद्राशी संपर्क साधावा व लिंग विनिश्चित वीर्यमात्रा (SSS) व भ्रूण प्रत्यारोपण (ETT) तंत्रज्ञानाबाबत माहिती जाणून घ्यावी.
२. कालवडींच्या निवडीसाठी पशुवैद्यकाचा सल्ला घ्यावा.
३. 'सेक्स सॉर्टेड सिमेन' तंत्रज्ञानाचा लाभ घेण्यासाठी संबंधित दवाखान्यात नोंदणी करावी.

भविष्याची दिशा

'लिंग विनिश्चित वीर्यमात्रा' (SSS) व 'भ्रूण प्रत्यारोपण' (ETT) ही केवळ विज्ञानातील प्रगत तंत्रज्ञाने नसून, ती ग्रामीण महाराष्ट्रातील दूध उत्पादकांचे उत्पन्न दुप्पट करण्याची व त्यांचे जीवनमान उंचावण्याची प्रभावी साधने आहेत. आजच्या स्पर्धात्मक युगात पारंपरिक पशुपालन पद्धतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे अनिवार्य झाले आहे. महाराष्ट्र शासनाचे हे स्पष्ट ध्येय आहे की, राज्यातील प्रत्येक अल्पभूधारक शेतकरी व पशुपालकाचा गोठा हा उच्च वंशावळीच्या, निरोगी व सर्वाधिक दूध उत्पादन देणाऱ्या जनावरांनी समृद्ध असावा. महाराष्ट्र शासनाचा पशुसंवर्धन विभाग या क्रांतीमध्ये शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून उभा आहे. आपण सर्वांनी मिळून या आधुनिक तंत्रज्ञानाचा अंगीकार करूया, आपल्या पशुधनाची अनुवांशिक गुणवत्ता सुधारूया व महाराष्ट्रातील 'श्वेतक्रांती' अधिक सक्षम व बळकट करूया!

आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करूया,
श्वेतक्रांती अधिक बळकट करूया!

भटक्या कुत्र्यांची समस्या
वास्तव, आव्हाने व नागरिकांची नैतिक जबाबदारी

मानव व कुत्रा यांचे नाते हजारो वर्षांचे आहे. कुत्रा हा सर्वात पहिला पाळीव झालेला प्राणी आहे; त्यामुळेच कुत्रा हा माणसाचा सर्वात पहिला व विश्वासू मित्र मानला जातो. एकेकाळी जंगलात व गुहेत राहणाऱ्या मानवाच्या संरक्षणासाठी कुत्र्याने महत्त्वाची भूमिका बजावली. मात्र, आजच्या आधुनिक काळात, विशेषतः शहरीकरणामुळे हे नाते एका वेगळ्या व गुंतागुंतीच्या वळणावर येऊन ठेपले आहे. आज गल्लीबोळात, रस्त्यांच्या कडेला व सोसायट्यांमध्ये भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या ही एक गंभीर सामाजिक समस्या बनली आहे.

एकीकडे प्राणीप्रेमींचा कुत्र्यांबद्दलचा जिव्हाळा व दुसरीकडे सर्वसामान्य नागरिकांच्या मनातील भीती, यांमुळे समाजात अनेकदा तणावाचे वातावरण निर्माण होते. कुत्र्यांचे हल्ले, रेबीजसारखे आजार, रात्रीची शांतता भंग होणे व अस्वच्छता यांसारख्या समस्यांमुळे नागरिक त्रस्त आहेत. मात्र

डॉ रोहित विजय धुमाळ
M.V.Sc (Pathology), PGDAW
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन
पशुसंवर्धन विभाग नांदेड

या समस्येचे मूळ केवळ कुत्र्यांच्या नैसर्गिक वागणुकीत नसून, ते आपल्या कचरा व्यवस्थापनात व नियोजनात दडलेले आहे. या लेखाचा उद्देश भटक्या कुत्र्यांच्या समस्येचा सर्वांगीण आढावा घेणे व एक जबाबदार नागरिक म्हणून आपण काय भूमिका बजावू शकतो, हे स्पष्ट करणे आहे.

भटक्या कुत्र्यांच्या समस्येची सद्यस्थिती व कारणे:

भटक्या कुत्र्यांची संख्या का वाढते? या प्रश्नाचे उत्तर शोधल्याशिवाय उपाय शोधणे अशक्य आहे.

१. अन्नाची उपलब्धता व कचरा व्यवस्थापन :

वैज्ञानिक भाषेत सांगायचे तर, कोणत्याही प्राण्यांची संख्या ही त्या परिसरात उपलब्ध असलेल्या अन्नावर अवलंबून असते. याला 'कॅरिंग कॅपॅसिटी' असे म्हणतात. भारतीय शहरांमध्ये कचरा व्यवस्थापनाची स्थिती अत्यंत बिकट आहे. उघड्यावर टाकलेले अन्न, कचराकुंड्यांभोवती पसरलेली घाण, व रस्त्यावर फेकलेले मांस-मटणाचे तुकडे हे भटक्या कुत्र्यांसाठी अन्नाचे मुख्य स्रोत आहेत. जिथे अन्न सहज मिळते, तिथे कुत्र्यांची प्रजननाची क्षमता वाढते व पिल्लांचा जगण्याचा दर सुधारतो. त्यामुळे कचरा हेच कुत्र्यांच्या वाढत्या संख्येचे मुख्य कारण आहे.

२. अपुरे निर्बीजीकरण:

कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी 'ॲनिमल बर्थ कंट्रोल' (ABC) अर्थात निर्बीजीकरण हाच एकमेव वैज्ञानिक मार्ग आहे. मात्र, अनेक नगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्थांकडे यासाठी पुरेसा निधी किंवा यंत्रणा नसते. जर एका भागातील ७०% पेक्षा जास्त कुत्र्यांचे निर्बीजीकरण झाले नाही, तर त्यांची संख्या वेगाने वाढतच राहते.

३. पाळीव कुत्र्यांना सोडून देणे

अनेक लोक हौसेने कुत्री पाळतात, पण जेव्हा त्यांची देखभाल करणे कठीण होते किंवा कुत्रा म्हातारा/आजारी होतो, तेव्हा त्यांना रस्त्यावर सोडून दिले जाते. हे घरगुती कुत्रे रस्त्यावर आल्यावर अन्नासाठी भटक्या कुत्र्यांशी स्पर्धा करतात, व त्यांची संख्या वाढवण्यात भर घालतात.

भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येचे परिणाम गंभीर व बहुआयामी आहेत.

१. मानवी सुरक्षेचा प्रश्न (Human Safety)

भटक्या कुत्र्यांच्या टोळ्या (Packs) जेव्हा आक्रमक होतात, तेव्हा लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व दुचाकीस्वारांवर हल्ले होण्याच्या घटना घडतात. विशेषतः प्रजननाच्या काळात (Mating Season) किंवा मादी कुत्रीने पिल्ले दिली असतील तर, संरक्षणाच्या भावनेतून कुत्रे अधिक आक्रमक होतात.

२. रेबीज व आरोग्याचे धोके (Health Hazards)

जगात रेबीजमुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये भारताचा मोठा वाटा आहे. भटक्या कुत्र्यांचे लसीकरण वेळेवर न झाल्यास, त्यांच्या चावण्यामुळे रेबीज हा जीवघेणा आजार होऊ शकतो. याशिवाय, कुत्र्यांच्या विष्ठेमुळे व अस्वच्छतेमुळे इतर परजीवी आजारही पसरू शकतात.

३. अपघात

रात्रीच्या वेळी अचानक वाहनांसमोर कुत्रे आल्यामुळे किंवा वाहनांच्या मागे धावल्यामुळे अनेक दुचाकीस्वारांचा अपघात होतो. यात कुत्र्यांचा जीव जातोच, पण वाहन चालकालाही गंभीर दुखापत होते.

४. प्राण्यांचे हाल (Animal Suffering)

ही समस्या फक्त मानवांसाठी नाही, तर कुत्र्यांसाठीही तितकीच वेदनादायी आहे. रस्त्यावरचे जीवन कठीण असते. अनेक कुत्रे उपासमारीने, अपघाताने किंवा लोकांच्या रोषाला बळी पडून विविध हत्यारांचा वापर करुन मारल्यामुळे, अंगावर गरम पाणी टाकल्याने, अंगावर फटाके फोडल्याने किंवा विषप्रयोग केल्याने व इतर क्रूरतेमुळे तडफडून मरतात. त्यामुळे कुत्र्यांची संख्या मर्यादित असणे हे त्यांच्याही हिताचे आहे.

कायदेशीर चौकट व नियमावली

भारतात प्राणी हक्कांसाठी कठोर कायदे आहेतच, परंतु २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने घेतलेली भूमिका या समस्येच्या निराकरणासाठी दिशादर्शक ठरली आहे.

सर्वोच्च न्यायालयाची स्वतःहून दखल

अलीकडेच, भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या व मानवावरील हल्ल्यांच्या घटनांची गंभीर दखल घेत, सर्वोच्च न्यायालयाने Suo Moto Case (W.P.(C) No. ५ of २०२५) या नावाने स्वतःहून एक याचिका दाखल करून घेतली. या ऐतिहासिक सुनावणीमध्ये न्यायालयाने 'मानवी सुरक्षा' व 'प्राण्यांचे हक्क' यांच्यात समतोल राखण्यावर भर दिला आहे व ॲनिमल बर्थ कंट्रोल (ABC) रुल्स, २०२३ याचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. थोडक्यात, W.P.(C) No. ५ of २०२५ या प्रकरणाद्वारे सर्वोच्च न्यायालयाने हे स्पष्ट केले आहे की, भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर 'क्रूरता' हे उत्तर नसून, 'वैज्ञानिक नियोजन' हेच उत्तर आहे.

इतर महत्त्वाचे कायदे

- **प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करणारा कायदा, १९६० (PCA Act, १९६०):** या कायद्यानुसार, कोणत्याही भटक्या कुत्र्याला विनाकारण मारणे, मारहाण करणे किंवा विषप्रयोग करणे हा फौजदारी गुन्हा आहे.
- **ॲनिमल बर्थ कंट्रोल (ABC) रुल्स, २०२३:**

सरकारने नुकत्याच सुधारित केलेल्या नियमांनुसार: भटक्या कुत्र्यांना त्यांच्या जागेवरून उचलून कायमचे दुसरीकडे हलवणे (Relocation) बेकायदेशीर आहे. कुत्र्यांना फक्त नसबंदीसाठी (Sterilization) उचलले जाऊ शकते व शस्त्रक्रियेनंतर त्यांना त्याच ठिकाणी परत सोडणे बंधनकारक आहे. कुत्र्यांना मारून संख्या कमी करणे हे वैज्ञानिकदृष्ट्या चुकीचे व कायद्याने निषिद्ध आहे.

नागरिकांची जबाबदारी व उपाययोजना

ही समस्या सोडवण्यासाठी केवळ सरकारवर अथवा प्रशासनावर अवलंबून राहणे पुरेसे नाही. प्रत्येक नागरिकाने यात सक्रिय सहभाग घेणे गरजेचे आहे. 'एक हात मदतीचा' या भावनेतून आपण खालील गोष्टी करू शकतो:

१. कचरा व्यवस्थापनात शिस्त (Strict Waste Management)

हा या समस्येवरील सर्वात प्रभावी उपाय आहे. ओला व सुका कचरा वर्गीकरण: आपल्या घरातील ओला कचरा कधीही प्लॅस्टिकच्या पिशवीत बांधून रस्त्यावर टाकू नका. यामुळे कुत्रे ती पिशवी फाडतात व सवय लागल्यामुळे आक्रमक होतात.

सोसायटीचे नियम: गृहनिर्माण सोसायट्यांनी कचरा डब्बे (Bins) पूर्णपणे झाकलेले ठेवावेत जेणेकरून कुत्र्यांना अन्नाचा वास येणार नाही व ते तिथे जमणार नाहीत.

२. नसबंदी मोहिमेला पाठिंबा (Support Sterilization)

आपल्या भागातील कुत्र्यांचे निरीक्षण करा. ज्या कुत्र्यांच्या कानाला छोटा 'V' आकाराचा कट (Ear Notch) आहे, त्यांची नसबंदी झालेली असते. जर तुम्हाला नसबंदी न झालेले कुत्रे दिसले, तर त्वरित त्यांचे फोटो काढून महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाला किंवा प्राणी मित्र संस्थांना (NGOs) कळवा. कुत्र्यांची गाडी पकडायला आल्यावर त्यांना अडवू नका, उलट कर्मचारी त्यांना कोणत्या दिवशी परत सोडणार आहेत याची नोंद ठेवा.

३. जबाबदार फिडिंग (Responsible Feeding)

काही प्राणीप्रेमी कुत्र्यांना खायला घालतात, ज्याला विरोध केला जातो. पण 'फिडिंग' बंद केल्याने कुत्रे आक्रमक होतात. त्याऐवजी 'जबाबदार फिडिंग' करणे गरजेचे आहे. ठराविक जागा: कुत्र्यांना सोसायटीच्या गेटवर, पायऱ्यांवर किंवा रहदारीच्या ठिकाणी खायला घालू नका. एक कोपरा किंवा निर्जन जागा निवडा. ठराविक वेळ: खायला घालण्याची वेळ निश्चित करा. यामुळे कुत्रे दिवसभर अन्नासाठी भटकत राहणार नाहीत व लोकांच्या मागे जाणार नाहीत. खायला दिल्यावर कागद किंवा भांडी उचलून जागा स्वच्छ करा.

४. दत्तक प्रक्रिया (Adoption over Buying)

आपल्याला 'ब्रीड' (Breed) कुत्र्यांचे आकर्षण असते, पण भारतीय हवामानासाठी आपले देशी कुत्रे (Indian Pariah/Indie Dogs) सर्वात उत्तम असतात. त्यांची रोगप्रतिकारक शक्ती जास्त असते व देखभाल खर्च कमी असतो. जर प्रत्येक कॉलनीने किंवा काही कुटुंबांनी मिळून रस्त्यावरच्या एका पिल्लाला दत्तक घेतले, तर रस्त्यावरील कुत्र्यांची संख्या आपोआप कमी होईल. याला 'कम्युनिटी डॉग' (Community Dog) संकल्पना म्हणतात व या संकल्पनेतून आपण निरोगी स्वस्थ कुत्र्यांची संख्या नियंत्रित करू शकतो.

५. शाळांमधून अथवा पालकांकडून मुलांमध्ये जनजागृती

लहान मुलांना कुत्र्यांशी कसे वागावे हे शिकवावे कारण सर्वाधिक चावे व रेबीज होण्याचे प्रमाण लहान मुलांमध्ये आहे. कुत्र्याच्या पिल्लाला दगड मारणे, शेपटी ओढणे किंवा झोपलेल्या कुत्र्याला त्रास देणे यामुळे कुत्रे चिडून चावा घेतात. त्यामुळे मुलांना 'डॉग बाइट प्रिव्हेन्शन' (Dog Bite Prevention) बद्दल माहिती द्यावी–उदा. कुत्रा जवळ आल्यास पळून न जाता शांत उभे राहणे. झोपलेल्या किंवा खात असलेल्या कुत्र्याला त्रास देऊ नये किंवा पिल्लांसोबत असणाऱ्या कुत्री जवळ जाणे टाळणे.

६. लसीकरण (Vaccination)

आपल्या भागातील कुत्र्यांसाठी वर्षातून एकदा 'अँटी-रेबीज' लसीकरण मोहीम राबवण्यासाठी पुढाकार घ्या. यासाठी स्थानिक डॉक्टरांची मदत घेता येते. लसीकरण झालेला कुत्रा चावला तरी रेबीजचा धोका नसतो, यामुळे नागरिकांमधील भीती कमी होते.

भटक्या कुत्र्यांची समस्या ही एक सामाजिक व व्यवस्थापकीय समस्या आहे. यावर द्वेष, हिंसा किंवा भीती हे उत्तर नसून 'ABC' हेच उत्तर आहे:

A - Awareness (जनजागृती)
B - Birth Control (नसबंदी)
C - Cleanliness (स्वच्छता)

कुत्र्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलून, थोडी माणुसकी व थोडी शिस्त अंगी बाळगली, तर माणूस व प्राणी यांचे सहजीवन नक्कीच सुखकर होऊ शकते. भटक्या कुत्र्यांची समस्या ही क्रूरतेने नाही, तर वैज्ञानिक पद्धतीने (नसबंदी व लसीकरण) व कचरा व्यवस्थापनानेच सुटू शकते.

सहजीवनाची संकल्पना (Coexistence)

'कुत्रे मुक्त शहर' ही संकल्पना व्यावहारिक नाही व वैज्ञानिकदृष्ट्या शक्यही नाही. कारण, जर आपण एका भागातील कुत्रे मारले किंवा दुसरीकडे सोडले, तर व्हॅक्यूम इफेक्टनुसार बाजूच्या भागातील कुत्रे त्या रिकाम्या जागी येतात व पुन्हा प्रजननास सुरुवात करतात. त्यामुळे 'कुत्रे मुक्त' होण्याच्या मागे लागण्यापेक्षा 'रेबीज मुक्त' व 'संघर्ष मुक्त' समाज घडवणे हे आपले ध्येय असले पाहिजे.

ब्रॉयलर पक्षीपालनातील यांत्रिकीकरण

येत्या काळात पक्षांसाठी अद्यावत शेडची बांधणी, उपकरणे व संगणकिकरणाचा वापर वाढणार आहे. कुक्कुटपालन उद्योगासाठी, उपकरणांच्या निर्मितीमध्ये, आधुनिकता येत आहे. यामुळे पक्षांपासून किफायतीशिर व उच्चतम उत्पादन मिळविणे शक्य होणार आहे. कुक्कुटपालनाच्या विकासासाठी ज्या अनेक गोष्टी कारणीभूत ठरल्या आहेत, त्यामधील एक गोष्ट म्हणजे पक्षीसंगोपनासाठी वापरली जाणारी उपकरणे. पक्षांच्या शेडबांधणीपासून ते अद्यावत उपकरणांच्या वापरापर्यंत सगळ्याच गोष्टींचा उपयोग पक्षांतील उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी होत आहे. गेल्या काही वर्षात पक्षांची गुणवत्ता, व्यवस्थापनातील तंत्रज्ञान, पक्षांसाठी सुयोग्य व संतुलीत खाद्य व रोगप्रतिबंधक उपाययोजनामधील अत्याधुनिकता ही चतुःसुत्री कुक्कुटपालन व्यवसायाच्यावाढीसाठी फायदेशीर ठरली आहे. व्यावसायिक मांसल पक्षीपालनासाठी तयार केल्या जाणाऱ्या पक्षांच्या गुणधर्माच्या उत्तमपणावर पक्षांची निवड केली जाते. झपाटयाने वाढण्याची क्षमता, खाद्य खाण्याची क्षमता, पायांची उंची व जाडी, छातीचा भारदारपणा, रुंदी व खोली, जिवंत राहण्याची क्षमता, खाद्याचे मांसात रुपांतर करण्याची क्षमता या गोष्टी विचारात घेतल्या जातात. अशा मांसल पक्षांच्या व्यवस्थापनासाठी कालानुरुप व आवश्यकतेनुसार सर्व उपकरणांची निर्मिती व त्यात अधुनिकता व स्वयंचलित वापरासाठी योग्य उपकरणे तयार करणे अतिशय आवश्यक आहे.

प्राध्यापक डॉ. विजयसिंह लोणकर
कुक्कुटपालनशास्त्र विभाग
क्रांतिसिंह नाना पाटील
पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ

ब्रॉयलर पक्षीपालनामध्ये आधुनिक उपकरणांची गरज :

जसजशी कुक्कुटपालन व्यावसायाची प्रगती होत गेली तसतशी आधुनिक उपकरणांची गरज व त्यांचे महत्वसुध्दा वाढत गेले. मजूर टंचाईच्या काळात अद्यावत उपकरणांचा वापर, स्वयंचलित आधुनिक उपकरणे व जेथे शक्य आहे तेथे संगणकीय नियंत्रण ही काळाची गरज आहे. पक्षांना खाद्य पुरविणे, पाणी पुरविणे, शेडमधील तापमान, आर्द्रता व वायुविजन पक्षांच्या आवश्यकतेनुसार राखणे, लसीकरण, औषधोपचार, पक्षांसाठी खाद्यनिर्मिती, पक्षांचे वजन, घरांची साफ-सफाई, पक्षी गोळा करणे अशा अनेक कामासाठी उपकरणे वापरली जातात. सुयोग्य उपकरणांच्या माध्यमातून ब्रॉयलर पक्षी पालकांना पक्षांची उत्पादन क्षमता वाढविण्यास मदत होते. याच बरोबरीने श्रम, वेळ व खर्च वाचल्यामुळे व्यवसायामधील किफायतीशिरपणाही वाढतो. यांत्रिकीकरणाद्वारे व्यवस्थापन करत असताना मानवी चुकांवर नियंत्रण ठेवता येते. पक्षांना आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी योग्यवेळी योग्य प्रमाणात पुरवाव्या लागतात. म्हणूनच पक्षीपालनामध्ये उपकरणांचे मोठे महत्व आहे.

शेडमधील वातावरण सुयोग्य राखणे :

वातावरण नियंत्रित घरे तयार करण्यासाठी लागणारी उपकरणे ही अत्याधुनिक असतात. त्यांच्याद्वारा शेडमधील तापमान आर्द्रता व वायुविजन योग्यप्रकारे राखले जाते. त्यामुळे पक्षांना वातावरणातील बदलांचा त्रास व ताण सहन करावा लागत नाही व पक्षांची उत्पादन क्षमता वाढते. शेडमध्ये जास्त पक्षी ठेवणे शक्य झाल्याने आर्थिक फायद्यामध्ये सुध्दा वाढ होते.

स्वयंचलित खाद्य यंत्रणा :

मानवी पध्दतीने खाद्य पुरवठा करताना काही वेळा असमान पध्दतीने खाद्याचे वितरण होते. त्यामुळे पक्षांच्या वजनावर बराच फरक पडतो. वाया जाणाऱ्या खाद्यावर नियंत्रण मिळविणे अवघड जाते. याउलट स्वयंचलित खाद्य यंत्रणेतून अचूक प्रमाणात व कमी वेळेत खादय संपूर्ण शेडमध्ये एकसमान प्रमाणात दिले जाते. यामुळे पक्षांचे वजन एकसमान राखले जाऊन उत्पादनात वाढ होते. खाद्य वाया जात नाही. उत्पादन खर्च कमी होऊन नफ्यात वाढ होते. मजूरांची गरज कमी होते. आजारांच्या संक्रमणावर नियंत्रण मिळवता येते.

स्वयंचलित पाणीपुरवठा यंत्रणा :

नेहमीच्या पाणीपुरवठा पध्दतीमुळे शेडमध्ये पक्षांना पाणी देताना भरपूर प्रमाणात वाया जाते. लिटर ओले होऊन अमोनिया व इतर वायूंचे प्रमाण वाढते. त्यामुळे पक्षांचे कार्य बिघडते. आजारी पक्षांची लाळ पाण्याच्या भांड्यात गळल्याने रोगांचे संक्रमण जलद गतीने होते. स्वयंचलित प्रणालीमध्ये निपलने पाणी देण्याची सोय आहे. शेडमध्ये पक्षांच्या उंचीच्या वरच्या पातळीत निपल बसविले जातात. बंदिस्त पाईपलाईनद्वारे पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे पाणी वाया जात नाही. लिटर कोरडे राहते. वातावरण चांगले राहते. पक्षांची लाळ पाण्यामध्ये पडत नाही. पाणीपुरवठयाचे पाईप्स बंद व अपारदर्शक असल्याने जिवाणू व शेवाळामुळे होणारे रोगाचे संक्रमण होत नाही. मजूरांची गरज कमी होते. आजार व संक्रमणावर नियंत्रण राखले जाते.

पक्षांसाठी विविध प्रकारचे शेड :

मांसल पक्षी हे गादी पध्दतीतील शेडमध्ये सांभाळले जातात. काही भागामध्ये शेडमधील वातावरण नियंत्रित करण्याची गरज असते. पक्षांसाठी पूर्णपणे बंधिस्त पध्दतीचे व खुल्या पध्दतीचे वातानुकुलीत शेडची बांधणी करता येते. पूर्ण बंदिस्त शेडमध्ये एका बाजूने इव्हेंपोरेटीव कुलींग पध्दतीने थंड हवा शेडमध्ये सोडली जाते व दुसऱ्या बाजूने खेचून बाहेर फेकली जाते.

त्यासाठी एक्झॉस्ट फॅनचा वापर केला जातो. यामुळे शेडमधील तापमान, आर्द्रता व वायुविजन संतुलन केले जाते. अशा शेडमधील वातावरण संगणकाच्या सहाय्याने पूर्णपणे नियंत्रित ठेवता येते. अशा प्रकारची स्वयंचलीत शेड ० अंश से. पेक्षा कमी व ४० अंश से. पेक्षा जास्त तापमान असणाऱ्या वातावरणामध्ये यशस्वीरित्या वापरता येतात. भोवतालचे वातावरण वर्षभर साधारण राहत असेल तर आपण ओपन हाऊसचा वापर करु शकतो.

स्लॉटर युनिट :

किरकोळ विक्री करत असताना मांसल पक्षांची योग्य पध्दतीने कत्तल, स्वच्छतेची काळजी घ्यावी. स्वयंचलित छोटे स्लॉटर युनिट उभारुन स्वच्छ मांस आकर्षक पॅकींगमध्ये ग्राहकांना पुरविणे गरजेचे आहे. पक्षी कापत असताना रक्त उडते व सर्व परिसर घाण होतो. ते टाळण्यासाठी ब्लीडींग कोन वापरले जातात. त्यानंतर पक्षांना ५८ अंश से. तापमानाचे पाणी असलेल्या भांड्यामध्ये बुडविले जाते. त्यामुळे पक्षांच्या शरिरावरील पिसे निघून जाण्यास मदत होते. गरम पाण्याच्या भांड्यातून म्हणजेच स्काल्डरमधून पक्षी बाहेर काढल्यानंतर डीफीदर मशिनमध्ये टाकले जातात. या मशिनच्या सहाय्याने पक्षांच्या शरिरावरील पिसे पूर्णपणे निघून जातात. त्यानंतर पक्षी स्वच्छ धुतला जातो व एव्हीसरेशन केले जाते. अशाप्रकारे स्वयंचलित छोट्या स्लॉटर युनिटचा वापर करुन स्वच्छ मांस निर्मिती करता

वातानुकूलीत पोल्ट्रीतील स्वयंचलित उपकरणे

आपल्याकडे ब्रॉयलर, लेअर तसेच ब्रिडर पोल्ट्री फार्मची संख्या वाढत आहे. याचबरोबरीने अंडी उबवणी केंद्र, चिकन सेंटर तसेच प्रक्रिया केंद्राच्या ठिकाणी आधुनिक स्वयंचलित उपकरणांचा वापर वाढतो आहे. यामुळे कमी कालावधीत योग्य पध्दतीने कोंबड्या व व्यवसायाचे व्यवस्थापन करणे शक्य झाले आहे.

वातानुकूलित फार्म

ब्रॉयलर कोंबड्यांसाठी प्रामुख्याने पोल्ट्री शेडच्या लांबीच्या दोन्ही बाजूंनी जाळी मारुन उघडे असलेल्या गादी पध्दतीच्या शेडचा वापर केला जातो, परंतु बदलणाऱ्या तापमानामुळे कोंबड्यांवर अतिउष्ण व अति थंड तापमानाचा विपरीत परिणाम होतो. कोंबड्यांच्या चांगल्या वाढीसाठी प्रामुख्याने १८ ते २५ अंश सेल्सिअस तापमानाची आवश्यकता असते. वातानुकूलित शेडचा वापर हा अतिउष्ण किंवा अतिथंड तापमान असलेल्या ठिकाणी केला जातो. वातानुकूलित एका शेडची कोंबडीपालन क्षमता ही ५०,००० ते १,००,००० एवढी असते. साधारणतः या शेडच्या बांधकामाकरिता १,००० ते १,४०० रुपये प्रति कोंबडी खर्च येतो. वातानुकूलित शेडचे तापमान हे १८ ते २५ अंश सेल्सिअस एवढे ठेवता येते, त्यामुळे कोंबड्यांची चांगली वाढ होते, मरतुकीचे प्रमाण कमी होते. कमी जागेत जास्त कोंबड्या पाळता येतात. मजुरी खर्चात बचत होते.

दोन्ही बाजूंनी उघडे असलेल्या गादी पध्दतीत एका कोंबडीस १ ते १.२ चौरस फूट जागा लागते, परंतू वातानुकूलित शेडमध्ये एका कोंबडीला ०.६ चौरस फूट जागा मिळते. शेडमध्ये बुडिंग तापमान, वायुवीजन, आर्द्रता, खाद्य पुरवठा हा संगणकाद्वारे नियंत्रित केला जातो.

निपलच्या सहाय्याने पाणीपुरवठा-

- ब्रॉयलर व्यवस्थापनामध्ये प्रामुख्याने हाताने भरावयाचे किंवा बेल ड्रिंकर उपकरणांचा वापर केला जातो, परंतु यातून कोंबड्यांना दूषित पाण्याचा पुरवठा होण्याची शक्यता असते. तसेच पाणी भरणे, भांडी धुण्याकरिता जास्त कामगार लागतात.
- निपल ड्रिंकिंग पध्दतीमध्ये लोखंडी पाइपला ठराविक अंतरावर निपल व कप लावलेले असतात. हा पाइप शेडमधील मोठ्या पाण्याच्या टाकीला प्रेशर व्हॉल्व्हने जोडला जातो.
- पाइपची उंची कोंबड्यांच्या उंचीनुसार कमी-जास्त करता येते. यामुळे कोंबड्यांना सहजपणे पाणी पिता येते.
- या पध्दतीमध्ये कोंबडीला तहान लागली की ती चोचीच्या सहाय्याने निपलला वरती ढकलते. यातून पाणी येते. चोच काढल्यानंतर पाणी बंद होते. पाणी पितेवेळी जर काही थेंब पाणी पडले तर ते निपलच्या खाली लावलेल्या कपामध्ये साठते. काही कोंबड्या या कपामधील साठलेले पाणीही पितात..
- निपल ड्रिंकिंग पध्दतीमुळे कोंबडीला शुध्द व ताजे पाणी मिळते. त्यामुळे रोगाचे प्रमाण कमी हाते.
- निपल ड्रिंकिंग पध्दतीचा वापर कोणत्याही प्रकारच्या शेडमध्ये करता येतो. साधारणतः एक निपल हे १० ते १२ कोंबड्यांसाठी उपयुक्त ठरते.

स्वयंचलित खाद्य उपकरणे-

- खाद्य उपकरणे ही विना वातानुकूलित गादी पध्दत व वातानुकूलित गादी पध्दतीत वापरता येतात.
- स्वयंचलित खाद्य भांडी ही कोंबड्यांच्या क्षमतेनुसार एका ठराविक अंतरावर खाद्य वाहून नेणाऱ्या लोखंडी पाइपला (कन्व्हेअर) जोडली जातात. नंतर हा पाइप खाद्य साठवण कोठाराला (सायलो) जोडलेला असतो.
- खाद्य भांडी जोडलेला पाइप कोंबड्यांच्या वयानुसार किंवा उंचीनुसार शेडमध्ये लटकविलेला असतो, त्यामुळे कोंबडीला सहज खाद्य खाता येते.
- विद्युत मोटारच्या सहाय्याने कोठारातून कन्व्हेअरच्या मार्फत खाद्य सर्व भांड्यांत भरले जाते.
- शेडच्या बाहेर असलेल्या खाद्य साठवण कोठाराची (सायलो) क्षमता ही शेडमधील कोंबड्यांच्या संख्येवर अवलंबून असते.
- फीड मिलमध्ये तयार झालेले खाद्य हे कन्व्हेअर किंवा वाहनाच्या सहाय्याने खाद्य साठवण कोठारमध्ये भरले जाते. साधारणतः एक स्वयंचलित खाद्य भांडे हे ५० ते ६० कोंबड्यांना उपयोगी ठरते. शेडमध्ये दोन रांगांमध्ये ठराविक अंतराने स्वयंचलित खाद्य भांडी लावली जातात.
- स्वयंचलित खाद्य भांड्यांना संगणकाद्वारे ठराविक वेळेनुसार चालू व बंद करता येते. यामुळे कोंबड्यांना ताजे खाद्य मिळते. खाद्यांची नासाडी कमी होते. या पध्दतीमुळे प्रत्येक खाद्याचे भांडे हाताने भरण्याऐवजी एक विद्युत मोटार व कन्व्हेअरच्या सहाय्याने सर्व भांड्यांमध्ये एकाचवेळी खाद्य पुरवठा केला जातो. यामुळे वेळ व कामगारांवर होणाऱ्या खर्चात बचत होते.

स्वयंचलित पडदे (कर्टन)-

वातावरणानुसार शेडच्या बाजूच्या पडद्यांना उघडणे व बंद करणे गरजेचे असते, परंतु शेडची क्षमता जास्त असल्यास पडद्याची उघड झाप करणे अवघड जाते, वेळ लागतो, त्यामुळे अशावेळी पडद्यांना एकाचवेळी उघडे व बंद करण्यासाठी विविध पध्दतीचा वापर केला जातो.

❖ यामध्ये पडद्यांना एक विशिष्ट प्रकारे वायरने बांधून एका गिअरला बांधले जातात. गिअर हाताच्या किंवा मोटरच्या सहाय्याने फिरवून पडदे खाली वर केले जातात.

स्वयंचलित प्रकाश पध्दती-

➢ कोंबड्यांना खाद्य खाण्यासाठी, पाणी पिण्यासाठी व त्यांच्या वाढीसाठी कृत्रिम प्रकाशाची आवश्यकता असते. बऱ्याच वेळी शेडमधील दिवे आवश्यकता नसतानाही चालू राहतात, अशावेळी शेडची संपूर्ण प्रकाश योजना ही टायमरच्या सहाय्याने चालू व बंद केली जाते.

➢ शेडमध्ये प्रामुख्याने एलईडी किंवा सीएफएल दिव्यांचा वापर करणे फायदेशीर ठरते.

स्वयंचलित फॉगर प्रणाली -

➢ शेडमधील तापमान, आर्द्रता नियंत्रित ठेवण्याकरिता फॉगर प्रणालीचा वापर केला जातो.

➢ फॉगर प्रणाली ही शेडमधील तापमान वाढले किंवा आर्द्रता एकदम कमी झाल्यास सेन्सरच्या मदतीने स्वयंचलितरित्या चालू व बंद होते. या प्रणालीकरिता टायमरचाही वापर केला जातो. टायमर ठराविक वेळेनुसार चालू होतात व ठराविक वेळेनंतर बंद होतात.

➢ ही प्रणाली विनावातानुकूलित शेडमध्ये पण उन्हाळयात मोठ्या प्रमाणात वापरली जाते. यामुळे शेडमधील तापमान व वाढत्या धुळीवर नियंत्रण करता येते.

➢ फॉगर पीव्हीसी पाइपला ठराविक अंतराने लावले जातात. त्या पाईपमध्ये पाण्याचा दाब राहण्यासाठी ०.५ ते एक अश्वशक्तीची मोनोब्लॉक मोटर जोडली जाते. एक अश्वशक्तीची मोटर ही साधारणतः ३५० फूट बाय ४५ फूट लेअर शेड व ४०० फूट बाय ३० फूट ब्रॉयलर शेडकरिता वापरली जाते.

➢ शेडमध्ये पाइप ६ ते ७ फूट उंचीवर बांधला जातो. पाण्याच्या दाबामुळे फॉगर नोझलमधून असंख्य प्रमाणात अगदी लहान तुषार (१५-२० मायक्रॉन) शेडमध्ये पसरतात. यामध्ये दाब हा २५ किलो किंवा ३५० पीएसआय एवढा असतो. अशा फॉगर प्रणालीचा ब्रॉयलर, लेअर व ब्रीडर शेडमध्ये वापर केला जातो.

स्पिंकलर प्रणाली -

❑ स्प्रिंकलर प्रणाली छतावरती बसवली जाते. प्रामुख्याने उन्हाळ्यात या प्रणालीचा वापर केला जातो.

❑ तापमान कमी करण्यासाठी ही प्रणाली वापरतात.

❑ ठराविक अंतरावर पीव्हीसी पाइपला स्प्रिंकलर बसविलेले असतात. या पाइपमधून विशिष्ट दाबाने पाणी सोडले जाते. त्यासाठी मोनोब्लॉक मोटर बसवलेली असते.

❑ स्प्रिंकलर असलेला पाइप शेडच्या मध्यभागी छतावर बसवला जातो, त्यामुळे छताच्या दोन्ही बाजूला पाणी पडून छत थंड राहण्यात मदत होते.

❑ स्प्रिंकलर प्रणालीमुळे शेडमधील तापमान २ ते ४ अंश सेल्सिअसने कमी होते.

सांगलीची शान: नफा देणारी 'मडग्याळ' मेंढी

मेंढपाळांच्या मते मडग्याळ मेंढीची उत्पत्ती सुमारे १०० वर्षांपूर्वी सांगली जिल्ह्यातील मडग्याळ व सनमाडी गावात स्थानिक मेंढीपालकांनी निवड पैदास पद्धतीने केली आहे. मडग्याळ मेंढ्या झपाट्याने वजन वाढवण्याची क्षमता दर्शवतात. मडग्याळ ही महाराष्ट्रातील मोठ्या आकाराची व मटणासाठी विशेष लोकप्रिय मेंढी आहे. प्रामुख्याने पांढऱ्या रंगावर तपकिरी ठिपके आढळतात तर काही मेंढ्या तपकिरीदेखील दिसतात. महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्याने आज पशुपालनात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. जत व कवठेमहांकाळ तालुक्यातील 'माडग्याळ' मेंढी आज मेंढीपालकांसाठी प्रगतीचा मार्ग ठरत आहे. धिप्पाड शरीर व आकर्षक रोमन पद्धतीचा बाक असलेल्या नाकामुळे या जातीने देशभरातील पशुपालकांचे लक्ष वेधले आहे.

शारीरिक वैशिष्ट्ये:

पोपटी नाक: हे या जातीचे मुख्य ओळखचिन्ह असून, यामुळे मेंढ्यांना अधिक दर मिळतो. शेपटी मध्यम व पातळ असून लोकर अत्यंत खडबडीत, केसाळ व उघडी असते.

भव्य कपाळ: रुंद व फुगीर कपाळ ही यांची ओळख आहे.

शरीररचना: पाय लांब, मजबूत व राखाडी खुरांसह पातळ असतात. पांढऱ्या रंगावर तपकिरी ठिपके त्यांचे सौंदर्य वाढवतात.

वजन वाढ व उत्पादन

- मांसाहारासाठी मडग्याळ जात सर्वोत्तम आहे
- जन्मावेळी कोकराचे वजन साधारण ३.५ ते ४.५ किलो.
- उत्तम आहारात वर्षभरात २० ते ३५ किलोपर्यंत पोहोचते.
- पूर्ण वाढलेल्या नराचे वजन ४० ते ५० किलोपर्यंत असू शकते.
- वयस्क मडग्याळ नर साधारणतः ५५ ते ६० किलो तर मादी ४० ते ४५ किलो वजनाची आढळते.

मुख्यतः धनगर व रामोशी समाजातील मेंढपाळ/शेतकरी या मेंढया पाळतात. मेंढ्यांचे कळप स्थलांतरित आहेत. विषम हवामानात परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता, उत्तम रोग प्रतिकारशक्ती, जलद वजन वाढवण्याची क्षमता, कोकरू जगण्याची अधिक क्षमता, मातृत्वाची चांगली प्रवृत्ती व चांगले कळप व मटण उत्पादनासाठी फायदेशीर अशा गुणवैशिष्ट्यांमुळे मडग्याळ मेंढ्या दिवसेंदिवस लोकप्रिय होत आहेत. कातडीचा रंग पांढरा ते फिकट तपकिरी आढळून येतो. डोके, चेहरा, पोट व पाय लोकर विरहित आहेत. त्यांच्या डोळ्याभोवती तपकिरी रंगाचे वलय असते. पाठीचा कणा सरळ आहे. नर व मादी यांच्यात शिंगे नसतात व त्यांना विशिष्ट फुगिर ठेवणीचे (रोमन) नाक आहे. कमी खर्चात जास्त नफा देणारी मडग्याळ जात शेतकऱ्यांसाठी वरदान आहे. योग्य व्यवस्थापन व लसीकरण केल्यास हा व्यवसाय शेतीला उत्तम जोड ठरु शकतो.

संकलन:

जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय कार्यालय, सांगली

अर्थकारण

१० माद्या व १ नर यापासून सुरुवात केल्यास,

विक्री: नर कोकरे सणांच्या वेळी २०,००० ते ५०,००० रुपयांपर्यंत विकली जातात. **पैदास:** माडग्याळ मेंढी २ वर्षांतून ३ वेळा वेत देते. **खत:** लेंडीखताच्या विक्रीतून अतिरिक्त उत्पन्न मिळते. **गोठा :** कोरडा व हवेशीर असावा. एका मेंढीला १०-१२ चौरस फूट जागा लागते. * जमीन लाकडी फळ्यांची असल्यास रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो.

माळेगाव यात्रा : ग्रामीण संस्कृतीची प्रयोगशाळा !

मराठवाडा ही संतांची व वीरांची भूमी. याच भूमीतील नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यात वसलेले माळेगाव दरवर्षी एका जागतिक कीर्तीच्या उत्सवासाठी सज्ज होते. मार्गशीर्ष अमावास्येला सुरू होणारी ही यात्रा केवळ धार्मिक विधींपुरती मर्यादित नसून, ती संस्कृती, व्यापार व सामाजिक सलोख्याचा एक अनोखा संगम आहे. दरवर्षी डिसेंबर महिन्यात भरणारी ही यात्रा दक्षिण भारतात प्रसिद्ध आहे.

माळेगाव यात्रेला जवळपास ४०० वर्षांचा इतिहास आहे. मोगल व निजामांच्या काळापासून या यात्रेचे महत्त्व टिकून आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या भगवान खंडोबाचे देखणे मंदिर या यात्रेचे मुख्य श्रद्धास्थान आहे. ऐतिहासिक काळापासून हे गाव घोड्यांच्या व्यापारासाठी ओळखले जाते. आजही तेलंगणा, कर्नाटक व महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून व्यापारी व भाविक येथे मोठ्या संख्येने येतात.

जनावरांचा बाजार: आशियातील दुसरे मोठे केंद्र

राजस्थानच्या पुष्कर मेळ्यानंतर घोड्यांच्या व्यापारासाठी माळेगावची यात्रा ही दुसरी मोठी बाजारपेठ मानली जाते. येथे चेतक, मारवाडी व पंजाबी अशा उच्च जातीच्या घोड्यांची कोट्यवधींची उलाढाल होते. केवळ घोडेच नव्हे, तर उंट, बैल, गाई, शेळ्या-मेंढ्या व गाढवांचीही मोठी बाजारपेठ येथे भरते. विशेषतः वीटभट्टी व्यावसायिक गाढवांच्या खरेदीसाठी येथे गर्दी करतात. आधुनिक तंत्रज्ञान व नवीन बियाण्यांची माहिती देणारे कृषी प्रदर्शन हे शेतकऱ्यांसाठी ज्ञानाचे भांडार ठरते. माळेगाव यात्रा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पाच ते सात दिवसांतच येथे कोट्यवधींची उलाढाल होते.

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार

ही यात्रा ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देणारे एक मोठे केंद्र आहे. अवघ्या ७-८ दिवसांत येथे कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते. या यात्रेने स्थानिक मजुरांना मोठा रोजगार उपलब्ध करून दिला आहे. पूर्वीची 'वस्तुविनिमय पद्धत' (Barter System) जाऊन आता येथे UPI व डिजिटल व्यवहारांनी जागा घेतली आहे, जे यात्रेच्या आधुनिकीकरणाचे प्रतीक आहे.

लोककलांचे माहेरघर

माळेगाव यात्रा म्हणजे महाराष्ट्राच्या मातीतील कलांचा उत्सव. अगदी लोककलेचे माहेरघरच. येथे कलगी-तुरा, वाघ्या-मुरळी, गोंधळ व भारूडाचे सूर घुमतात. नामांकित तमाशा फडांची जुगलबंदी हे या यात्रेचे मुख्य आकर्षण असते. 'मौत का कुआँ' सारखे चित्तथरारक खेळ व कुस्त्यांची दंगल बघण्यासाठी लोकांची तुडुंब गर्दी होते.

सामाजिक सलोख्याचे प्रतीक

माळेगावची यात्रा ही जात-पात व धर्माच्या पलीकडे जाणारी आहे. सर्वधर्मीय लोक या उत्सवात आनंदाने सहभागी होतात. बदलत्या काळातही या यात्रेने आपली पारंपारिक ओळख जपली आहे. बैलगाडीपासून सुरू झालेला हा प्रवास आज आलिशान गाड्यांपर्यंत येऊन पोहोचला असला, तरी यात्रेतील 'मातीचा सुगंध' आजही तसाच आहे. थोडक्यात सांगायचे तर, माळेगावची ही यात्रा केवळ एक उत्सव नाही, तर ते ग्रामीण संस्कृतीचे वैभव व हजारो हातांना काम देणारे एक समृद्ध व्यासपीठ आहे.



माळेगाव यात्रेत मथुरा लभाण गोवंश ठरला आकर्षण

मथुरा-लभाण गोवंशाचे प्रजनन क्षेत्र हे नांदेड जिल्ह्यातील किनवट, हिमायतनगर, भोकर तालुक्यांमध्ये तसेच लगतच्या यवतमाळ व आदिलाबाद जिल्ह्यामध्ये आढळून येते. हा गोवंश मथुरा, लभाणी व बंजारा समुदायाकडे २०० वर्षापेक्षा अधिक दिवसांपासून असल्याचे समजते. या गायी बहुतांशी पांढऱ्या रंगाच्या असून, क्वचितच हलक्या राखेरी रंगामध्ये पहावयास मिळतात. त्वचा चमकदार व शरीराला घट्ट चिटकलेली असते. डोळे काळे व पाणीदार असतात. कपाळ रुंद व सपाट असते. चेहरा निमुळत्या आकाराचा असतो.

मथुरा-लभाण गायी या मध्यम बांध्याच्या असून शिंगे बाहेरच्या दिशेने वर जाऊन पुन्हा आतल्या बाजूने वळलेले असतात. कान मध्यम आकाराचे असून बाहेरील पृष्ठभाग राखाडी रंगाचा असतो. दोन्ही पायांमधील छातीचा भाग अरुंद असतो. छाती पोळ मध्यम आकाराची, लटकलेली असते. शेपटी पायाच्या घोट्यापर्यंत लांब असून गोंडा काळा व झुपकेदार असतो. कास मध्यम आकाराची शरीरास घट्ट चिकटलेली असून दुधाची शीर ठळक व सरळ असते. सड हे दंडगोलाकार असतात. गायी दिवसाकाठी १.५ - २ लिटर दूध देतात. सर्व गायी वळूद्वारे नैसर्गिक पद्धतीने फळवल्या जातात. त्यामुळे या जातीचे शारीरिक गुणधर्म टिकून आहेत. बैल प्रामुख्याने शेती व ओढकामासाठी वापरले जातात. चारा व पाणी यांच्या अभावामुळे उन्हाळ्यात हा गोवंश स्थलांतरित करून जूनमध्ये परत आणला जातो. मथुरा लभाणच्या अभ्यासासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी नाविन्यपूर्ण योजनेत १८७५००० रु. मंजूर केलेले आहेत. त्यानुषंगाने पशुवैद्यकीय महाविद्यालय, परभणी यांचेसोबत काम सुरू आहे.

माळेगाव यात्रा पशु-पक्षी प्रदर्शनातील विजेत्या पशुपालकांची नावे

१. लाल कंधारी गट

- **अदात वळू:** श्री. सुशील माधव सापनर, श्री. आकाश संभाजी ईटकापल्ले, श्री. प्रभाकर व्यंकटी सूर्यवंशी
- **दोन दात वळू:** श्री. सुधाकर सायरेड्डी जडलवार, श्री. भगवान गणपती चावरे, श्री. गोविंदा तुकाराम येरमे
- **चार दात व पुढील:** श्री. परसराम नागनाथ सापनर, श्री. तिरूपति देवराव केंद्रे, श्री. संग्राम संभाजी मुस्तापुरे
- **गाय गट:** श्री. रामेश्वर उद्धव मुंडे, श्री. नारायण धोंडीबा जाधव, श्री. विठ्ठल बालाजी पांडुरणे
- **कालवड गट:** श्री. परमेश्वर प्रभाकर केंद्रे (चॅम्पियन), श्री. कमलाकर विश्वंभर मुळे, श्री. तुळशिरम सुखदेव सापनर
- **नर वासरे:** श्री. अंकुश भाऊराव धुळगुंडे, श्री. विठ्ठल किशनराव देवकते, श्री. अमोल केरबा शिंदे
- **मादी वासरे:** श्री. रामदास यादव पवार, श्री. संतोष माधव सापनर, श्री. दत्ता थोराजी सुरनर

२. देवणी गट

- **अदात नर:** श्री. अमर बालाजी गडदे, श्री. थोरात विनायक श्रीमंत, श्री. इडमे गणेश ज्ञानोबा
- **दोन दात नर:** श्री. रज्जाकअली उस्मानअली पटेल, श्री. ग्यानबा सिद्राम सरवदे, श्री. सुखदेव माधव सापनर
- **चार दात व वरील नर:** श्री. यूसुफ उस्मान पटेल, श्री. बालाजी बाबुराव गडदे, श्री. शिवाजी रामराव हाके
- **गाय:** श्री. काशीनाथ हरिबा रोडगे, श्री. सोनेराव श्रीपति लपटे, श्री. मनोज सुभाष वाघमारे
- **कालवड:** श्री. बालाजी मारोती केंद्रे (चॅम्पियन), श्री. माधव पांडुरंग केंद्रे, श्री. गोपाळ बालाजी जाधव
- **नर वासरे:** श्री. थोरात विनायक श्रीमंत, श्री. देवकत्ते बालाजी रुकमाजी, श्री. सुरेश शेषराव शिसोदे
- **मादी वासरे:** श्री. नारायण माधावराव खरात, श्री. संतोष बालाजी तिडके, श्री. अमोल केरबा शिंदे

३. एच. एफ. संकरीत (HF)

- **गाय:** श्री. कृष्णा रामचंद्र यरमे, श्री. भास्कर माधव भुरे, श्री. पांडुरंग संभाजी इडमे
- **कालवड:** श्री. निळकंठ नागनाथ हाडोळीकर, श्री. शिवाजी सोपान जाधव, श्री. पांडुरंग काशीनाथ देशटवार
- **वासरे:** श्री. पवन दत्ता मुकनर, श्री. माधव गुणजी भुरे, श्री. निळकंठ नागनाथ हाडोळीकर

४. संकरीत जर्सी

- **गाय:** श्री. पांडुरंग काशीनाथ देशटवार, श्री. पस्तापुरे व्यंकट सोपान, श्री. गोपाळ ज्ञानोबा येलगटे

(टीप: कालवड व वासरे गटात कोणाचेही नाव नमूद नाही)

५. अश्व गट (नर व मादी)

- **अश्व अदा:** श्री. सुरजितसिंघ जीवनसिंघ गिरणीवाले, श्री. गोपाळ पांडुरंग रंगभाळ, श्री. पृथ्वीराज सुरेशराव पाटील
- **अश्व दोन दात:** श्री. श्रीकांत भीमाशंकर स्वामी, श्री. टीवाना आज्ञापालसिंह जसबीर, पठाण इमरानखान नुरुल्लाखान
- **अश्व चार दात:** श्री. अभिषेक नंदकिशोर अडकटलवार, श्री. निखिलेश चंद्रकांत देशमुख, श्री. गुरुज्योतसिंघ गल्लीवाले
- **अश्व चार दातावरील :** श्री. अमोल विजयकुमार लोमटे, श्री. भगवान रामचंद्र पाटील, सहेजाद अली

६. शेळी, कुक्कुट व श्वान गट

- **शेळी:** श्री. अशोक धोंडीबा डोने, श्री. जयश्री गोपाळ आडे, श्री. कृष्णा शिवाजी केंद्रे
- **कुक्कुट (असील):** श्री. कुरेशी अझरोदीन नवाजोदिन, शेख आसिफ अहमद, सय्यद सोहेब रफिक
- **कुक्कुट (देशी):** श्री. मुंडे नवनाथ संजय, श्री. चव्हाण बालाजी वामन, श्री. वाघमारे दिलीप मरिबा

- **श्वान (प्रमुख विजेते):** श्री. ओमप्रकाश गणेश भिंगोले (टॉय ब्रिड), श्री. सुजित संतोष सोलकर (जर्मन शेफर्ड), श्री. पठाण नजीरखान (लार्ज ब्रिड), श्री. विनोद निळकंठराव पावडे (रोटवेलर / लॅब), श्री. अजित आत्माराम बरुळे (पशमी), श्री. सचिन सुभाष भोकले (पंजाब ग्रे), श्री. धनंजय बालाजी सुमुक्षे (कारवान), श्री. तुळशीदास मारोती वाघमारे (डाबर मॅन)

प्रतिजैविकांना प्रतिकार : एक जागतिक आव्हान

डॉ. स्मिता जिंतूरकर
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, गुणनियंत्रण प्रयोगशाळा, आरे, गोरेगाव, मुंबई -६५

प्रतिजैविकांचा (Antibiotics/Antimicrobials) शोध मानवासाठी एक वरदान ठरला होता. यामुळे अनेक गंभीर रोगांवर रामबाण उपाय करणे शक्य झाले व जंतूसंसर्ग (Infections) सहजपणे आटोक्यात येऊ लागला. मानवाप्रमाणेच प्राणीजगतालाही याचा मोठा फायदा झाला, ज्यामुळे शेतीपूरक उद्योगांच्या अर्थकारणात क्रांती झाली व सरासरी आयुर्मान वाढले. परंतु, या नाण्याची दुसरी बाजू अशी की, प्रतिजैविकांचा अतिरेकी व अनावश्यक वापर सुरू झाला. संसर्ग आटोक्यात येत नाही म्हणून 'हायर अँटीबायोटिक्स'चा वापर वाढला. शेवटी 'अति तिथे माती' या उक्तीप्रमाणे आता प्रतिजैविकांना जीवाणू दाद देत नाहीत, ज्यालाच **Antimicrobial Resistance (AMR)** असे संबोधले जाते.

साधारण शंभर वर्षांपूर्वी सर अलेक्झांडर फ्लेमिंग यांनी 'पेनिसिलिन'चा शोध लावला, तेव्हाच त्यांनी हा धोका ओळखून 'AMR'बद्दल भाकीत केले होते. नैसर्गिकरित्या कोणताही जीवाणू प्रतिजैविकांचा प्रतिकार करतोच, परंतु मानवी हस्तक्षेप व अतिवापरामुळे ही प्रक्रिया आता अधिक जलद झाली आहे. आज साधे आजारही उच्च दर्जाची प्रतिजैविके देऊन बरे होत नाहीत. सूक्ष्मजीव (बॅक्टेरिया, व्हायरस, फंगस, पॅरासाईट इ.) स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी स्वतःमध्ये बदल घडवून आणतात व प्रतिजैविकांना जुमानत नाहीत.

पशुसंवर्धन व मानवी साखळी

जगात वापरल्या जाणाऱ्या एकूण प्रतिजैविकांपैकी सुमारे ७३% औषधे ही मांस, दूध व अंडी उत्पादन करणाऱ्या जनावरांसाठी वापरली जातात. या औषधांचे अंश व त्यातील प्रतिरोधक जीवाणू (Resistant Bacteria) अन्नाद्वारे मानवी शरीरात प्रवेश करतात. तसेच, जनावरे व मानवाच्या विष्ठेद्वारे हे घटक पर्यावरणात मिसळतात.

'ICAR' (Indian Council of Agricultural Research) ने केलेल्या सर्वेक्षणानुसार, गायी-म्हशींमध्ये सर्रास वापरल्या जाणाऱ्या प्रतिजैविकांना ५० ते ७०% पर्यंत प्रतिकार (Resistance) निर्माण झाल्याचे आढळले आहे. ही आकडेवारी केवळ हिमनगाचे टोक आहे.

भविष्यातील धोका

नीती आयोगाचे सदस्य डॉ. विनोद पॉल यांच्या मते, २०५० पर्यंत सर्वाधिक मृत्यू हे 'AMR' मुळे होतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही 'मन की बात' मध्ये निमोनिया व 'UTI' सारख्या आजारांवर औषधे लागू पडत नसल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. जागतिक आरोग्य संघटनेनेही (WHO) याला मानवी आरोग्यापुढील सर्वात मोठे आव्हान मानले आहे.



'One Health' संकल्पना व उपाययोजना

मानव, पशू-पक्षी व वनस्पती हे सर्व पर्यावरणाचे अविभाज्य घटक असून ते एकमेकांवर अवलंबून आहेत. या सृष्टीतील सर्व घटक एकमेकांना जसे पूरक आहेत, तसेच ते एकमेकांसाठी मारकही ठरू शकतात. कोणाचेही अस्तित्व स्वतंत्र नाही; म्हणूनच मानवी आरोग्याचा थेट संबंध पशू-पक्ष्यांचे आरोग्य व पर्यावरणीय बदलांशी असतो. 'सुपरबग्स'च्या संकटाचा एकत्रित सामना करण्यासाठी आरोग्य, पशुसंवर्धन, कृषी व पर्यावरण या सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचा निर्धार केला आहे.

मनुष्य, पशू-पक्षी व पर्यावरण हे सर्व घटक अन्नसाखळीतील महत्त्वाचे दुवे आहेत. जनावरांना दिली जाणारी प्रतिजैविके (अँटीबायोटिक्स) मांस, दूध किंवा अंड्यांद्वारे मानवी शरीरात प्रवेश करतात व त्यानंतर ती पर्यावरणात मिसळतात. पर्यावरणास हानिकारक असणाऱ्या गोष्टी सर्वच जीवांना इजा पोहचवतात. याच पार्श्वभूमीवर २०२५ ते २०२९ या कालावधीसाठीचा 'National Action Plan for AMR' हा **'One Health Approach'** (एकच आरोग्य दृष्टीकोन) या संकल्पनेवर आधारित आहे. केंद्र सरकारच्या आरोग्य विभागाने नोव्हेंबर २०२५ मध्ये 'National Action Plan on Antimicrobial Resistance § Version २ (NAP-AMR)' प्रसिद्ध केला आहे. आरोग्य, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय व कृषी विभाग आता **'National One Health Mission'** या एकाच छत्राखाली एकत्र येऊन काम करण्यास कटिबद्ध आहेत.

AMR चा दुष्परिणाम कमी करण्यासाठी मुळात जंतूसंसर्ग होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. यासाठी परिसर स्वच्छता, गोठा किंवा फार्मची स्वच्छता व जैव-सुरक्षा (बायो-सिक्युरिटी) नियमांचे पालन करणे गरजेचे आहे. तसेच, वेळापत्रकानुसार नियमित लसीकरण व सकस आहार यांसारख्या उपाययोजना केल्यास निश्चितच फायदा होतो.

AMR वरील उपायांचा एक भाग म्हणून, आयुष मंत्रालय व NDDB (National Dairy Development Board) यांच्यामार्फत 'Ethnoveterinary Medicine' (EVM) म्हणजेच पारंपारिक वनौषधी व आयुर्वेदिक उपचार पद्धतींचा वापर व त्यातील नाविन्यपूर्ण संशोधनाला 'National Action Plan' नुसार प्रस्तावित करण्यात आले आहे.

भारतात वैदिक काळापासूनच आयुर्वेदिक वनौषधींच्या वापराची परंपरा प्रचलित असल्याचे दाखले मिळतात. देशातील विविध प्रांतांमध्ये आढळणाऱ्या स्थानिक वनौषधींचा वापर करण्याची एक समृद्ध मौखिक परंपरा आपल्याकडे आहे. आता या उपचारांना आधुनिक संशोधनाद्वारे प्रमाणित (Validate) करणे व त्यांचे पद्धतशीर दस्तऐवजीकरण (Documentation) करण्याची गरज आहे.

या विषयात NDDB ने 'Ethnoveterinary Medicine' हे पुस्तक प्रसिद्ध केले असून, त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर (Website) प्रादेशिक भाषांमधील 'EVM गाईड' देखील उपलब्ध आहे. यामध्ये अनेक रोगांवर अत्यंत साधे व घरगुती उपाय सुचवण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, या उपचारांसाठी लागणारे घटक (जिन्नस) आपल्या स्वयंपाकघरातच सहज उपलब्ध होतात.

NDDB ने या विषयावर अनेक संशोधनपर लेखही प्रसिद्ध केले आहेत. या प्रयत्नांमुळे 'Antimicrobial drugs' किंवा प्रतिजैविकांचा (Antibiotics) अनावश्यक वापर बऱ्याच प्रमाणात टाळता येणे शक्य होणार आहे. हे उपचार अत्यंत कमी खर्चिक असून पशुपालकांना ते घरच्या घरी करणे सहज शक्य आहे.

पशुपालकांसाठी मार्गदर्शिका: AMR व EVM उपाय

१. जंतूसंसर्ग टाळण्यासाठी खबरदारी

- **स्वच्छता:** गोठा व परिसर नेहमी स्वच्छ व कोरडा ठेवा.
- **जैव-सुरक्षा:** बाहेरील व्यक्ती किंवा प्राण्यांचा गोठ्यातील संपर्क मर्यादित ठेवा.
- **लसीकरण:** वेळापत्रकानुसार नियमित लसीकरण करा.
- **सकस आहार:** सकस व संतुलित आहार द्यावा.

२. पारंपारिक वनौषधी उपचार

- **स्वयंपाकघरातील घटक:** हळद, कोरफड, लसूण व जिरे यांसारख्या घटकांचा वापर करून प्राथमिक उपचार करा.
- **कमी खर्चिक:** हे उपचार घरच्या घरी तयार करता येतात.
- **कमी दुष्परिणाम:** नैसर्गिक घटकांमुळे जनावरांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत नाहीत.

३. प्रतिजैविकांचा वापर करताना घ्यायची काळजी:

- डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय प्रतिजैविके देऊ नका.
- औषधांचा कोर्स अर्धवट सोडू नका, तो पूर्ण करा.
- प्रतिजैविकांचा अंश दूध किंवा मांसातून मानवी शरीरात जाऊ नये म्हणून योग्य 'विथड्रॉवल पिरियड' पाळा.

अधिक माहितीसाठी: NDDB च्या संकेतस्थळावरील) प्रादेशिक भाषेतील EVM गाईडचा वापर करा.

निपाह विषाणूचा वाढता धोका
एक उदयोन्मुख जैविक संकट

निपाह विषाणू हा हेनिपाव्हायरस या वंशातील विषाणू असुन १९९९ मध्ये प्रथम निदर्शनास आला. निपाह विषाणूचे वेगवेगळे उपप्रकार असुन ते मलेशिया, बांगलादेश व भारतात आढळले आहेत. निपाह विषाणूमुळे मानवांमध्ये गंभीर, वेगाने वाढणारा मेंदूज्वर व वराहांमध्ये गंभीर श्वसन आजार होतात. काही वराहांमध्ये मज्जासंस्थेशी संबंधित लक्षणे दिसून येतात. निपाह विषाणूच्या संसर्गाचा मानवांमध्ये मृत्युदर जास्त दिसुन आला असून संक्रमित वराहांशी संपर्क आल्यास माणसामध्ये ह्या विषाणूचा प्रसार होतो. निपाह विषाणू अनुकूल वातावरणात, वटवाघळांच्या मूत्रात व दूषित फळांच्या रसात दीर्घकाळ जिवंत राहतो. ज्या गावात (सुंगाई निपाह) पहिला रुग्ण नोंदवला गेला त्या गावाच्या नावावरून या विषाणूला “निपाह”विषाणू नाव देण्यात आले.

डॉ. पुनम प्रेमराज उरकुडे,
सूक्ष्मजीवशास्त्र एम.व्ही.एससी
(पशुवैद्यकीय अधिकारी: १९६२
कॉल सेंटर, पशुसंवर्धन
आयुक्तालय, औंध, पुणे- ४११०६७)

निपाह विषाणुचा इतिहास:

सप्टेंबर १९९८ ते एप्रिल १९९९ या दरम्यान मलेशियामध्ये तीव्र तापासह व मेंदूज्वराचे अनेक मानवी रुग्ण आढळून आले. सुरवातीला जापनीज एन्सेफालायटिस असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. मात्र, पुढील तपासणीत असे आढळले की हा एक नवीन प्रकारचा विषाणू असून, तो Hendra विषाणूशी संबंधित आहे. (Hendra विषाणू हा एक गंभीर श्वसन व एन्सेफलायटीक रोग निर्माण करणारा विषाणू आहे जो मानवांनमध्ये व घोड्यांमध्ये आढळतो).



रोगवाहक:

निपाह विषाणूचे मुख्य वाहक फळ खाणारे, उडणारे प्टेरोपस वंशाची वटवाघळे आहेत. वटवाघळांमधून वराहांमध्ये थेट संक्रमण झाल्याचे ठोस पुरावे नाहीत; परंतु दूषित फळे, वटवाघळांची लघवी किंवा मृत वटवाघळांशी संपर्क अशा जैविकदृष्ट्या शक्य मार्गांनी हा विषाणू वराहांपर्यंत पोहोचू शकतो. वटवाघळे स्वतः आजारी न पडता विषाणू वाहून नेण्यास सक्षम असतात. या विषाणूच्या संभाव्य दुय्यम वाहक असल्याबाद्दल तपासणीही करण्यात आली आहे. त्यात उंदीर, घरातील कुत्रे व कोंबडीची चाचणी घेण्यात आली. परंतु, दुय्यम वाहक असल्याचे कोणतेही निष्कर्ष सापडलेले नाहीत.

संक्रमण:

मलेशियामध्ये वटवाघळांमधून वराहमध्ये निपाह विषाणूचे संक्रमण कसे झाले हे पूर्णपणे स्पष्ट झाले नाही. वराहांच्या बंदिवासाच्या जवळ असलेल्या फळझाडावर वटवाघळे येऊन फळे खात असल्याने वटवाघळांच्या लाळ किंवा लघवीने दूषित झालेली फळे वराहांनी खाल्ल्यामुळे संसर्ग झाला असावा, असा निष्कर्ष आहे .

माणसांमध्ये (९३%) रुग्ण हे वराहांशी थेट संपर्क किंवा त्यांच्या शरीरस्राव (लघवी, विष्ठा, इ.) च्या संपर्कात आल्याने संक्रमित झाले. निपाह विषाणूचा मानव शरीरात प्रवेश मुख्यतः श्वसनाद्वारे निर्माण होणाऱ्या थेंबांद्वारे, हवेत तरंगणाऱ्या सूक्ष्म कणांद्वारे तसेच तोंडावाटे अन्न अथवा द्रव पदार्थांच्या सेवनामुळे होतो. याव्यतिरिक्त, जखम किंवा तुटलेल्या भागांशी तसेच श्लेष्मल पटलांशी थेट संपर्क झाल्यासही संसर्गाचा प्रसार होऊ शकतो. शरीरात प्रवेश केल्यानंतर विषाणूचे कण प्रामुख्याने श्वसनमार्गातील अस्तरावरुन संसर्गाची प्रक्रिया सुरू करतात. हे विषाणू गर्भातूनही पसरू शकतात. वापरलेल्या सुईमुळे व वीर्याद्वारेही संसर्ग होण्याची शक्यता वर्तवली आहे.

रोगाचा प्रसार:

निपाह विषाणूच्या सन १९९८, १९९९ मधील मलेशियामधील उद्रेकात २६५ मानवी रुग्णांना रुग्णालयात दाखल करावे लागले, त्यापैकी १०५ मृत्यू पावले (मृत्यूदर सुमारे ४०%). यापैकी ९३% रुग्ण हे वराहांच्या थेट संपर्कात होते. निपाह विषाणूचा संसर्ग थांबवण्यासाठी ११ लक्ष वराहांना दया मरण द्यावे लागले. यामुळे सुमारे त्या देशाचे ९७ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स (म्हणजेच सुमारे ९७० कोटी रुपये) नुकसान झाले व त्या देशातून वराहांचे मांस निर्यातही बंद झाली.

मार्च १९९९ मध्ये सिंगापूरमध्येही असाच उद्रेक झाला. मलेशियातून कत्तलीसाठी आयात केलेल्या वराहांच्या संपर्कात आलेल्या कत्तलखान्यातील कामगारांना हा आजार झाला.

चाचणी केलेल्या १,४६९ व्यक्तींपैकी २२ जणांना निपाह विषाणूची लागण झाल्याचे आढळून आले.

सन २००१ मध्ये भारतातील सिलीगुडी येथे झालेल्या प्रादुर्भावाचा संबंध रुग्णालयांमध्ये रुग्णालयीन संक्रमणाशी होता. प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविल्यानंतर हा प्रादुर्भाव आटोक्यात आला भारतामध्ये निपाह विषाणूचे काही विखुरलेले (sporadic) उद्रेक नोंदविण्यात आले असून, त्यामध्ये मृत्युदर अत्यंत जास्त आढळून आला आहे. सन २००१ व २००७ मध्ये पश्चिम बंगाल राज्यात निपाह विषाणूचे दोन उद्रेक झाले.

त्यानंतर केरळ राज्यात सन २०१८, २०१९ व २०२१ मध्ये निपाह विषाणू संसर्गाचे प्रकरणे नोंदविण्यात आली आहेत. भारतामध्ये वटवाघुळांच्या शरीरीय द्रवांमुळे व उत्सर्जनांमुळे (लाळ, मूत्र, विष्ठा) दूषित झालेल्या कच्च्या खजुराच्या रसाचे (Raw Date Palm Sap) सेवन व जंगलतोडीमुळे प्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासांचा नाश यामुळे मानव व प्राणी यांच्यातील संपर्क वाढून निपाह विषाणू संसर्गाचा धोका अधिक वाढलेला आहे.

मानवांमध्ये आजार:

निपाह विषाणूची लक्षणे लागण झाल्यानंतर साधारणत ४ ते २० दिवसांत दिसू लागतात. सुरुवातीला ताप, डोकेदुखी, अंग दुखणे, थकवा अशी सामान्य लक्षणे दिसतात. चक्कर येणे, तंद्री लागणे, दिशाभूल,उलटी अशी लक्षणे दिसतात. गंभीर प्रकरणांमध्ये मेंदूज्वर (एन्सेफलायटीस), झटके येणे व २४-४८ तासांत कोमामध्ये जाण्याची शक्य असते.

काही लोकांमध्ये सुरुवातीच्या संसर्गादरम्यान लक्षणे दिसून येत नसली तरी काही वर्षांनंतर मज्जासंस्थेशी (न्यूरोलॉजिकल) संबंधित गंभीर आजार निर्माण करतात. रुग्णांमध्ये श्वसनाचे आजार दिसून येतात. कांही रुग्ण बरे होतात परंतु .कधी कधी, बऱ्याच वर्षांनीही निपाहचे लक्षणे परत दिसू शकतात. भारत व बांगलादेशातील अनेक रुग्णांमध्ये मृत्यूदर ६०% पेक्षा जास्त आढळला आहे.

प्राण्यांमध्ये होणारे आजार:

वराहांमध्ये निपाह विषाणू हा अत्यंत संसर्गजन्य असतो व तो एका फार्मधून दुसऱ्या फार्म मध्ये वराहांच्या वाहतुकीद्वारे सहजपणे पसरतो. अनेक वराहांमध्ये कोणतीही लक्षणे नसतात, परंतु बाधित वराहांना तीव्र ताप (१०४ अंश फॅरनहाइट पेक्षा जास्त) व जलद, कष्टप्रद, उघड्या तोंडाने श्वास घेण्यास त्रास होतो. त्यांना असामान्य तीव्र खोकला होतो. वराह घाबरलेले, अर्धवट हालचाली करताना दिसतात.

लहान वराहांमध्ये तापासोबत श्वसनाची लक्षणे व नाकातून रक्तमिश्रित स्राव येणे दिसू शकतो. प्रौढ वराहांमध्ये झपाट्याने मृत्यू होतो,फुफ्फुसाशी संबंधित धाप लागणे , लाळ वाढणे असे लक्षणे दिसतात. प्रौढ वराहांमध्ये न्यूरोलॉजिकल लक्षणे लहान प्राण्यांपेक्षा जास्त आढळतात व त्यात हालचाल, धनुर्वात सारखे झटके व घशाच्या स्नायूंचा पक्षाघात यांचा समावेश असू शकतो. गर्भार वराहांमध्ये गर्भपात होण्याची शक्यता असते.

प्टेरोपस (Pteropus) वंशाचे वटवाघुळ

निपाह विषाणू बाधेनंतर मानवातील लक्षणे

इतर प्राण्यांच्या प्रजातींमध्ये रोगाचे प्रमाण कमी आहे; तथापि, वटवाघुळ, कुत्रे, घोडे व मांजरींमध्ये निपाह विषाणू संसर्गाचे सेरोलॉजिकल पुरावे नोंदवले गेले आहेत. संक्रमित कुत्र्यांसाठी नोंदवलेल्या क्लिनिकल लक्षणांमध्ये कुत्र्यांमध्ये ताप,श्वसनाचा त्रास ,नाक व नेत्रश्लेष्मला स्राव यासारखी डिस्टेंपर मध्ये दिसणारी लक्षणे समाविष्ट आहेत.

नमुने संकलन :

संशयित प्राण्यांचे कोणतेही नमुने गोळा करण्यापूर्वी किंवा पाठवण्यापूर्वी, योग्य प्रशिक्षित पशुवैद्कीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. रोगाचा प्रसार रोखण्यासाठी नमुने केवळ सुरक्षित परिस्थितीत व अधिकृत प्रयोगशाळांमध्ये पाठवावेत.मेंदू, फुफ्फुस, मूत्रपिंड व प्लीहा (SPLEEN) ४८ तासांत ४ °C वर वाहून नेणे किंवा त्यापेक्षा अधिक वेळ लागल्यास गोठवून ठेवावेत.

निपाह विषाणूसाठी प्रयोगशाळेतील निदान पद्धतींमध्ये सेरोलॉजी (ELISA), हिस्टोपॅथॉलॉजी, इम्युनोहिस्टोकेमिस्ट्री, इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोपी, पॉलिमरेज चेन रिएक्शन (PCR) व व्हायरस आयसोलेशन यांचा समावेश आहे.

भेदात्मक निदान :

वराहांमध्ये निपाह विषाणूप्रमाणे लक्षणे अनेक आजारांमध्ये दिसून येतात. जसे की, क्लासिकल स्वाइन फिव्हर (CSF), पीआरआरएस (डुकरांचे पुनरुत्पादक व श्वसन सिंड्रोम), औजेस्की रोग (स्यूडोराबीज), स्वाइन एन्झुटिक न्यूमोनिया (मायकोप्लाइमा हायपोन्यूमोनिया), व पोर्सिन प्ल्युरोप्यूमोनिया (ॲक्टिनोबॅसिलस प्ल्युरोप्यूमोनिया). यामुळे प्रयोगशाळेमध्ये रोगनिदान करणे आवश्यक आहे.

प्रतिबंध व नियंत्रण

- वटवाघळे व त्यांच्या स्रावांशी संपर्क टाळण्याच्या उद्देशाने वराहपालन केंद्रांमध्ये कठोर जैवसुरक्षा उपायांची अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे.
- रोगाचा प्रसार व मानवांमध्ये संसर्ग होण्यास प्रतिबंध करण्यासाठी, सक्रिय संनिरिक्षण (Active Surveillance) कार्यक्रम राबविणे अत्यंत महत्त्वाचे आहे .
- सिरोपॉझिटिव्ह वराहांची त्वरित ओळख करून त्यांची तत्काळ वैज्ञानिक पद्धतीने दयामरण देणे आवश्यक आहे.
- उद्रेकाच्या सुरुवातीच्या टप्प्यात प्रभावी क्वारंटाईन उपाययोजना व प्राण्यांच्या हालचालींवर कडक नियंत्रण लागू करणे आवश्यक आहे.
- बाधित फार्मवरील सर्व साहित्य व उपकरणे वाहतुकीपूर्वी पूर्णपणे स्वच्छ करून निर्जंतुकीकरण करणे बंधनकारक आहे.
- वन्य किंवा पाळीव प्राण्यांचा डुक्करांशी कोणताही संपर्क होऊ नये यासाठी सर्व प्रवेश मार्गांवर नियंत्रण लागू करणे आवश्यक आहे.



'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५'

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने ३ ऑक्टोबर २०२५ रोजी 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५' च्या अंतर्गत एक महत्त्वाची अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. या अधिसूचनेद्वारे, पशुसंवर्धन आयुक्तालय व त्यांच्या दुय्यम कार्यालयांमार्फत दिल्या जाणाऱ्या विविध सार्वजनिक सेवांसाठी नवीन कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. सेवा, त्यांची माहिती व अर्ज भरण्यासाठी नागरिक 'आपले सरकार'वेब पोर्टल वापरू शकतात. त्यासाठी महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या https://aaplesarkar.mahaonline.gov.in या वेबसाईटचा वापर करावा.

अ. क्र.	सेवेचे नाव	कालमर्यादा (कार्यालयीन दिवस)	पदनिर्देशित अधिकारी	प्रथम अपिलीय प्राधिकरण	द्वितीय अपिलीय प्राधिकरण
१	कुक्कुट क्षेत्राची कम्पार्टमेंट चाचणी	३० कामाचे दिवस	सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (कुक्कुट), रोग अन्वेषण विभाग, पुणे.	उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (कुक्कुट), रोग अन्वेषण विभाग, पुणे.	सहआयुक्त पशुसंवर्धन, रोग अन्वेषण विभाग, पुणे.
२	कुक्कुट क्षेत्रावरून SPF अंडी निर्यातीकरिता प्रमाणपत्र देणे	१५ कामाचे दिवस	सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (कुक्कुट), रोग अन्वेषण विभाग, पुणे.	उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (कुक्कुट), रोग अन्वेषण विभाग, पुणे.	सहआयुक्त पशुसंवर्धन, रोग अन्वेषण विभाग, पुणे.
३	पशुखाद्यातील पोषक घटकांचे स्थूल विश्लेषण १ ते ६ Parameter (Proximate analysis)	१५ कामाचे दिवस	पशुधन विकास अधिकारी, पशुखाद्य विश्लेषण प्रयोगशाळा, पुणे	सह संचालक (पशु आहार), पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे	अतिरिक्त आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालय, पुणे.
४	पशुखाद्यातील स्थूल घटक (१ ते ६) Parameter सहित कॅल्शिअम, स्फुरद व मिठ (सोडिअम) १ ते ९ Parameter	२१ कामाचे दिवस	पशुधन विकास अधिकारी, पशुखाद्य विश्लेषण प्रयोगशाळा, पुणे	सह संचालक (पशु आहार), पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे	अतिरिक्त आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालय, पुणे.
५	पशुखाद्यातील सूक्ष्मपोषक द्रव्ये व जड धातू (micronutrients, and heavy metals)	२५ कामाचे दिवस	पशुधन विकास अधिकारी, पशुखाद्य विश्लेषण प्रयोगशाळा, पुणे	सह संचालक (पशु आहार), पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे	अतिरिक्त आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालय, पुणे.

'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५'

६	पशुखाद्यातील तंतू (Crude Fibers NDF, ADF and ADL)	१२ कामाचे दिवस	पशुधन विकास अधिकारी, पशुखाद्य विश्लेषण प्रयोगशाळा, पुणे	सह संचालक (पशु आहार), पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे	अतिरिक्त आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालय, पुणे.
७	पशुखाद्यातील युरिया	०७ कामाचे दिवस	पशुधन विकास अधिकारी, पशुखाद्य विश्लेषण प्रयोगशाळा, पुणे	सह संचालक (पशु आहार), पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे	अतिरिक्त आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालय, पुणे.
८	पशुखाद्यातील ऊर्जा	०३ कामाचे दिवस	पशुधन विकास अधिकारी, पशुखाद्य विश्लेषण प्रयोगशाळा, पुणे	सह संचालक (पशु आहार), पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे	अतिरिक्त आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालय, पुणे.
९	भारतीय पशुवैद्यक परिषद कायदा, १९८४ अन्वये नविन पशुवैद्यकीय पदवीधरांची नोंदणी करणे	०८ कामाचे दिवस	वरिष्ठ सहाय्यक, महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद, नागपूर	पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद, नागपूर	निबंधक, महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद, नागपूर
१०	भारतीय पशुवैद्यक परिषद कायदा, १९८४ अन्वये नोंदणीकृत पशुवैद्यकांच्या पाच वर्षा नंतर नोंदणीचे नूतनीकरण करणे	०८ कामाचे दिवस	वरिष्ठ सहाय्यक, महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद, नागपूर	पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद, नागपूर	निबंधक, महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद, नागपूर
११	भारतीय पशुवैद्यक परिषद कायदा, १९८४ अन्वये आंतरवासिता विद्यार्थी यांची तात्पुरती नोंदणी करणे	०८ कामाचे दिवस	वरिष्ठ सहाय्यक, महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद, नागपूर	पशुधन विकास अधिकारी, महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद, नागपूर	निबंधक, महाराष्ट्र राज्य पशुवैद्यक परिषद, नागपूर

'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५'

१२	पाळीव प्राणी दुकाने नोंदणी (Pet shop):- १. तात्पुरते प्रमाणपत्र validity- ३ महिने २. अंतिम प्रमाणपत्र validity - ५ वर्षे	१. तात्पुरते प्रमाणपत्र ७ कामाचे दिवस २. अंतिम प्रमाणपत्र, संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचे तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर कालावधी ३ महिने	सदस्य सचिव, महाराष्ट्र प्राणी, कल्याण मंडळ, पुणे	अतिरिक्त आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालय, पुणे.	आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), पुणे.
१३	श्वान प्रजनन व विपणन केंद्र (Dog breeder): प्रमाणपत्र validity – २ वर्षे	अंतिम प्रमाणपत्र, संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचे तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर कालावधी ३ महिने	सदस्य सचिव, महाराष्ट्र प्राणी, कल्याण मंडळ, पुणे.	अतिरिक्त आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालय, पुणे.	आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), पुणे.
१४	चारा पीकांची ठोंबे पुरवठा	ठोंबे उपलब्धतेनुसार ३ कामाचे दिवस	१. पशुआहार अधिकारी, शासकीय पशुपैदास क्षेत्र, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर २. क्षेत्र व्यवस्थापक, पुअम शेळी व मेंढी विकास महामंडळ, पुणे.	१. सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), शासकीय पशुपैदास क्षेत्र, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर २. महाव्यवस्थापक, पुअम शेळी व मेंढी विकास महामंडळ, पुणे.	१. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर २. व्यवस्थापकीय संचालक, पुअम शेळी व मेंढी विकास महामंडळ, पुणे.
१५	पशुखाद्य व कुक्कुट खाद्यातील बुरशी तपासणी	नमुने प्राप्त झाल्यापासून १५ कामाचे दिवस	पशुधन विकास अधिकारी (गोमयज), रोग अन्वेषण विभाग, पुणे.	उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, (जिवाणूशास्त्र व गोमयज), रोग अन्वेषण विभाग, पुणे.	सहआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), रोग अन्वेषण विभाग, पुणे.
१६	निर्यातीकरिता जनावरांना देण्यात येणारे आरोग्य दाखले	३ कामाचे दिवस	सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), संबंधित सहआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) कार्यालय	संबंधित सहआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय)	अतिरिक्त आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालय, पुणे.

'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५'

१७	निर्यातीकरिता मांस व मांस उत्पादने तपासणी दाखले	८ कामाचे दिवस	सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), गुणनियंत्रण प्रयोगशाळा, मुंबई	उपआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), गुणनियंत्रण प्रयोगशाळा, मुंबई	सहआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), मुंबई
१८	निर्यातीकरिता मांस व मांस उत्पादने यांची रासायनिक तपासणी	१५ कामाचे दिवस	सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), गुणनियंत्रण प्रयोगशाळा, मुंबई	उपआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), गुणनियंत्रण प्रयोगशाळा, मुंबई	सहआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), मुंबई
१९	रेत केंद्राची नोंदणी	९० कामाचे दिवस	सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण, पुणे.	उपआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण, पुणे.	आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) तथा अध्यक्ष, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण, पुणे.
२०	भ्रूण प्रत्यारोपण किंवा प्रयोगनलिका फलन प्रयोगशाळेची नोंदणी	९० कामाचे दिवस	सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण, पुणे.	उपआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण, पुणे.	आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) तथा अध्यक्ष, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण, पुणे.
२१	कृत्रिम रेत प्रशिक्षण संस्थेची नोंदणी	९० कामाचे दिवस	सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण, पुणे.	उपआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण, पुणे.	आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) तथा अध्यक्ष, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण, पुणे.
२२	सहयोगी जनन तंत्रज्ञान सेवा पुरवठाकाराची नोंदणी	९० कामाचे दिवस	सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण, पुणे.	उपआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण, पुणे.	आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) तथा अध्यक्ष, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण, पुणे.

'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५'

२३	सहयोगी जननतंत्रज्ञान तज्ञ (एआरटी) नोंदणी	३० कामाचे दिवस	सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण, पुणे.	उपआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण, पुणे.	आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) तथा अध्यक्ष, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण, पुणे.
२४	रेत बँकेची नोंदणी	९० कामाचे दिवस	सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), संबंधित उपआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) कार्यालय	संबंधित उपआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय)	संबंधित सहआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय)
२५	कृत्रिम रेतन सेवा पुरवठाकाराची नोंदणी	९० कामाचे दिवस	सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), संबंधित उपआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) कार्यालय	संबंधित उपआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय)	संबंधित सहआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय)
२६	कृत्रिम रेतन तंत्रज्ञ नोंदणी	३० कामाचे दिवस	सहाय्यक आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), संबंधित उपआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) कार्यालय	संबंधित उपआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय)	संबंधित सहआयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पशुसंवर्धन विभाग

आपले सरकार

०२०-२५६९०४८४

टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-०४१८

राज्यस्तरीय कॉल सेंटर संपर्क क्र : १९६२

द्विभाषिक शब्दकोश – ब्रुडिंग व पोल्ट्री व्यवस्थापन

"पशुपालन व्यवसायात प्रगती करण्यासाठी त्यातील तांत्रिक संज्ञा व सुधारित संकल्पना समजून घेणे ही काळाची गरज आहे. 'पशुसंवर्धन शब्दसंग्रह' या सदराच्या माध्यमातून आपण पशुपालनातील कठीण शब्द सोप्या भाषेत उलगडून सांगणार आहोत. योग्य माहिती व अचूक शब्दसंग्रह पशुपालकांना अधिक सक्षम व जागरूक बनवण्यास मदत करेल. त्यायोगे पशुसंवर्धनाच्या व्यवसायाला समजून घेणेही सोयीस्कर ठरणार आहे. चला तर मग, आपल्या पशुधनाच्या समृद्धीसाठी या ज्ञानरुपी प्रवासात सहभागी होऊया."

क्र.	Term (English)	अर्थ / व्याख्या (Marathi)
१	Brooding	नवजात पिलांचे जन्मानंतर २-३ आठवडेपर्यंत तापमान राखणे व संगोपन करण्याची प्रक्रिया.
२	Natural Brooding	देशी कोंबडीने आपल्या पिलांना ऊब व संरक्षण देणे (३-४ आठवड्यांपर्यंत) ही नैसर्गिक ब्रुडिंग पद्धत.
३	Artificial Brooding	वीज, गॅस किंवा इतर उपकरणांच्या साहाय्याने पिलांना ऊब देण्याची व सांभाळ करण्याची पद्धत (व्यावसायिक पोल्ट्रीत वापरली जाते).
४	Thermoregulatory System	शरीराचे तापमान स्थिर ठेवणारी प्रणाली; पिलांमध्ये ही अपुरी विकसित असते.
५	Chick Guard	३० से.मी. उंच प्लास्टिक/कार्डबोर्डचा गोल घेर जो पिल्लांना ब्रुडरजवळ ठेवण्यासाठी व थंडीपासून संरक्षणासाठी वापरला जातो.
६	Brooder	पिल्लांना ऊब देणारे उपकरण; उदा. इलेक्ट्रिक, गॅस, इंधन किंवा केंद्रीकृत प्रणाली.
७	Hover / Electric Brooder	२५० वॅटच्या बल्बवर चालणारे ऊब देणारे उपकरण, जे पिल्लांच्या वर छताला लटकवले जाते.
८	Gas Brooder	एलपीजीवर चालणारे उपकरण जे एकसमान व नैसर्गिक ऊब निर्माण करते.
९	Fuel Heater	वीज नसल्यास पेंड, करवंट्या किंवा केरोसीनवर चालणारा हीटर.
१०	Centralized Heating System	संपूर्ण शेडमध्ये एकसमान तापमान ठेवणारी हीटिंग प्रणाली.
११	Deep Litter Brooding	जमिनीवर गादीसारखे बेडिंग (लिटर) घालून त्यावर पिलांचे संगोपन करण्याची पद्धत.
१२	Cage Brooding	अंडी देणाऱ्या जातींच्या पिलांसाठी पिंजऱ्यातील संगोपन पद्धत.
१३	Spot Brooding	केवळ मर्यादित जागेत ऊब निर्माण करून पिल्लांना ठेवण्याची सर्वाधिक आर्थिक पद्धत.
१४	Partial House Brooding	शेडचा केवळ काही भाग तापवून ऊर्जेची बचत करणारी पद्धत.

१५	Whole House Brooding	संपूर्ण पोल्ट्री शेड समान तापमानाने उबवण्याची पद्धत (मध्यम हवामानात उपयुक्त).
१६	Thermometer	ब्रुडिंग दरम्यान तापमान मोजण्यासाठी पिल्लांच्या पातळीवर ठेवलेले उपकरण.
१७	Drinker / Feeder	पिल्लांना पाणी व खाद्य देण्यासाठी वापरले जाणारे उपकरण, ज्याचे उंचीनुसार समायोजन केले जाते.
१८	Bedding / Litter	तांदळाची टरफले, करवंट्या इ. पसरवून ऊब व स्वच्छता राखण्यासाठी वापरली जाते.
१९	Fumigation	फॉर्मालिन व पोटॅशियम परमेगनेट यांच्या अभिक्रियेद्वारे तयार होणाऱ्या वायूमुळे शेड निर्जंतुक करण्याची प्रक्रिया.
२०	Formalin	निर्जंतुकीकरणासाठी वापरले जाणारे द्रावण (फॉर्मलडिहाइडचे मिश्रण).
२१	Potassium Permanganate	फॉर्मालिनबरोबर अभिक्रिया करून फॉर्मलडिहाइड वायू निर्माण करणारे रसायन.
२२	Ammonium Hydroxide	फ्युमिगेशननंतर फॉर्मलडिहाइडचा प्रभाव थांबवण्यासाठी वापरले जाणारे द्रावण.
२३	Foot Dip	शेडच्या प्रवेशद्वारालगतचा निर्जंतुक द्रावण पाटा, ज्यातून प्रवेशकर्त्यांचे पाय निर्जंतुक होतात.
२४	Flame Gun	जमिनीवरील सूक्ष्मजीव जाळण्यासाठी वापरले जाणारे आगकुंड उपकरण.
२५	Whitewashing	चुना, फॉर्मालिन व कॉपर सल्फेटच्या मिश्रणाने भिंती व मजले स्वच्छ करण्याची पद्धत.
२६	Brooding Temperature	पिल्लांना लागणारे प्रारंभीचे तापमान (३५°C / ९५°F) जे दर आठवड्याला ३°C ने कमी केले जाते.
२७	Relative Humidity	हवेत असलेला ओलाव्याचा टक्का; पिल्लांसाठी ६०-७०% आर्द्रता योग्य मानली जाते.
२८	Ventilation	शेडमध्ये ताज्या हवेची देवाणघेवाण करून हानिकारक वायू (अमोनिया, CO_2) बाहेर काढणे.
२९	Floor Space Requirement	पिल्लांच्या वय व हंगामानुसार दिली जाणारी जागा (०.२५-०.५ चौ.फूट प्रति पिल्लू).
३०	Feeder / Drinker Height	फीडरचा कडा पिल्लाच्या पाठीच्या उंचीवर ठेवणे जेणेकरून पाणी-खाद्य सहज मिळेल.
३१	Behavioral Indicators	पिल्लांची हालचाल व जमाव तपासून तापमान योग्य आहे का हे ठरवणे.
३२	Deep Litter System	लिटरवर पिल्ले वाढवण्याची सामान्य पोल्ट्री पद्धत.
३३	Pre-warming	पिल्ले येण्यापूर्वी शेडचे तापमान व आर्द्रता २४ तास आधी स्थिर करणे.
३४	Microclimate	पिल्लांच्या आसपासचा छोटा वातावरणीय भाग, ज्यात तापमान व आर्द्रता नियंत्रित केली जाते.
३५	Comfort Zone	पिल्ले आरामदायक वाटतात असे तापमान व आर्द्रतेचे क्षेत्र.
३६	Day Old Chicks (DOC)	अंड्यातून नुकतीच बाहेर पडलेली एक दिवसाची पिल्ले.
३७	Disinfection	शेड, पाणी व उपकरणांवरील जंतू नष्ट करण्याची प्रक्रिया.


महापशुधन वार्ता
महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
पशुधन हिताय: बहुजन सुखाय:
प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य